गुप्तहेर सत्यवीर आणि भूतबंगल्याचे रहस्य



अक्षय जाधव

गुप्तहेर सत्यवीर आणि भूतबंगल्याचे रहस्य

अक्षय जाधव

ई साहित्य प्रतिष्ठान

गुप्तहेर सत्यवीर आणि भूतबंगल्याचे रहस्य

लेखक: अक्षय जाधव

९२ क, सोपाननगर, हडको.

मु. पो. सासवड, जि. पुणे,

४१२३०१

फोन : +९१ ७३५०९३३६९०

ब्लॉग – https://jadhavlibrary.blogspot.com/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १६ जुलै २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- अक्षय नंदकुमार जाधव ७३५०९३३६९०)

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

अक्षय नंदकुमार जाधव,

शिक्षण: पदव्युतर पदवी,

सध्या मेडिकल इन्शुरन्स क्षेत्रात कार्यरत.

लहानपणापासूनच घरात वाचनाची आवड सगळ्यांनाच असल्याने आपसूकच ती गोडी मला देखील लागली. आई वडील शिक्षण क्षेत्रात असल्याने साहित्य विषयावर घरात चर्चाविमर्श घडायचेच तसचं घरात पुस्तकाचं वेगळं कपाट देखील असायचं. त्याच अनुषंगाने मराठी साहित्यातील बाललेखकांपासून ते दिग्गज लेखकांच्या साहित्याचा सहवास लहानपणापासूनच मिळत गेला. अगदी तीन डोक्यांचा राक्षस या बालकथांपासून वाचायला सुरुवात केलेल्या पुस्तक वाचनाचा प्रवास मृत्युंजय आणि पानिपतसारख्या थोर कादंबर्यांपर्यंत कधी आला कळेलच नाही.

पण खरी मोहिनी घातली ती वपु काळे, सुहास शिरवळकर, नारायण धारप या सारख्या लेखकांनी. त्यांच्या कथा वाचल्यानेच आपण

देखील लिहावं का हा विचार मनात पेरला गेला. रहस्य आणि भयकथा यात मला विशेष रुची असल्याने सुरुवातीला त्या प्रकारातच ब्लॉग लिहायला सुरुवात केली.

दरम्यान ई साहित्यच्या अनेक उपक्रमांपैकी पुस्तक प्रकाशन उपक्रमाबद्दल कळलं. माझी "आफ्रिकेतील अतर्क्य" हि कथा ई साहित्यच्या टीमने या आधीच प्रकाशित केलेली आहे. गुप्तहेरकथा आणि रहस्यकथा यात विशेष रुची असल्याने मी "गुप्तहेर सत्यवीर" हे पात्र निर्माण करून बऱ्याच गुप्तहेरकथा लिहिल्या आहेत. ज्यामधे गुप्तहेर सत्यवीरने सोडवलेल्या अनेक रहस्यमयी आणि गुन्हेगारी प्रकरणांचा समावेश होतो. गुप्तहेर सत्यवीरच्या अनेक थरारक प्रकरणातील पहिली कादंबरी ई-साहित्य मार्फत प्रकाशित झाली. त्यानंतर आफ्रिकेतील अतर्क्य आणि खोली क्रमांक चार या पुस्तकांनंतर आज माझे चवथे पुस्तक - भूतबंगल्याचे रहस्य सादर करत आहे.

वाचकांसाठी अजून बऱ्याच कथा ई-साहित्यामार्फत प्रकाशित होतीलच. इंटरनेटवरील मराठी साहित्य जगतात ई साहित्यसारखी लोकं साहित्यप्रेमींना प्रेरणादायीच ठरतात. त्यामुळे त्यांच्याच सहयोगाने मराठी वाचकांची वाचनतृष्णा भागवण्याचे भाग्य मला मिळत राहो हीच प्रार्थना....

धन्यवाद.
आपलाच लेखक,
अक्षय नंदकुमार जाधव,
सासवड, पुणे

(प्रस्तुत सर्व कथा काल्पनिक असून कोणत्याही वास्तव घटनेशी किंवा जिवंत अथवा मृत व्यक्तीशी संबंध नाही. तसा संबंध आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा)

गुप्तहेर सत्यवीर आणि भूतबंगल्याचे रहस्य

हरिभाऊंचं पत्र

रेल्वे इंजिनाच्या कर्कश्य भोंग्याने सत्यवीर जरासा दचकूनच जागा झाला. डोळे किलेकिले करून सत्यवीरने डब्यातील खिडकीबाहेर नजर टाकली. रेल्वे कोणत्यातरी स्टेशनवर थांबली होती. सत्यवीरने फलाटावर पाहिलं तर फलाटावर जास्त गर्दीपण दिसत नव्हती. तरीसुद्धा रेल्वेने हा थांबा का घेतला असं वाटून सत्यवीर चरफडतच उठून बसला. अंगावर घेतलेली शाल त्याने बाजूला ठेवली आणि शरीराला आळोखे पिळोखे देत बाजूला नजर टाकली. सत्यवीर रेल्वेच्या ज्या डब्यात बसला होता त्या डब्यामध्ये खूपच कमी प्रवासी बसले होते. सत्यवीरच्या समोरच्या लांबलचक असलेल्या सीटवर किंवा शेजारी कोणीही बसलेले न्हवते. डब्यातील विरुद्ध बाजूला असलेल्या सिंगल सीटवर मात्र एक तरुण कसलं तरी पुस्तक वाचण्यात मग्न होता आणि त्याच्या समोर एक वयस्क बाई बसलेली होती. ती वयस्क बाई हातात जपमाळ घेऊ पुटपुटत बसली होती. रेल्वे फलाटावर थांबली असल्याने तेवढ्या वेळात काही तुरळक प्रवासी डब्यात चढले आणि जिथे जिथे रिकाम्या जागा होत्या तिथे जाऊन विसावले. दोन लोक सत्यवीरच्या समोर असलेल्या लांब आडव्या बाकावर बसले. तर एक विवाहित जोडपे स्वतःला सावरत सत्यवीरच्या शेजारी येऊन बसले.

प्रवासी रेल्वेमध्ये चढल्याने आता डब्यातील रिकाम्या जागा त्या प्रवाशांनी बसण्यासाठी बळकावल्या. समोरच्या सीटवर प्रवासी आल्याने आता मस्तपैकी पाय मोकळे सोडून झोपता येणार नाही या विचाराने सत्यवीर जरासा निराश झाला. तेवढ्यात रेल्वेने परत एकदा कर्कश्य आवाजात भोंगा वाजवला आणि एका हलक्याश्या धक्क्याने रेल्वे सुरु झाली. आता निवांत झोपता येणार नसल्याने सत्यवीरने जवळची शाल घडी करून सीट खाली ठेवलेल्या पिशवीत ठेवून दिली. पिशवीत शाल ठेवताना बाजूच्याच कप्यात ठेवलेलं टपालपत्र सत्यवीरच्या नजरेस पडलं. पत्र आधीच वाचून झालेलं होतं तरीसुद्धा विचारांना काही अधिक चालना मिळते का ते पाहण्यासाठी सत्यवीरने ते पत्र पिशवीच्या कप्यातून बाहेर काढलं आणि आतील मजकुरावरून नजर फिरवू लागला...

प्रिय सत्यवीर

"खरंतर बरेच दिवसांनी तुला पत्र लिहतोय. तुला पत्र लिहावे कि न लिहावे. बऱ्याच दिवसांनी या म्हाताऱ्याने कशी काय आठवण काढली असं तर तुला वाटणार नाही ना? या विवंचनेत असतानाच मंडळींनी आग्रह केला म्हणून मग धीराने तुला पत्र लिहायला बसलो. तुला मी तुझ्या लहानपणापासून ओळखतो म्हणूनच तुझ्या बुद्धिमत्तेवर माझा विश्वास आहे. तुझ्या वडिलांनी मला माझ्या पडत्या काळात भरपूर मदत केली. नोकरी मिळवून दिली. माझ्या संसाराला बळ मिळालं. काही काळ शहरात काम करून मग

करमेनासे झाले मग गावाकडे आलो. पडीक असलेली शेती परत नीट करून राबू लागलो. तुझे आई वडील गेल्याचे कळल्यावर मी आणि मंडळी ढसाढसा रडलो. मिळेल त्या गाडीने त्यांच्या अंतिम दर्शनाला आलो. तुला शेवटच बघितल ते तिथेच. तुझ्या गुप्तहेरी कामांचे किस्से वर्तमानपत्रात अधून मधून वाचायला मिळतात. उर अभिमानाने भरून येतो. जात्याच खूप स्वाभिमानी असल्याने मानलेल्या वडिलांची वडिलोपार्जित संपत्ती दान करून स्वतःच नशीब स्वतः आजमवायला चाललेला पाहून ऊर भरून आला आणि मलासुद्धा देवाने निपुत्रिक न ठेवता तुझ्यासारखाच मुलगा द्यायला हवा होता असं वाटून गेलं... असो.

इथल्या परिस्थितीचा तुला संदर्भ कळावा म्हणून काही गोष्टी लिहीन. गावाकडे आल्यावर मी शेती करत होतो उत्पन्न जास्त नव्हतं. जेमतेम खायला मिळायचं. असं चालू असतानाच गावातील एक मोठे असामी जगदीश शेंडे यांच्याकडे मी कामाला लागलो. शेंडेंचा माझ्यावर विश्वास बसल्याने मला त्यांनी घरकामात मदत होईल म्हणून ठेवून घेतलं. चांगला पगार देऊ केला. मी त्यांची पडेल ती कामे करतो. शेंडेसाहेब हे मोठे प्रस्थ आहेत वडिलोपार्जित संपत्ती बरीच आहे. बरेच धंदे आहेत. तसेच एक पतपेढी देखील आहे. चांगली शेती वाडी आहे. घरे आहेत. शेंडे साहेबांचा स्वभाव देखील चांगला आहे. पण सध्या त्याचं लक्ष थाऱ्यावर नाहीये. काही महिन्यांपूर्वीच त्यांनी गावापासून शहराकडे जाणाऱ्या मार्गावर एक बंगला विकत घेतला. त्याची चांगली डागडुजी केली. पण त्या नंतर अचानक भलतेच घडले. रात्रीच्या वेळी बंगल्यातून चित्रविचीत्र आवाज येऊ लागले. संध्याकाळच्या वेळी खिडकीमध्ये एक बाई केस मोकळे सोडून खिडकीच्या चौकटीवर हात ठेवून रस्त्याकडे पाहत असलेली बऱ्याच जणांनी पाहिली. लोकांच्या अफवा असतील असं वाटून शेंडे साहेबांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

पण नंतर मी सुद्धा एकदा रात्री असंच तिथून जाताना बाईच्या मोठमोठ्याने हसण्याचा आणि गाणे गुणगुणण्याचा आवाज आला. मला शंका आल्याने मी आत बंगल्यात जाऊन पहिले. तर भयाण शांतात होती.

एवढ्या मागच्या खोलीतील दरवाजा धाड्कन आदळला आणि ऊऽऽ असा कोल्हेकुई केल्यासारखा आवाज आला. मी घाबरून तसाच तिथून पळत आलो. शेंडे साहेबांनी सुद्धा काहीसा असाच अनुभव घेतला. तेव्हापासून सगळे त्या बंगल्याला भूतबंगलाच म्हणून लागले.

एवढे कमी होते कि काय म्हणून शेंड्यांच्या राहत्या घरात एकदा एका भिंतीवर रक्ताने “मी आले आहे” असं वाक्य लिहिलेलं दिसलं. शेंडे कुटुंबीय भयाने कंपितच झाले होते. पण मी त्यांना धीर दिला. नंतर काही दिवसांनी त्याच्या घरात बेडरूम मध्ये समान इतस्त विखुरलेलं दिसलं. कपाटाचे कप्पे उघडे होते. कागदपत्रे विखुरली होती. आम्हाला तर काही कळेनासे झाले. हि करणीबाधा आहे कि भानामती. मला काहीही सुचले नाही. शेंडे देखील हतबल झाले. मग मला अचानक तुझं नाव आठवलं. या प्रकरणात तुला काही करता येईल कि नाही मला माहित नाही पण माझ्या ओळखीचं दुसर कोणीहि नाही ज्याची मदत घेऊन मी शेंडे साहेबांना आधार देऊ शकेल. तू इकडे येऊ शकलास तर खूपच मदत होईल. तुझा उत्तराची वाट पाहत आहे.

तुझाच,
हरिभाऊ

पत्र वाचून झाल्यानंतर ते व्यवस्थित मिटून सत्यवीरने पत्र परत पिशवीत ठेवले आणि हात हनुवटीवर ठेवून तो खिडकीबाहेर पाहत विचारात गढून गेला. अनाथालयातून ख्रिश्चन दाम्पत्याने दत्तक घेऊन सत्यवीरला एका छानशा घरात आणले तिथेच सत्यवीरचे बालपण गेले. लहान असताना आपल्या मानलेल्या वडिलांनी घरात हरिभाऊ आणि त्यांच्या मंडळीना काही दिवस आसरा दिल्याचे त्याला आठवले. आपल्या मानलेल्या वडिलांच्या ओळखीवर जवळच एका कंपनीत कारकून म्हणून हरिभाऊ चिकटले. नंतर काही वर्षांनी हरिभाऊ गावी निघून गेले. आपले आई वडील गेल्यावर त्यांच्या अंत्यविधीसाठी हरिभाऊ धावत पळत आल्याचे सत्यवीरला आठवले. काही दिवसापूर्वीच सत्यवीरला याच हरिभाऊंचे पत्र आले. पत्रातील मजकूर वाचून सत्यवीर काही क्षण बुचकळ्यात पडला खरा कारण अशा प्रकारचे विचित्र प्रकरण सत्यवीर काही हाताळत नसायचा. भुतेखेते वगैरे तत्सम प्रकार सत्यवीरच्या पचनी पडत नसत.

तरीही सत्यवीरने हरिभाऊंच्या शब्दाला मान देऊन आणि शेंडे कुटुंबियांना आधार म्हणून हरिभाऊंना आपण येत असल्याचे पत्राने कळवले होते. म्हणूनच तो हरिभाऊंच्या गावाकडे रेल्वेने निघाला होता. खरंच हे भूतबंगला प्रकरण नक्की काय असावे? शेंडेंच्या घरातील घटना देखील विचित्र वाटत होत्या. रक्ताने लिहिलेला “मी आले आहे” असा मजकूर नक्की कोण आलंय असं भासवत असावा? कि घरातीलच कोणत्यातरी नोकराचे किंवा नातेवाईकाचे हे चाळे असतील. रात्रीच्या अंधारात गावातील लोकांना आसपासच्या झाडांची छाया भिंतींवर पडून चित्रविचित्र आकार दिसत असावेत.

गावकऱ्यांनी उगाचच भूत वगैरे म्हणून अफवा पसरवली असेल असं सत्यवीरला वाटतं होतं. काहीही असो या सगळ्या गोष्टींची सत्यता पडताळून घ्यायला सत्यवीर उत्सुक होता. तसेच जरासा विरंगुळा म्हणून गाव भटकून यावे असाहि सत्यवीरचा मानस होता.

तासाभराने रेल्वे एका स्टेशनवर थांबली. सत्यवीरने बाहेर पाहिलं तर त्याला इच्छित असलेल्या रेल्वेस्थानकावर रेल्वे थांबलेली होती. आपलं समान घेऊन सत्यवीर डब्याच्या बाहेर पडला आणि फलाटावर उतरून इकडेतिकडे पाहू लागला.

आजूबाजूला फळे आणि इतर खाद्यपदार्थांची विक्री करणारे विक्रेते ओरडत फिरत होते. थोडसं चालत जाऊन त्याने तिकीट खिडकीजवळ नजर टाकली तर एक वयस्क माणूस अंगात सदरा, खाली धोतर आणि खांद्यावर एक पंचा अशा वेशात हात कपाळावर ठेवून इकडे तिकडे पाहत उभा होता. सत्यवीरने दुरूनच त्या व्यक्तीकडे पाहिलं आणि ओळखलं त्यामुळे तो तिकडे गेला. सत्यवीरने जवळ गेल्यावर त्या व्यक्तीला मिठी मारली.

"काय हरिभाऊ.. जसे होतात तसेच आहात अगदी. ओळखायला वेळ लागला नाही" मिठी सोडवत आपलं समान खांद्यावर घेत सत्यवीर म्हणाला.

"आता मी काय बदलणार बाबा.. पिकलं पान.. तू मात्र खूप बदललास. चांगला हट्टाकट्टा आणि उंच झालायस" सत्यवीरचे दंड चापचात दोन पडके दात असलेली बत्तीशी दाखवत हरिभाऊ म्हणाले.

गप्पा मारतच हरिभाऊ आणि सत्यवीर रेल्वे स्थानकाबाहेर आले. बाजूला उभ्या असलेल्या टमटमला हात करून दोघेही आतमध्ये बसले. इतर प्रवासी आधीच बसल्याने टमटम तडक निघाली. रेल्वे स्थानकापासून

हरिभाऊंच गाव जरा लांब होतं. रस्त्यातील कच्च्या रस्त्यामुळे गाडी वर खाली हेंदकळत होती. आजूबाजूची हिरवीगार झाडे पाहून सत्यवीरला मस्त वाटत होतं. हवादेखील झुळूझुळू वाहत होती. वाहत्या हवेत सत्यवीरने छाती भरून श्वास घेतला. बरेचसे खाचखळगे पार करून गावातून आतमध्ये शिरत टमटम एका कोपऱ्यावरच्या हॉटेलसमोर थांबली. सत्यवीर आणि हरिभाऊ खाली उतरून चालू लागले. थोडं अंतर चालल्यानंतर काही वेळातच दोघेही हरिभाऊंच्या एका बैठ्या घरापुढे आले. आतमध्ये येताच अंगणातच असलेल्या एका लाकडी बाजेवर सत्यवीर विसावला. ते दोघेही आत आलेले पाहून हरिभाऊंच्या पत्नीने सत्यवीरला पाणी दिले आणि त्याची विचारपूस केली. सत्यवीरला पाहून दोन्ही दांपत्याला खूपच आनंद झालेला होता. एकतर बऱ्याच दिवसांनी ते त्याला पाहत होते आणि दुसरं म्हणजे त्यांच्या मालकांना शेंडे साहेबांना पेच प्रसंगातून सोडवायला त्यांच्या शब्दाखातर तो आलेला होता.

सत्यवीर थकलेला असल्याने हात पाय धुवून लगेच जेवायला बसायला हरिभाऊंच्या पत्नीने सांगितले तसे दोघेही जेवायला बसले. इकडच्या तिकडच्या गप्पा मारून जेवण वगैरे उरकून अंगणातल्या बाजेवर सत्यवीर हात डोक्यामागे ठेऊन मस्तपैकी पडला. त्याच्याच बाजूच्या एका लाडकी खुर्चीवर बसून हरिभाऊनी पानाच्या डब्यातून पाने काढली आणि छोट्याश्या पिशवीतून सुपारी काढून अडकित्त्याने सुपारी कातरू लागले.

“जेवण मस्त झालं हरिभाऊ. मस्तपैकी झोपावं वाटतंय आता इथेच..” पडल्या पडल्या सत्यवीर म्हणाला.

“झोप कि मग कोणी अडवलंय तुला” सुपारी कातरत कातरत खाली मान घालून हरिभाऊ खालच्या सुरात म्हणाले.

“तत्पूर्वी तुम्ही मला इथे का बोलावलं याची इत्यंभूत माहिती घ्यावी म्हणतो” सत्यवीर नाटकी आवाजात म्हणाला.

यावर हरिभाऊसुद्धा गालातल्या गालात हसले.

“मग सांगा आता काय म्हणतायत तुमचे शेंडे साहेब आणि त्यांच्या मागे लागलेली भुते” एका अंगावर होत एका हातावर डोकं टेकवत सत्यवीर म्हणाला.

सुपारी कातरून झाल्यावर हरिभाऊंनी पानावर बोटानेच थोडासा चुना पसरवला. मग थोडी कात टाकली आणि कातरलेली सुपारी टाकून पानाची घडी घालून तोंडात कोंबली. थोडावेळ चावून झाल्यावर हरिभाऊंनी सांगायला सुरुवात केली. –

“मी शेंडे साहेबांच्या घरी त्यांचा विश्वासू माणूस म्हणून कामाला आहे हे तुला तर माहित आहेच. त्यांच्या घरातली पडेल ती कामे करणे आणि त्यांच्या अनुपस्थितीत घरातला कारभार सांभाळणे हि माझ्यावर जबाबदारी आहे. घरात इतर नोकरही आहेत. प्रत्येक कामाला एक एक माणूस ठेवला आहे. शेंडे साहेबांचा कामाचा व्याप मोठा आहे. गावात बरीच बागायती शेती आहे. शहरात त्यांचे व्यवसाय देखील आहेत. कामाच्या निमित्ताने त्यांचा खूप मोठ्या मोठ्या शेठ लोकांसोबत संपर्क येत असे. त्यापैकीच एक व्यापारी माणिकलाल मेहता होते. शहराला जाणाऱ्या मार्गावर स्वस्त मिळाली म्हणून एक चांगली जमीन माणिकभाईंनी विकत घेतली आणि त्यावर मस्त अलिशान बंगला बांधला कारण निवांत कधीतरी सुट्टीचं राहता यावे.

बंगला अजून बांधायचा बाकी होता तरीही मेहता शेठ आणि त्यांचे कुटुंबीय तेथे राहायला येत असतं. मेहता दाम्पत्याला एक मुलगी होती तिचं नाव अवनी. ते तिघेही बंगल्यावर येत आणि राहून जात. मेहता पती पत्नीमध्ये बरेचदा वाद व्हायचे. शेंडे साहेबांनी सांगितलं होतं कि पती पत्नी सारखे

संपत्तीवरून वाद घालत असत. मेहता साहेब मग वैतागून घरातच दारू प्यायला बसत. त्यादिवशी सुद्धा ते असेच घरात दारू पीत बसले होते. दुर्दैवाने किचनमध्ये काम करताना मेहतांच्या मुलीच्या साडीच्या पदराला चुकून आग लागली आणि मेहता शेठची मुलगी अवनी त्यातच जळून मृत्युमुखी पडली. घरात मेहता साहेब आणि अवनी दोघेच होते. त्यांची पत्नी कामानिमित्त बाहेर गेली होती. मेहता साहेब शुद्धीत नसल्याने घडला प्रकार कळेपर्यंत उशीर झालेला होता. पत्नी बाहेरून आल्यावर तिला किचनमध्ये काळीठिक्कर पडलेली पोरगी बघून आरडाओरडा करून घर डोक्यावर घेतलं. हॉस्पिटलमध्ये जाईपर्यंत उशीर झालेला होता. या घटनेस मेहतांच्या पत्नीने मेहतांचा बेजाबदारपणा असल्याचं सांगून त्यांच्यावर केस केली आणि मेहतांपासून काडीमोड घेतला. मेहता हे पूर्णपणे खचले आणि त्याचं कामातसुद्धा लक्ष लागेना. मुलीच्या मृत्यूला आपणच जबाबदार आहोत असं मानून त्यांनी हे घर विकून परत आपल्या गावी जाण्याचा निर्णय घेतला. मेहतांचे भाऊ बहिण सुद्धा त्यांना आपल्या गावाकडे येण्यास सांगू लागले. त्यानुसार मेहतांनी अर्धवट बांधलेला तो बंगला शेंडे साहेबांना अल्पमूल्यात विकला आणि हा परिसर सोडून आपल्या गावी निघून गेले. नंतर शेंडे साहेबांनी तो बंगला संपूर्ण बांधायला घेतला. बंगल्याच्या आधीच्या रचनेत फेरबदल केले आणि बंगल्याची चांगली डागडुजी केली. २-३ नवीन खोल्या बांधल्या. कंपाऊंड बांधून घेतलं. बांधकामाचं आणि इतर सामान वगैरे ठेवायला एक शेड बांधलं. अजून बऱ्याच गोष्टी बांधायच्या होत्या. इथपर्यंत सगळं ठीक होतं. बंगल्यात राहायला कोणीही गेलेलं नव्हतं.

एकदा एक गावतील कष्टकरी मजूर संध्याकाळच्या वेळेस त्या बंगल्याच्या समोरील रस्त्याने येत असताना त्याला बंगल्यातून मोठ्याने ओरडण्याचा आवाज आला तसं त्याने बंगल्याकडे पाहिलं तर पूर्ण बंगला काळोखात बुडलेला दिसला. बंगल्यामध्ये कोणीही राहत नसताना हा आवाज

कसा काय आला असावा याचं आश्चर्य त्या कामगाराला वाटलं. रस्त्यावर कोणीही नव्हतं. तो जरासा घाबरला आणि तिथून तसाच निघून आला. नंतर गावातीलच काही लोकांना रात्र पडण्याच्या सुमारास बंगल्यातून चित्र विचित्र आवाज ऐकू येऊ लागले आणि नंतर याची चर्चा गावभर वाऱ्यासारखी पसरली.

कालांतराने बऱ्याच लोकांना असले प्रकार तिथे अनुभवायला मिळाले. पण नक्की काय भानगड आहे हे पाहायला बंगल्यात कोणीही पाउल ठेवयला तयार होईना. बंगल्याच्या आजूबाजूला झाडे झुडुपे आणि काही शेते देखील आहेत त्यामुळे रात्रीच्या सुमारास तिथे अजूनच भयाण शांतता पसरत असे. मी स्वतः देखील तसा अनुभव घेतला. एकदा शेतीच्या कामासाठी काही अवजारे आणण्यासाठी मी बंगल्यावर गेलो असता मुख्यदरवाजातून आत गेल्यावर मला खूप विचित्र शांतता जाणवली. समान घेऊन बाहेर पडणार एवढ्यात मला आतल्या एका खोलीतून कोल्हेकुई सारखा विचित्र आवाज आला. मी एवढा घाबरलो कि मागे वळूनही न पाहता पसार झालो. या सगळ्या हकीकती शेंडे साहेबांच्या कानावर आल्या. त्यांना सुद्धा आश्चर्य वाटलं पण बंगल्यावर जाण्याचं धाडस त्यांच्यामधे होईना. दिवसाउजेडी एकदा बाहेरूनच त्यांनी बंगल्यात डोकावून पाहिलं तर बंगल्याच्या भिंती पूर्ण खराब झालेल्या होत्या. समान इतस्त विखुरलेलं होतं. एवढचं काय तर आतमध्ये सगळीकडे मातीच माती झालेली दिसत होती.

काही दिवसांनीच त्यांना त्यांच्या राहत्या घरात एका भिंतीवर “मी आले आहे” असा रक्ताने लिहिलेला मजकुर दिसला आणि मग चर्चांना जोरदार उधाण आलं. त्या बंगल्यात जळून मेलेली मेहतांची मुलगी ‘अवनी’ हीच भूत बनून त्या बंगल्यात वावरत आहे अशी चर्चा सुरु झाली. आत मात्र कोणीही त्या बंगल्याच्या आसपास देखील फिरकेना. बंगला शेंडे यांनी विकत घेतलेला

असल्याने अवनी भूत बनून त्यांना त्रास देतेय असं सगळे समजू लागले. नंतर काही दिवसांनी शेंडे साहेबांच्या राहत्या घरात कोणीतरी समान इकडेतिकडे फेकलेलं नजरेस पडलं आणि अवनी बंगल्यातून इकडे पण येते असा सर्वांचा समज झाला. शेंडे कुटुंबीय तर हादरूनच गेले. त्यांनी घाबरून पटकन पुजारी बोलावून राहत्या घरात हवन आणि पूजा केली. पण भीती त्यांची पाठ काही सोडेना. शेंडे साहेब आता एकटे कुठेही फिरत नाहीत. नेहमी त्यांच्या बरोबर कोणीतरी सोबतीला असतेच. बंगला विकायचा विचार देखील त्यांनी केला पण तो बंगला भूतबंगला आहे असाच समज सगळीकडे झाल्याने त्याला कवडीमोल किंमत मिळायची. कोणीतरी अफवा पसरवून बंगल्याची किंमत पाडायला बघतेय असं वाटून शेंडे साहेब अजूनच अस्वस्थ झालेत. त्यांचा तो अस्वस्थ चेहरा आणि जीवाची घालमेल मला पाहवेना म्हणून मी त्यांना विचारलं कि हा बंगला विकता येण्यासाठी मी काही कुठून मदत मिळते का ते पाहतो. म्हणून नक्की भुतांचा हा प्रकार आहे तरी काय हा शोध घ्यायला मग मी तुला बोलावलं.

एवढं बोलून हरिभाऊंनी पानाची पिंक बाजूला टाकली आणि पंचाने तोंड पुरू लागले. सत्यवीरने शांतपणे मधे काहीही न बोलता आणि विचारता हरिभाऊंच म्हणण ऐकून घेतलं.

“तुला काय वाटतंय एकंदर सगळ्या घटनांवरून” तोंड पुसत हरिभाऊ म्हणाले.

“त्या भूतबंगल्यामध्ये नक्कीच कोणाचातरी रस असला पाहिजे” सत्यवीर बाजेवर एका अंगावर होत बोलाला.

“आणि त्या भूताबद्दल काय वाटत?... चित्रविचित्र आवाज बंगल्यात येतात” चेहऱ्यावर गंभीर भाव आणत हरिभाऊ म्हणले.

“असू शकतील. काय सांगता येतंय” सत्यवीर म्हणाला.

सत्यवीरच्या या उत्तराने हरिभाऊ चाटच पडले.

“म्हणजे तुझा देखील भुताखेतांवर विश्वास आहे तर” हरिभाऊ खुर्चीत सरळ बसत म्हणाले.

“नाही.. मी असं कुठे म्हणालो कि भूतांवर विश्वास आहे म्हणून”

“अच्छा मग विश्वास नाहीये तर”

“मी असं देखील म्हणालो नाही कि विश्वास नाहीये” सत्यवीर शांत स्वरात म्हणाला आणि पाठीवर पडून आकाशातील चांदण्या पाहू लागला.

सत्यवीरच्या या कोड्यात बोलण्याने हरिभाऊ वैतागले. त्यांना कळेना कि सत्यवीरला नक्की काय म्हणायचं आहे. आपला पंचा खुर्चीच्या हातावर आपटून म्हणाले. “नक्की काय ते नीट सांगशील का?”

त्यांचा तो वैतागलेला चेहरा पाहून सत्यवीरला हसू आलं.

“अहो हरिभाऊ तूर्तास काहीही बोलणं आतातायीपणच ठरेल. एवढच सांगण्याचा हेतू होता माझा” सत्यवीर म्हणाला.

“अस्स...” हरिभाऊ कपाळावर आठ्या आणत म्हणाले.

सत्यवीरने परत सरळ एका अंगावर होत हरिभाऊंकडे नजर केली आणि म्हणाला “बर मला एक सांगा शेंडेच्या घरात कोण कोण राहतय?”

“शेंडे साहेबांच्या घरात ते, त्यांची पत्नी, त्यांचा एक वाया गेलेला मुलगा आणि त्यांचा एक मेहुणा राहतो” हरिभाऊ आठ्ठ्यायुक्त चेहऱ्याने म्हणाले.

“आत्तापर्यंत बंगला विकत घेण्यासाठी शेंडेकडे किती लोकं आले? सत्यवीरने विचारलं.

“नाही.. माझ्या माहितीत अजून कोणी आलेलं नाही” हरिभाऊ उत्तरले.

“घरातील नोकर मंडळी कशी आहेत”

“सगळेजण व्यवस्थितच आहेत. आपापली कामे करत असतात” हरिभाऊ म्हणाले.

“हम्म बऱ.. आपण उद्या शेंडे साहेबांच्या राहत्या घराकडे जाऊन त्यांची भेट घेऊयात. बघुयात तिथे काय परिस्थिती आहे” असं म्हणून सत्यवीर परत विचारमग्न झाला.

“ठीक आहे तसं करूयात. बऱ आता तू झोप शांत आपण उद्या सकाळी बोलूयात. रात्र पण झालीय आणि तू देखील दमला असशील” खुर्चीवरून उठत हरिभाऊ म्हणाले आणि आत घरात जाऊ लागले.

“आणि हो हरिभाऊ...” सत्यवीरने हाक मारून हरिभाऊंना थांबवले तसे ते जागीच थांबून मागे पाहू लागले.

“मी एक गुप्तहेर आहे आणि इथे भूतबंगल्याचा तपास करायला आलोय हे तुम्ही आणि शेंडे साहेब सोडून इतर कोणाला सध्यातरी कळायला नकोय” सत्यवीर मान वर करत बोलला.

“ठीक आहे” मान डोलावून हरिभाऊ सावकाशपणे घराच्या आतमध्ये जायला वळाले.

शेंडें साहेबांची कर्मकथा

सकाळी सकाळी न्याहारी उरकून सत्यवीर आणि हरिभाऊ आपल्या घरातून शेंडे साहेबांना भेटायला त्यांच्या घराकडे निघाले. कच्च्या रस्त्यावरून सत्यवीर मस्तपैकी खिशात हात घालून चालत होता. रस्त्यावरून गावातील माणसे आपापल्या शेतात काम करायला चाललेली दिसत होती. रस्त्याच्या आजूबाजूला मस्तपैकी मोठमोठी झाडे असल्याने थंडावा जाणवत होता. पुढे जाताना त्यांना गावातील लोकांची छोटी छोटी घरे दिसू लागली ज्यामध्ये छोटस कुटुंब मावू शकेल. गाव जास्त मोठं नव्हतं. हवा मस्त खेळती होती आणि वातावरण अल्हाददायक. सत्यवीरने पूर्ण छाती भरून श्वास घेतला आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचं स्मित आलं. दोघेही हळूहळू चालत गावाच्या मुख्य चौकातून पुढे आले.

"ते तिथे समोर ते पांढऱ्या रंगाचे घर दिसत आहे ना? तिथे जायचंय आपल्याला" समोर बोटाने निर्देश करत हरिभाऊ आता झपाटयाने पुढे चालू लागले.

सत्यवीरला हरिभाऊंच्या या चपळपणाचे कौतुक वाटले. ऐन पासष्ठीत देखील हा माणूस कसा तरातरा चालू शकतो याचं त्याला अप्रूप वाटलं. त्यांच्या चालण्याच्या वेगाशी तुलना करत सत्यवीरने सुद्धा आपल्या चालण्याचा वेग वाढवला. काही वेळातच ते त्या पांढऱ्या घरापाशी येऊन पोहोचले. मुख्य प्रवेशद्वाराजवळ येऊन हरिभाऊंनी हळूच कडी काढली आणि आतमध्ये गेले. प्रवेशद्वारावरून एक पाउलवाट घराच्या

दरवाजाजवळ जात होती. सत्यवीर हरिभाऊंच्या पाठोपाठ सभोवतालच निरीक्षण करत आतमध्ये जाऊ लागला.

घर हे चांगलच मोठ्ठ दिसत होतं. घरापुढे दहा-वीस मीटर समोरच्या जागेत हिरवळ उगवलेली होती. सभोवताली मोठमोठ्या कुंड्या ठेवलेल्या होत्या. ज्यामध्ये शोची झाडे लावलेली दिसत होती. घराच्या बाजूला आणि मागेसुद्धा बरीच जागा मोकळी असणार जिथे अशीच झाडे लावलेली असावीत असं सत्यवीरला वाटलं. घराच्या डाव्या बाजूला एक नोकर झाऱ्याने झाडांना पाणी द्यायचं काम करत होता. घर दुमजली होतं आणि आतमध्ये बऱ्याच खोल्या असणार असं जाणवत होतं.

सभोवतालचं निरीक्षण करतच सत्यवीर दरवाजाजवळ पोहोचला. हरिभाऊ आतमध्ये गेले त्यांच्या पाठोपाठ सत्यवीरसुद्धा आत प्रविष्ट झाला. घराचा हॉल बराच मोठा आणि ऐसपैस होता. बाजूलाच एक मोठ्या आकाराचा सोफा होता ज्यावर दहा बारा माणसे आरामात बसू शकली असती. आसपास बऱ्याच किमती वस्तू ठेवलेल्या होत्या. एकूणच हे एका सधन व्यक्तीचे घर वाटत होते. आतमध्ये एक नोकर हॉलची स्वच्छता करत होता. आत जाताच त्याला हरिभाऊंनी इशाऱ्यानेच शेंडे साहेब आतमध्ये आहेत का हे विचारलं. त्यानेसुद्धा इशाऱ्यातच होकारार्थी उत्तर दिलं.

हॉल ओलांडून पुढे जात हरिभाऊ सत्यवीरला घेऊन आतल्या खोलीकडे गेले जिथे शेंडे साहेब कामानिमित्त नेहमी बसत असत. खोलीचा दरवाजा बंद होता. हरिभाऊंनी सत्यवीरला मागे थांबायला सांगून पुढे जाऊन दारावर टकटक करत आवाज केला.

"कोण?" आतमधून एक गंभीर पण थोडासा संशयी आवाज आला.

"मी आहे हरिभाऊ" एकदम हळू आवाजात हरिभाऊ बोलले.

थोडावेळ गेल्यावर दरवाजा आतून उघडला. समोर एक पन्नाशी ओलांडलेली व्यक्ती उभी होती. जाड मिशा, गाल फुगलेले, अंगात शर्ट आणि त्यावर दोन बारीक कातडी पट्ट्या मागून खांद्यावरून कमरेला खोचलेल्या होत्या. खाली कोटवर घालतात तसली पॅन्ट असा एकंदरीत त्या माणसाचा पेहराव होता. असा साहेबी थाटात असलेला हा माणूस म्हणजे शेंडे साहेब असावेत याबद्दल सत्यवीरला खात्री झाली

"या आतमध्ये" एवढ बोलून शेंडे आतमध्ये गेले

हरिभाऊ आणि सत्यवीर त्यांच्या मागोमाग आतमध्ये गेले. हि खोली शेंडे कामासाठी वापरत असत. आतमध्ये एक मोठं टेबल होतं आणि त्यावर कामाच्या काही फाईल्स ठेवलेल्या दिसत होत्या. टेबलामागे एक खुर्ची होती त्यावर शेंडे रेलून बसले. बाजूलाच असलेल्या छोट्या सोफ्यावर हरिभाऊ आणि सत्यवीर जाऊन बसले. मगाशी बाहेर उभा असलेला नोकर लगबगीने आतमध्ये पाण्याचा तांब्या घेऊन आला आणि बाजूच्या एका छोट्या टेबलवर त्याने तो तांब्या ठेवून आला तसाच बाहेर निघून गेला.

"मी सांगितलं होतं ना. माझ्या ओळखीचे एक स्नेही होते त्यांचा मुलगा एक गुप्तहेर आहे" एवढ बोलून हरिभाऊ शांत बसले.

"अरे हो हो.. सांगितलं होतंत तुम्ही.. अं..." एवढ बोलून शेंडे साहेब खाली बघत शांत बसले.

सत्यवीरला त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची चिंता जाणवली. कदाचित बंगल्याविषयीची आणि भुताटकीच्या प्रसंगांची त्यांना आठवण झाल्याने ते शांत झाले असावेत. पण शांततेचा भंग करत शेंडे पुढे बोलू लागले.

“मला हरिभाऊ बोलले होते तुमच्याबद्दल. तशी तुमच्याबद्दल माहिती नव्हती पण चौकशी केल्यावर कळलं कि गुप्तहेर सत्यवीर हे शहरातील एक मोठे गुप्तहेर आहेत. खरंतर या अशा विचित्र प्रकरणात गुप्तहेर काय करू शकतो हे मला सांगता येणार नाही. पण या गोष्टी नक्की का घडतायत याचं खरं कारण तरी पुढे यायला मदत मिळेल म्हणून मग मी हरिभाऊंना तुम्हाला बोलवायला होकार दिला” शेंडे जराशी खाली नजर करत सत्यवीरला बोलले.

“तुम्ही म्हणताय ते अगदी खरं आहे कि प्रकरण जरा वेगळं आहे पण एखाद्या व्यक्तीला कोणीतरी जाणीवपूर्वक घाबरवून त्याच्या मालमत्तेवर डोळा ठेवून असेल किंवा ना ना प्रकारे छळत असेल तर हा गंभीर मामला आहे आणि इथे घरात देखील चोरीचा प्रयत्न झाल्याने कायदेशीर बाबींना धक्का लागलेला आहे” सत्यवीर शेंडेंना दिलासा देत म्हणाला.

“तुम्ही म्हणताय ते खरंय पण..” थोडसं थांबून शेंडे पुन्हा बोलू लागले.

“खरं सांगायचं तर मला काही सुचतच नव्हतं. पोलिसात गेलो असतो तर इज्जतीचा पंचनामा झाला असता उगाचच त्यांच्या चौकशा आणि जबाब. पोलिसांचा हस्तक्षेप मला नको होता” एवढ बोलून शेंडे हातावर हात ठेवून शांत बसले.

“म्हणूनच तर मी साहेबांना म्हणालो कि आपण दुसऱ्या कोणाची तरी मदत घेऊ ज्यामध्ये जास्त बभ्रा होणार नाही आणि सत्यवीरवर माझा विश्वास आहे तो नक्की आपल्याला या पेचातून सोडवेल” हरिभाऊ सत्यवीरकडे पाहत बोलले.

“तुमच्या तोंडात साखर पडो हरिभाऊ आणि असंच होवो” एवढ बोलून शेंडे टेबलावर हात ठेवून सत्यवीरकडे पाहत शांत बसले.

"तुमची हरकत नसेल तर सगळा घटनाक्रम मला पुन्हा सांगाल का? तसं मला हरिभाऊंनी सगळी कल्पना दिलेलीच आहे पण तरीही एखादी गोष्ट सुटली असेल तर तुमचाकडून सविस्तर कळेल" आपल्या जॅकेटच्या आतल्या कप्प्यातून महत्वाच्या मुद्द्यांच्या नोंदींसाठी वापरणारी आपली नेहमीची डायरी आणि पेन काढत सत्यवीर म्हणला.

"हो सांगतो" असं म्हणत शेंडे खुर्ची पुढे ओढून बोलू लागले – "मी तो बंगला माझे एक स्नेही मेहता यांच्याकडून खरेदी केला हे तुम्हाला हरिभाऊंनी सांगितलच असेल. गावातून शहराकडे जाणाऱ्या रस्त्यावर एवढी चांगली जमीन मिळतेय म्हटल्यावर मी ती लगेच खरेदी केली. मुलीच्या दुर्दैवी मृत्यूनंतर मेहतांना सुद्धा तातडीने इथून त्यांच्या गावाकडे परत जायचं होतं. मेहतांनी ज्या ज्या ठिकाणी बांधकाम केलेलं होतं तिथे मी काही सुधारणा केल्या. जुनं बांधकाम पाडून नवीन बांधकाम करायला सुरुवात केली. बंगल्याच्या आतील रचनेत बदल केले अर्थात बंगला घेतल्या घेतल्या महिनाभर मला तिथे काही करायला फुरसदच मिळाली नाही. मला तिथे जाऊन सगळी कामे पाहायला जास्त वेळ न्हवता. शहरात माझे काही व्यवसाय आहेत. थोडीफार शेती आहे. तसचं एक पतसंस्था मी चालवतो. या व्यापामुळे जरा सबुरीनेच कामे चालू होती पण काही महिन्यातच बऱ्यापैकी काम उरकलं होतं. नंतर अचानक काही लोकांना तिथे वेगवेगळ्या प्रकारचे आवाज ऐकू येऊ लागले. रात्र झाल्यानंतर तिथे जास्तच भयानक वातावरण दिसत असे कारण आजूबाजूला रस्त्यावर दिवे जास्त प्रमाणात नाहीत आणि माणसांची वर्दळ देखील कमी असते. कामगारांना सुद्धा तसेच विचित्र अनुभव आले. त्यामुळे दिवसाढवळ्या सुद्धा तिथे फिरकेना. रात्री अनेकांना तिथे कोणीतरी मोठमोठ्याने गळा काढत असल्याचे आवाज ऐकू आले. तर काही लोकांनी तिथे एक बाई

रात्रीच्या वेळेस खिडकीत केस मोकळे सोडून बाहेर बघत असल्याचा अनुभव देखील सांगितला." बोलता बोलता अचानक शेंडे थोडंस थांबले.

सत्यवीर शांतपणे ऐकत त्याच्या नोंदवहीत काहीतरी लिहित होता. हरिभाऊ हाताची घडी मान खाली घालून ऐकत बसले होते.

शेंडे पुढे बोलू लागले – "गावात अशी चर्चा सुरु झाली कि मेहतांची मुलगी अवनी हिचं भूत त्या बंगल्यात फिरत आहे आणि मग कोणीही त्या बंगल्याकडे फिरकेना. माझ्या कानावर सुद्धा या गोष्टी आल्या पण मी कामाच्या रगाड्यात या गोष्टींकडे लक्ष दिले नाही. नंतर मी स्वतः सुद्धा एकदा बंगल्यावर जाऊन पाहावं म्हटलं कारण कामगार तिथे जायला धाजावेनात. तिथे मला एक विचित्र प्रकारची शांतात जाणवली. संध्याकाळच्या वेळेस गेल्यावर मला सुद्धा ते आवाज ऐकायला मिळाले आणि मी जरासा घाबरलो. बरेच लोक म्हणाले बंगला विकून टाका. पण विकणार कोणाला? भूताटकीच्या चर्चा सगळ्या परिसरात पसरल्या होत्या. बंगला कोणी घ्यायला तयार असलं तरी तोट्याचा व्यवहार करून विकावा लागणार होता आणि ते मला मान्य नव्हतं."

"बऱ़ बंगला विकत घेण्याविषयी बोलायला कोणी तुमच्याकडे आलं होतं का"? सत्यवीरने प्रश्न केला.

"हो एक दोन खरेदी विक्री करणारे दलाल येऊन गेले होते. पण खूपच कमी किमतीत सौदा करत होते म्हणून मग मी त्यांना नंतर कळवतो असं म्हणून टाळल" शेंडे कपाळावर आठ्या आणत म्हणाले."

"घरात भिंतीवर लिहिलेल्या मजकुराविषयी काही सांगू शकता" सत्यवीर बोलला.

जरासा आवंढा गिळून शेंडे खुर्चीत जरा रेलून बसले आणि वर पाहत बोलू लागले.

"त्या दिवशी मी आणि माझी बायको कामानिमित्त घराबाहेर गेलो होतो. घरात कोणीही नव्हतं. मुलगा आणि मेहुणा सुद्धा बाहेरच कुठेतरी होते. घरात फक्त नोकर होते आणि ते सुद्धा किचनमध्ये कामात होते. बाहेरून आम्ही दोघे घरात आलो तेव्हा आमच्या खोलीत आम्हाला "मी आले आहे" असा मजकुर लालभडक रंगात भिंतीवर लिहिलेला दिसला. जवळ जाऊन पाहिलं तर ते रक्त होतं हे समजल्यावर तर मी आणि माझी बायको चांगलेच घाबरलो. घरातील नोकर घाबरून पळत आले त्यांना सुद्धा आश्चर्य वाटलं. मी चौकशी केली कि बाहेरून कोणी आलं होतं का तर ते नाही म्हणाले आणि तसंही आम्ही बाहेर गेल्यावर घराचा मुख्य दरवाजा बंद होता."

सत्यवीरने मधेच शेंडेना प्रश्न केला "घरातील नोकरांपैकीच कोणीतरी हा खोडसाळपणा केलेला असू शकतो का? किंवा बाहेरच्या कोणीतरी व्यक्तीने नोकरांची मदत घेऊन घरात कोणी नसताना प्रवेश मिळवला आणि रक्ताने लिहिलेला मजकुर भिंतीवर लिहून आल्यामार्गे पसार झालं असेल?

"नाही.. असं नाही होऊ शकत. आमचे नोकर असं काही करू शकत नाहीत. ते सांगेल ते काम निमुटपणे करत असतात. तसंही इथे राहायला खायला प्यायला आणि दोन पैसे गाठीला मिळत असताना असलं भलतं सलतं धाडस ते करतील असं मला वाटत नाही" शेंडेनी उत्तर दिलं.

“तुम्ही नोकरांवर एवढा विश्वास दाखवताय म्हटल्यावर मग घरात दुसरं कोणीही नसताना हे कृत्य अन्य कोण करू शकेल हा प्रश्न गहन होऊन जातो” सत्यवीरने शेंडेकडे प्रश्नार्थक नजरेने पहिले.

“तेच तर ना... अन्य कोणी हे कृत्य कसं केलं असेल हेच तर समजेना. म्हणूनच तर आम्ही घाबरून गेलो कि नक्की बंगल्यातले भूतच याला कारणीभूत तर नसावे ना?” एक मोठा आवंढा गिळून शेंडे म्हणाले. शेंडेच्या कपाळावर घर्मबिंदू जमा झाले होते, टेबलावरच्या तांब्याच्या भांड्यातून ते गटागटा पाणी प्यायले.

“बर मग चोरीची घटना झाली तेव्हा नक्की काय काय घडलं” सत्यवीरने विचारलं.

“रक्ताने मजकुर लिहिल्यानंतरच्या घटनेनंतर काही दिवसांनीच चोरीची घटना घडली. सकाळी उठल्यावर मी कामाची कागदपत्रे घेण्यासाठी त्या पलीकडच्या खोलीत गेलो होतो जिथे तिजोऱ्या आणि मोठी कपाटे असतात. आत जाऊन पाहतो तर सगळी कागदपत्रे इकडे तिकडे विखुरली गेली होती. कपाटे सताड उघडी होती. मी तर घाबरूनच गेलो” शेंडे कपाळावरचा घाम पुसत म्हणाले.

“बर काय काय चोरीला गेलं मग” सत्यवीरने शेंडेंवर नजर रोखत विचारलं.

“काहीच नाही” थंडपणे शेंडे म्हणाले.

“काय.. काहीच नाही” सत्यवीरने आश्चर्यचकित होऊन विचारलं.

“हो ना.. म्हणूनच तर आम्ही जास्तच घाबरलो कि चोरीला काहीच गेलं नाही म्हणजे चोरी झालीच नाहीये. उलट आम्हाला वाटलं आपल्या घरात आता बंगल्यातील भूत शिरले आहे आणि अशा प्रकारे थैमान घालत

आहे. मग बायकोने घाबरून गावातील पुजाऱ्याला बोलावून घेतले आणि हवन विधी करून घेतला. तेव्हा कुठे आमच्या मनाला शांती मिळाली" शेंडे निश्वास टाकत बोलले.

"या सगळ्या घटना होऊ लागल्याने शेंडे साहेब व मी देखील चक्रावून गेलो म्हणूनच तर तुला बोलावण्याचा घाट मी घातला. कारण या समस्यांचं निराकारण तुझ्याकडूनच होऊ शकेल अशी खात्री वाटत होती मला." हरिभाऊ सत्यवीरकडे पाहत म्हणाले.

हरिभाऊंच्या या बोलण्याने सत्यवीर खाली मान घालून विचारात पडला. शेंडे साहेब सुद्धा खुर्चीत रेलून त्याच्याकडे पाहत बसले. घटनाक्रम खरोखरीच बुचकळ्यात टाकणारा होता. शहरालगतच्या बंगल्यामध्ये चित्रविचित्र घटना घडत होत्या ते समजत होतं पण घरात सगळ्यांच्या अपरोक्ष अशा विचित्र घटना घडणे म्हणजे विशेषच होते.

"सत्यवीर तुम्ही आम्हाला या प्रकरणात मदत करू शकाल का?" खुर्चीवर रेललेल्या अवस्थेतच शेंडे सत्यवीरकडे पाहत म्हणाले.

"मी नक्कीच प्रयत्न करेन शेंडे साहेब. पण तुम्हाला एक गोष्ट सांगू इच्छितो कि मी इथे एक गुप्तहेर म्हणून आलोय आणि या प्रकरणांचा तपास करतोय हे तूर्त कोणास सांगू नका. मी गुप्तहेर आहे हे फक्त तुमच्यापर्यंतच राहूद्यात" सत्यवीरने शेंडेना सांगितलं तसं यावर शेंडे 'ठीक आहे' असं म्हणाले.

"सध्या तरी मला त्या दोन्ही खोल्या दाखवा जिथे भिंतीवर रक्ताने मजकुर लिहिलेला होता आणि चोरीचा प्रयत्न झालेला होता" सत्यवीर उत्तरला.

"जरूर" असं म्हणत शेंडे जागेवरून उठले.

त्यांच्या या लगबगीच्या उठण्याने यांना हे प्रकरण किती लवकर तडीस जावे असं वाटत असावं याची कल्पना सत्यवीरला येत होती. तसंही वरकरणी दाखवत नसले तरी शेंडे मनातून चांगलेच हादरले होते हे सत्यवीरला त्यांच्याशी बोलल्यावर समजलं होतं. खोलीतून शेंडेच्या मागोमाग सत्यवीर आणि हरिभाऊ निघाले. हॉलमधून डावीकडे वळत थोडसं पुढे गेल्यावर घरातला जिना लागला जो वर जात होता. जिन्याच्या बाजूने गेल्यावर आतल्या भागात एक खोली दिसत होती. त्या खोलीकडे जात खोलीचा दरवाजा उघडून सावधगिरीने शेंडे आत शिरले. आत जाण्याआधी मागे वळून त्यांनी सत्यवीर पण आहे कि नाही याची खात्री करून घेतली. सत्यवीर जवळ येताच शेंडे बाजूला थांबले.

"हि समोरची भिंत जिच्यावर मजकुर लिहिलेला होता पण आता तो साफ केला आहे" शेंडेनी माहिती पुरवली.

सत्यवीरने व्यवस्थितपणे त्या भिंतीचं निरीक्षण केलं. भिंतीवर मजकुर कसा लिहिला असेल याचा अंदाज त्याने घेतला. कारण आत्ता भिंत व्यवस्थित पुसली गेली होती. फिकट रंगाच्या भिंतीचा मजकुर लिहिलेला भाग खरवडला गेला होता. खोलीत सामान जास्त नव्हतंच. काही बोचकी, लाकडी सामान आणि अडगळीच्या खोलीत टाकतात तसे साहित्य एवढेच काय ते होतं.

सत्यवीरने सभोवार नजर फिरवली तेव्हा त्याला जाणवलं खोलीला एक खिडकी आहे. जी लाकडी कलाकुसर केलेली जुन्या पद्धतीची आहे जवळ जाऊन सत्यवीरने ती खिडकीसुद्धा व्यवस्थित न्याहाळली. खिडकीपासून मजकुर लिहिलेली भिंत जास्त लांब नाहीये. थोडावेळ तिथे थांबून सत्यवीर आता दुसऱ्या खोलीकडे जायला वळला जिथे चोरीचा

प्रयत्न झालेला होता. या खोलीतून बाहेर पडल्यावर पुढे थोडा मोकळा भाग होता आणि नंतर विरुद्ध बाजूला एक खोली होती. शेंडेनी सत्यवीरला त्या खोलीकडे जाण्याचा निर्देश केला. तिथे गेल्यावर आधी सत्यवीर खोलीचा दरवाजा उघडून आतमध्ये गेला नंतर त्याच्या पाठोपाठ शेंडे आणि हरिभाऊ. शेंडेनी सांगितल्याप्रमाणे या खोलीत फक्त दोन मोठी लोखंडी कपाटे, एक तिजोरी आणि लाकडी टेबल, खुर्ची एवढाच पसारा होता.

"या कपाटांना लॉक लावलेलं असते कि ती उघडीच असतात" सत्यवीर कपाटाकडे पाहतच म्हणाला.

"लॉक असत. कारण यामध्ये कागदपत्रे असतात" शेंडे म्हणाले.

"ओह्ह.. आणि याच्या किल्ल्या कुठे असतात?"

"किल्ल्या माझ्या काम करण्याच्या खोलीत असतात. जिथे मगाशी आपण बसलेलो होतो" शेंडे म्हणाले.

सत्यवीरने कपाटांच्या जवळ जाऊन दोन्ही हॅन्डल्स तपासले.

लॉक पाहिलं. कुठेही जबरदस्ती केल्याच्या खुणा नव्हत्या. कपाटामध्ये फक्त कागदपत्रे असल्यामुळे आतमध्ये उघडून पाहण्याची आवश्यकता सत्यवीरला वाटली नाही. या खोलीला सुद्धा एकच खिडकी होती आणि अगदी तशीच जशी मागच्या खोलीत पहिली होती. खिडकीपाशी जाऊन सत्यवीर थोडंसं घुटमळला. मग खिडकीपासून बाजूला झाला.

"बस चला आता घराच्या बाहेरच्या बाजूला जाऊन जरा पाहूयात" असं म्हणत सत्यवीर खोलीतून बाहेर पडला.

बाहेर जाऊन काय बघायचंय आता? शेंडेना वाटलं. कारण घटना तर घरात घडल्या होत्या. पण तरीही आपली शंका मनातच दाबून शेंडे निमुटपणे सत्यवीरच्या मागे चालू लागले. ते सगळे हॉलमध्ये येत असतानाच मागून जिन्यावरून कोणीतरी खाली उतरत असल्याचा आवाज आला. आवाज आल्यासरशी ते तिघेही जागीच उभा राहून मागे पाहू लागले.

जिन्यावरून एक तरुण आणि मध्यम वयाचा माणूस उतरून खाली येत होते. तरुणाने अंगात पांढरा सादर आणि खाली पांढरी पॅन्ट घातली होती. केस जरासे विस्कटलेले होते आणि त्याच्या नजरेत एक प्रकारचा माज होता. रंगाने सावळा असून चेहऱ्यावर बेफिकीर वृत्ती दिसून येत होती. त्याच्या मागून येणारा माणूस आपलं मोठ्ठं पोट सावरत धोतर एका हाताने पकडून पुढे येत होता. त्या माणसाने अंगात मातकट रंगाचे जॅकेट घातलेलं होते.

"काय मग स्वारी कुठे निघालीय आज" जराशा रागात शेंडे त्या तरुणाकडे पाहत म्हणाले.

"आलोच.. शिकार करून" शेंडेकडे आणि हरिभाऊंकडे हलकीशी नजर देत त्या तरुणाने बेफिकिरपणे उत्तर देत तिथून काढता पाय घेतला. दरवाजाकडे जात असताना वाटेत त्या तरुणाला सत्यवीर दिसला आणि त्या तरुणाने जरा घुश्यातच सत्यवीरकडे पहिले. एक तीक्ष्ण कटाक्ष टाकून तो सत्यवीरच्या अगदीच जवळून गेला.

याउलट सत्यवीरने अगदीच थंडपणे त्या तरुणाकडे पाहिलं होतं. सत्यवीरच्या चेहऱ्यावरील रेषही हलली नव्हती.

"भाऊजी, आलू बरका जरा रानात जाऊन.. मस्तपैकी ससा आनतू धरून" मुद्दाम हसत तो पोट पुढे आलेला माणूस त्या तरुणाच्या मागेमागे

जाऊ लागला. जाताना तो माणूस सुद्धा सत्यवीरच्या पुढून गेला. सत्यवीरकडे पाहत त्याने कपाळावर जरा आठ्या आणल्या आणि संशयी नजरेने सत्यवीरकडे वरपासून खालपर्यंत पाहिलं. यावेळी सुद्धा सत्यवीर चेहऱ्यावरील रेषहि न हलवता थंडपणे पाहत होता. सत्यवीरकडे तसं पाहत तो माणूस बाहेर निघून गेला.

"कधी सुधारणार नाहीत दोघही" तोंडाने पुटपुटत निराशेने मान खाली घालत शेंडे सत्यवीर जवळ आले.

"सत्यवीर.. तो निर्लज्ज तरुण माझा मुलगा भैरव होता आणि त्याच्यामागे गेलेला तो त्याचा मामा म्हणजेच माझा एकुलता एक मेहुणा रावसाहेब" शेंडेनी माहिती पुरवली. शेंडेंच्या नजरेत सत्यवीरला निराशेचा एक डोंब दिसून आला.

आपल्या मुलाची अशी ओळख करून दिल्यामुळे शेंडेंच्या मनात आपल्या मुलाविषयी काय भाव असतील हे सत्यवीर समजून चुकला. त्यामुळे त्यावर अधिक काही आत्ताच बोलायला नको म्हणून सत्यवीर जास्त काही बोलला नाही. नंतर हरिभाऊंकडून त्यांची माहिती घेता येईल असं त्याला वाटलं.

"अहो गेला का हो भैरव बाहेर.." मागून एका स्त्रीचा आवाज आला. आवाजाच्या दिशेने तिघांनी पाहिलं तर एक स्त्री शेंडेंच्या जवळ येत त्यांना विचारू लागली.

"हो.. गेलाय नेहमीप्रमाणे हुंदडायला बैल कुठला" शेंडे आवाज चढवत म्हणाले. तसं त्या स्त्रीला मनातून थोडासा राग आला. परक्या माणसांसमोर आपल्या मुलाचा असा उपमर्द केलेला तिला आवडला नाही.

"नाश्ता कर म्हटलं तर तसाच बाहेर गेला. थांबा त्याला बोलावते" असं म्हणत ती बाई बाहेर निघून गेली. घरात कोणीतरी पाहुणा आलाय वा नाही याची त्या स्त्रीला फिकीर नव्हती.

"कामात लक्ष घाल म्हटलं तर जमत नाही. फुकट बसून खातोय नुसता" त्रागाने शेंडे म्हणाले.

या घरगुती ड्रामावर काहीही न बोलता सत्यवीर बाहेर जायला वळला. कारण त्याला शेंडेच घर बाहेरून पहायचं होत. मुख्य दरवाजातून बाजूला हिरवळीवरून चालत जाऊन मागच्या बाजूला जाऊ लागला. त्याच्या मागोमाग शेंडे आणि हरिभाऊ सुद्धा चालू लागले. घराच्या मागेसुद्धा बरीच मोकळी जागा होती. काही खोल्यांच्या खिडक्या भिंतींवर तिथे दिसत होत्या. संडास बाथरूमचे सांडपाण्याचे पाईप सुद्धा त्या बाजूला बसवले होते. घराच्या बाजूच्या भागात झाडे लावलेली असल्याने मस्त सावली पडलेली होती. वरच्या मजल्यावरच्या दोन खोल्यांना गॅलरी असल्याचं दिसतं होतं. घराच्या मागच्या बाजूला आल्यावर वर अजून एका खोलीला गॅलरी होती. सगळ्या गॅलऱ्या या वरच्या मजल्यावर होत्या त्यांना लोखंडे नक्षीदार कठडे बसवले होते. मागच्या बाजूला वर एक गॅलरी होती. जी अगदी त्या खोलीच्या जवळ होती ज्या खोलीत चोरी करण्याचा प्रयत्न झालेला होता. बाजूला सांडपाण्याचा एक पाईप सुद्धा होता जो अगदी वर गॅलरीपर्यंत जात होता, पाईप रुंदीला खूप जाड दिसत होते. सत्यवीरने जवळ जाऊन व्यवस्थितपणे मागची बाजू पहिली विशेषतः खिडक्या आणि त्यांच्या चौकटी. ज्या खोलीत मजकुर लिहिलेला होता तिथे त्या खोलीबाहेर बाहेर काही खुणा दिसतात का हे त्याला पाहायचं होतं. तिथे त्याला काही आढळलं नाही म्हणून काही वेळ तिथे निरीक्षण करून त्याने बाजूच्या सांडपाण्याच्या पाईपाकडे पाहिलं तर तो खूप जुना झालेला होता. पाईपला

भिंतीला आधार देण्यासाठी म्हणून ठोकलेल्या कड्यांपैकी एक कडी तुटलेली होती.

"ती वरची खोली कोणाची आहे जिला गॅलरी आहे" सत्यवीरने विचारलं

"ती गेस्ट रूम आहे कोणी पाहुणा माणूस आला कि तिथे राहण्याची व्यवस्था केली आहे" शेंडे बोलले.

काही वेळ तिथे पाहून सत्यवीर घराला वळसा मारून बाजूच्या मार्गाने घराच्या पुढ्यात हिरवळीवर आला. नोकरांनी सगळीकडे पाणी मारल्यामुळे सगळ्या हिरवळीवर पाणी साचले होते त्यात चालल्यामुळे त्याच्या बुटाचा पचपच आवाज येत होता. घरापुढे उभे राहून सत्यवीर काहीसा विचारमग्न झाला. शेंडे आणि हरिभाऊ सुद्धा त्याच्या मागोमाग तिथे आले.

"मग काय वाटत तुम्हाला सत्यवीर तुम्ही हे प्रकरण सोडवू शकाल का?" शेंडे आठ्यायुक्त चेहऱ्याने म्हणाले.

"हो मी शंभर टक्के प्रयत्न करण्याचं आश्वासन दिलेलं आहे शेंडे साहेब" घराकडे पाहत सत्यवीर उद्गारला.

सत्यवीर खात्रीने काहीही बोलला नसल्याने शेंडेना दिलासा मिळाला नाही पण सत्यवीर आता या प्रकरणात लक्ष घालणार म्हटल्यावर त्याचं थोडंस दडपण दूर झालेलं होतं. कारण भुतांच्या कारनाम्यांनी त्यांनी थोडासा धसकाच घेतलेला होता. जेवढी माहिती मिळवायची होती ती मिळाली असल्याने सत्यवीरने शेंडेची रजा घेतली आणि तो हरिभाऊंसोबत शेंडेंच्या घरासमोरील गेटमधून बाहेर पडला.

नानांची टकळी

शेंडेंच्या घरातून बाहेर पडल्यावर सत्यवीर आणि हरिभाऊ रस्त्यावरून चालू लागले. सूर्य आता चांगलाच डोक्यावर आला होता. मध्यान्हीचे चटके सहन करत दोघेही चालत होते. शेंडेंच्या घरापासून ते पुढे चालत आले असता त्यांना शेजारच्या घरातून हरिभाऊंना कोणीतरी आवाज दिला.

"काय हरिभाऊ, दुपारच्या वेळी उन्हातान्हात कुठे हिंडताय? आणि सोबत हे महाभाग कोण"?

या प्रश्नाकर्त्याकडे माना वळवून दोघेही बघू लागले. एक स्थूल शरीरयष्टीचा माणूस अंगात बनियन आणि लुंगी घालून शेजारच्या घराच्या कुंपणामागे उभा राहून मिश्किलपणे त्यांच्याकडे पाहत होता.

"नाना.. काय म्हणताय. हे काय साहेबांच्या घराकडूनच येतोय." हरिभाऊ त्या इसमाच्या घराजवळील कुंपणाजवळ जात म्हणाले.

"अच्छा असं होय.." असं म्हणत नाना सत्यवीरकडे पाहू लागले. त्यांनी सत्यवीरला ओळखलं नाही. त्यांची ती नजर पाहून हरिभाऊंच म्हणाले कि "हा माझ्या एका जवळच्या मित्राचा मुलगा. गावात भटकायला आला आहे. मला पण तेवढीच मदत होईल कामात म्हणून म्हटलं ये"

ऐनवेळी सत्यवीरची ओळख लपवण्याचं काम हरिभाऊंनी हुशारीने केलं याचं सत्यवीरला समाधान वाटलं.

"या कि मग आत. या चहापाणी घेऊयात" नाना आग्रह करत म्हणाले.

"अहो आता एवढ्या उन्हात कसला चहा" हरिभाऊ उत्तरले.

त्यांना खरंतर नानांच्या घरात जायचं नव्हतं. सत्यवीरला सुद्धा हरिभाऊंच्या चेहऱ्याकडे पाहून तसं जाणवलं.

"अहो या हो.. अग ऐकलं का चहा टाकं बर जरा" असं म्हणत नानांनी त्यांच्या कुंपणाच फाटक उघडलं आणि घरात गेले.

नाईलाजाने हरिभाऊ आणि सत्यवीर फाटकातून आत शिरले. नाना घरात जाताच हरिभाऊनी सत्यवीरला जवळ येण्याची खुण केली आणि त्याच्या कानात हळूच बोलले "या नानाला उगाचच लोकांच्या चौकशा करायची भारी खोड आहे. आत्ता आपण शेंडे साहेबांच्या घरातूनच आल्याचं त्याच्या लक्षात आलं असणार. म्हणून शेंडेंच्या घरातल काही नवीन खबरबात कळते का हे बघायला उगाचच चहापाण्याचा खटाटोप."

"अच्छा..असं आहे तर" सत्यवीरने हळू आवाजात बोलत मान डोलावली.

ते दोघेही नानांच्या घरात गेले. घर तसं फार मोठं नसून बैठे प्रकारातलं होतं. हॉलमध्ये २ खुर्च्या आणि एक जुनाट मळकट सोफा ठेवलेला होता. दोघेही तेथे जाऊन स्थानपन्न झाले. नाना हे गावातीलच रहिवासी होते पण ते काय नोकरीधंदा करत हे कोणालाच निश्चित माहित नव्हतं. विचारलं कि ते म्हणायचे पिढीजात संपत्ती ठेवलीय माझ्या पूर्वजांनी माझ्यासाठी मी कशाला कामधंदा करू. आतून पाण्याचा तांब्या घेऊन स्थूल शरीर सावरत नाना बाहेर आले आणि त्यांच्या शेजारी येऊन बसले.

"मग काय म्हणतायत तुमचे शेंडे साहेब" तांब्या हरिभाऊंच्या हातात देत दात दाखवत नाना बोलले.

नानाच्या हातातून तांब्या घेत हरिभाऊंनी पाणी पिताना सत्यवीरकडे सूचकपणे पाहिलं. सत्यवीर काय समजायचं ते समजला. नानाच्या चौकशांची फैरी चालू झाल्याचं ते चिन्ह होतं.

"काही विशेष नाही असंच कामानिमित्त. मी कुठे आणि कोणाकडे काम करतो हे याला दाखवायला घेऊन गेलो होतो" सत्यवीरकडे निर्देश करत हरिभाऊ म्हणाले आणि तांब्यातील पाणी प्यायले.

"अहो, माझ्यापासून लपवून काय फायदा? गावात कावळा शिंकला तरी मला दुसऱ्या दिवशी कळतं." नाना छाती फुगवत म्हणाले.

"म्हणूनच तर गावातल्या कावळ्यांनी शिंकायचं बंद केलंय," हरिभाऊ निर्विकार चेहऱ्याने म्हणाले.

क्षणभर सत्यवीरला हसू आवरलं नाही.

"अच्छा असं होय.. बरं बाकी काही कळलं का? घरातलं भूत अजून नोकरीवर आहे की राजीनामा देऊन पळालं?" नाना डोळे मिचकावत म्हणाले.

"तुमच्या चौकशा ऐकल्या असतील, गाव सोडून गेलं असेल..पण सध्या तरी घरात सगळं शांत आहे" खाली पाहत हरिभाऊ उत्तरले.

"कसली शांतात अन कसलं काय. शेंडे म्हणजे मुलखाचा भित्रा माणूस मांजर दिसलं तरी वाघ म्हणून घाबरेल. उगाच कोणीतरी पोरासोराने भिंतीवर काईतरी लिहून रंगरंगोटी केली असलं आणि घरात वस्तू इकडं तिकड फेकल्या असतील घरातल्या लोकांनी घाबरव म्हणून. शेंडे उगाचच घाबरलाय." नाना बोलले.

बरं झालं त्यांना तुम्ही दिसला नाहीत. नाहीतर भुताऐवजी तुम्हालाच पकडलं असतं" हरिभाऊ म्हणाले.

"अहो.. मला भूतही दोनदा विचार करूनच पकडेल. मी त्यालाच एवढे प्रश्न विचारेन की तेच पळून जाईल!" नाना मोठ्याने हसत म्हणाले.

सत्यवीरच्या चेहऱ्यावर नकळत हसू उमटलं. हरिभाऊ मात्र नेहमीसारखाच निर्विकार बसले होते.

"कोण कशाला असले उपद्व्याप करेल. काहीतरी बाहेरचंच असलं पाहिजे" उगाचच काहीतरी बोलायचं म्हणून हरिभाऊ बोलले.

"हा तसं पण असलं म्हणा. पण शेंडेचे वांदे झालेना. कोणाला तरी सोबत घेतल्याशिवाय घरातून बाहेर पडेना ना तो जास्त. शेजारच्या गावात तमाशाचा फड आलाय मस्त." नाना हळू आवाजात बोलले आणि मागे वळून किचनकडे पाहत अंदाज घेत कोणी ऐकत नाही ना हे पाहून पुढे बोलले "नवीन चांगली पाखर आहेत फडात. मस्त आहेत" डोळे बारीक करत मादकपणे पाहत नाना बोलले.

हे अशा पद्धतीच बोलणं हा नाना आपल्याला सत्यवीर जवळ बसलेला असताना करतोय हे हरिभाऊंना आवडल नाही. सत्यवीरला सुद्धा हा नाना एवढा छंदीफंदी असेल असं वाटलं नव्हतं. नाना हे जेमतेम शेंडेंच्याच वयाचे असल्याने शेंडेना अरे तुरे करून संबोधत होते.

"तमाशाचा फडाचा आणि शेंडे घराबाहेर न पडण्याचा काय संबंध" हरिभाऊ जरा मुद्दाम जोरात बोलले.

"अहो शेंडेला पण आहे शौक तमाशाचा. मागच्या खेपेस एकदा असाच तमाशा आलेला असताना मी विचारलं होतं सोबत जायचं का

म्हणून. रात्रीचं आम्ही दोघे गेलो होतो तिथे. तेव्हा असली भुताटकीची प्रकरणं झालेली नव्हती तेव्हाची हि गोष्ट" हळू आवाजात नाना बोलले.

"एखादं वेळेस जाऊन औत्सुक्यापोटी पाहिला असेल. त्यात नवल ते काय" शेंडे कधीमध्ये असे शौक पुरे करतात हे हरिभाऊंना माहित होतं. उगाचच शेंड्यांची चर्चा अजून व्हायला नको म्हणून हरिभाऊ बोलले.

तेवढ्यात नानाची बायको चहा घेऊन बाहेर आली आणि त्या तिघांना चहा देऊन आतमध्ये निघून गेली.

"हा असेल तसंपण. उंडगा पोरगा आणि रिकामा मेहुणा यांना वैतागून अधेमध्ये मनोरंजन करत असावेत" नाना म्हणाले.

"हम्म" एवढंच बोलून हरिभाऊ गप्प बसले.

"एवढा काय उंडगेपणा करतो तो भैरव" इतका वेळ ऐकत असलेला सत्यवीर चहाचा घोट घेत मधेच संभाषणात सहभागी झालेला होता.

"अरे काय करतो म्हणून काय विचारतो? काय नाही ते विचार. गावभर त्या रावसाहेबाला घेऊन टवाळगिरी करत फिरत असतो. उनाड मुलाचं टोळक घेऊन रस्त्यात तरण्याताठ्या पोरींना शेरेबाजी करण, कोणाच्याही शेतात जाऊन बळजबरी उस किंवा आंबे खाणं आणि कोणी अडवलं तर अरेरावीची भाषा करण. नाही नाही ते उद्योग चाललेला असतो. एवढा ताठा आहे तर त्या स्वतःच्या त्या भूतबंगल्यात जाऊन ताठा का दाखवत नाही काय माहित" नाना सत्यवीरकडे पाहत वैतागत बोलले.

"हे खरं आहे. भैरव नेहमी अतिपणा करत असतो. गावातली लोकं गरीब आहेत. त्यात शेंडेकडे आणि त्यांच्या प्रतीष्ठेपुढे पाहून गावातील लोक त्याला जास्त काही बोलत नाहीत" हरिभाऊंनी पुष्टी दिली.

“बापरे अजबच आहे हा प्राणी म्हणायचं” सत्यवीर मुद्दाम डोळे मोठे करत घाबरल्यासारखे करत बोलला.

“अजब नाही उपद्रवी कार्ट आहे ते. त्याच्या नादाला लागू नको रे बाबा तू” नानांनी सत्यवीरला सांगितलं.

“हो हो. नाना मी लक्षात ठेवेन” नाटकी सुरात सत्यवीर म्हणाला. आपण आता बोलण चालूच केलं आहे आणि अनायसे इथे नानांनी स्वतःच घरात यायचं आमंत्रण दिले आहे तर अजून चौकशी करावी या उद्देशाने सत्यवीर बोलणं पुढे वाढवत म्हणाला

“ते भूतबंगल्याचं काय म्हणालात नाना तुम्ही”

“तुला हरिभाऊंनी काहीच सांगितलं नाही वाटत. अरे त्या शेंड्याने काही महिन्यांमागे शहराकडे जाणाऱ्या मार्गावर एक बंगला विकत घेतला होता आणि त्याची डागडुजी पण केली मस्तपैकी. पण तिथं भयानक किंकाळ्याचे आवाज येऊ लागले. बंगला भुताने झपाटलाय तो. लोकांची टरकते तिथे जायला” नानांनी माहिती दिली. लोकांच्या अशा उखाळ्यापाखाळ्या करण्यात नानांना आनंद मिळत असल्याचे पाहून सत्यवीरने चर्चा पुढे चालू ठेवली.

“तिथे जाऊन कोणी नक्की भानगड काय आहे ते बघत का नाहीपण. सगळे लोक मिळून तिथे गेले आणि छाननी केली तर कदाचित वेगळीच माहिती मिळेल. असलं भूतबित काही प्रकार नसतो हो” बोलण्यात शहरीपणाचा आव आणत सत्यवीर म्हणाला.

“तू एकदा जाऊन बघ तिथ कळेल तुला लोकं तिथे का जात नाहीत. आधीच्या मालकाच्या घरातली एक बाई तिथे जळून मेली होती. तिचा आत्मा तिथे फिरतो असं लोकं म्हणतात. बऱ्याच लोकांनी पाहिलंय तिला

आणि स्वतःची चड्डी पिवळी करून घेतलीय. अरे बाबा हा ग्रामीण भाग आहे. इथे अशा घटनांना लगेच लोकमान्यता आहे. बऱ्याच लोकांना अशा प्रकारचे अनुभव इथे येत असतात. त्यामुळे सगळेजण विश्वास ठेवतात अशा गोष्टीवर आणि अशा प्रकारांपासून शक्य तितके चार हात लांब राहतात." सत्यवीरने भूतावर विश्वास ठेवलाच पाहिजे अशा तावात नाना आपली बाजू मांडत होते.

"असं आहे तर" सत्यवीर नकली चिंता चेहऱ्यावर आणत म्हणाला.

"मग सांगतोय काय मी.. तूसुद्धा त्या बंगल्यापासून लांबच रहा. उगाच काहीतरी आक्रीत व्हायचं आणि हरिभाऊंना कामाला लावशील" खी खी हसत नाना बोलले.

"बापरे.. असं असेल तर त्या बंगल्यापासून लांब राहिलेलंच बर आहे" नाटकीपणाने घाबरत सत्यवीर म्हणाला.

"चला आता निघुयात" चहा संपवून हरिभाऊ जागेवरून उठले. नानांची टकळी ऐकत इथे बसायची त्यांना मुळीच इच्छा नव्हती. त्यांच्या मागोमाग सत्यवीरसुद्धा तिथून उठला आणि नानाचा निरोप घेऊन ते बाहेर पडले.

गावतील रस्त्यावरून चालत ते वेशीजवळ आले. शेंडेच्या घरात जाऊन सगळ्या गोष्टींचा आढावा सत्यवीरने घेतलेला होता. गावात भुताची चांगलीच आवई उठल्याचे नानाच्या घरात चर्चा करताना सत्यवीरला जाणवले. त्यात नानासारखी मंडळी त्याला अधिकच खतपाणी घालत असावीत. सकाळपासून घरातून निघालेलं ते दोघे बाहेरच फिरत होते.

"मग.. शेंडे साहेबांच्या घरातील एकूण गोष्टी पाहून काय मत बनलं तुझं" हरिभाऊंनी चालता चालताच सत्यवीरला विचारलं.

“कोणीतरी नक्कीच शेंडे साहेबांना घाबरवण्याचा प्रयत्न करतंय आणि त्यामध्ये त्यांना यशदेखील येतंय असं म्हणावं लागेल” सत्यवीरने आपल्या भावना सांगितल्या.

“म्हणजे.. तुला असं म्हणायचंय का कि घरात तो रक्ताने लिहिलेला मजकूर आणि चोरीचा केलेला प्रयत्न हा भुताने नसून कोण्या व्यक्तीने फक्त शेंडेना घाबरवण्याकरिता होता? हरिभाऊ म्हणाले.

“तसं म्हणायला हरकत नाही. कारण मला तरी ते कोण्या भुताने केलेले प्रकार वाटत नाहीत”

“पण एवढ्या खात्रीने बोलतोयस असं काय आढळलं तुला?”

“घरामध्ये नोकर मंडळी सोडून इतर कोणीही नसताना भिंतीवर मजकूर लिहिणे किंवा रात्री अपरात्री बंद खोलीत समान इतस्त: विखरणे. असल्या गोष्टी करण्यात कोणत्या भुताला स्वारस्य असेल. भूत असतं तर ते आपली ताकत दाखवत शेंडेचा सरळ खातमाच केला असता ना. पण नाही तसं न करता वेगळाच खेळ कोणत्या तरी व्यक्तीने चालवलेला आहे” सत्यवीर म्हणाला.

“घरातीलच व्यक्तीने हे केलं असेल का मग” हरिभाऊंनी आपली शंका व्यक्त केली.

“शक्यता नाकारता येत नाही. घराबाहेरची व्यक्ती पण असू शकते. ती जी कोणी व्यक्ती असेल ती शेंडेंच्या माहितीतलीच असली पाहिजे. कारण घरात्त जाऊन राजरोस खोल्यांमध्ये प्रवेश मिळवून असा प्रकार करणे म्हणजे त्या व्यक्तीला ते घर चांगलेच माहित असावे म्हणून शक्य झाले.” सत्यवीर म्हणाला.

"पण घराबाहेरची व्यक्ती घरात गुपचूप येऊन तो मजकूर कसा लिहू शकेल किंवा खोलीतील वस्तू इतस्त: कशा फेकू शकेल. नोकरांच्या मते मुख्य दरवाजाला कडी होती"

"हो माझ्या लक्षात आहे ते.. म्हणूनच तर बोलतोय जर हे काम घरातल्या नोकरांनी केलं नाहीये. तर बाहेरची व्यक्ती चोरमार्गाने आली आणि हे काम करून हळूच बाहेर गेली असणार" सत्यवीरने उत्तर दिले.

"आणि ते कसे?"

"शेंडेचे घर दुमजली आहे. घराच्या वरच्या मजल्यावरील काही खोल्यांना लोखंडी नक्षीदार गॅलऱ्या आहेत. जमिनीपासून वर जाणाऱ्या सांडपाण्याच्या जाडजूड पाईपला पकडून वर जात त्या गॅलरीमध्ये प्रवेश मिळवणे सोपे आहे. घरात नोकर सोडून इतर कोणी नाही हि माहिती मिळवून घराच्या मागच्या बाजूला असणाऱ्या गॅलरीमध्ये पाईपवरून जाऊन हे काम करण सहज शक्य आहे. ती खोली गेस्ट रूम म्हणून ठेवली आहे असं शेंडे म्हणाले. म्हणजेच तिथे पाहुणा माणूस सोडून दुसरं कोणीही राहत नसणार. तसही मागच्या बाजूला जो सांडपाण्याचा जो पाईप आहे. तो तिथे नीट उभा राहावा म्हणून आधाराला ज्या कड्या ठोकल्या आहेत त्यातली एक कडी निसटून भिंतीला नुसतीच लटकत आहे. घरात येताना चढण्याउतरण्याच्या घाईत त्या व्यक्तीच्या वजनाने पाईपवर पाय घसरून ती कडी तुटली असावी. घरच्या आजूबाजूला असणाऱ्या हिरवळीवर सकाळ संध्याकाळ पाणी मारतात. त्यामुळे त्या व्यक्तीची पादत्राणे आडमार्गाने हिरवळीवरून चालत आल्याने भिजली असतील. त्यामुळे पाईपवर चढणे उतरणे अजूनच निसरडे झाले असावे. याचाच अर्थ कोणीतरी पाईपचा वापर करून वर गॅलरीच्या खोलीमध्ये प्रवेश मिळवला. त्या खोलीतून बाहेर पडून घरात आतमध्ये हळूच जाऊन खालच्या खोलीत

मजकूर लिहिला. नंतर काही दिवसांनी रात्री याच मार्गाने येऊन शेंडेंच्या ऑफिसमधल्या खोलीतील चाव्या घेऊन दुसऱ्या खोलीत जाऊन कपाटे चाव्यांनी उघडून सामान इकडेतिकडे फेकले आणि चोरीचा बनाव केला.. अर्थात हा एक तर्क आहे" सत्यवीरने सगळं नीट समजावून सांगितलं.

"अरे देवा ..असं म्हणतोस. म्हणजे नक्की कोणीतरी मनुष्यप्राणी असावा. बंगल्यातील भूत इकडे घरात येऊन धिंगाणा घालत असल्याचा बनाव रचला आहे बहुधा. पण कोणी केलं असावं हे" हरिभाऊंनी कपाळावर हात लावत उद्गार काढले.

"हो.. जास्तीत जास्त शेंडेना घाबरवणे हाच हेतू यामागे असला पाहिजे. कदाचित घाबरून शेंडे आपला बंगला स्वस्तात विकतील म्हणून कोणत्या तरी व्यक्तीचं काम असावं असं प्रथमदर्शनी वाटतंय" एवढ बोलून सत्यवीर विचार करू लागला.

यापुढे हरिभाऊ काहीही बोलले नाही. सकाळपासून काहीही न खाल्ल्याने दोघांना खूप भूक लागली होती. घराकडे जाईपर्यंत दम न धरवल्याने गावाच्या वेशीजवळच एक छोटस हॉटेल होतं तिथे बसून काहीतरी खावं असा विचार त्यांनी केला. हॉटेलात जास्त वर्दळ नव्हती. एका कोपऱ्यातील टेबलवर बसून दोघेही खाण्यात मग्न झाले.

"आता पुढे काय करायचंय" हरिभाऊ म्हणाले.

"खाऊन झालं कि त्या भूतबंगल्याकडे जाऊन जरा चक्कर मारून यावी. बघुयात नक्की तिथे काय काय सापडत" तोंडात घास टाकत सत्यवीर म्हणाला.

सत्यवीरच्या या वाक्यासरशी हरिभाऊंच्या अंगावर काटा आला. कारण मागच्या वेळी जेव्हा ते बंगल्यात गेले होते तेव्हा त्यांना विचित्र अनुभव आला होता. पण ते काहीच बोलले नाहीत. खाऊन झाल्यानंतर

हरिभाऊंनी हॉटेलच्या मालकाकडून दुचाकी मागून घेतली. मालकाची दुचाकी त्यांचा काम करणारा पोऱ्या बाहेर घेऊन गेला होता. तो येईपर्यंत दोघांनी चर्चा आणि तर्कवितर्क करण्यात घालवले. हॉटेल मालक हरिभाऊंना ओळखत असल्याने त्याने तो पोऱ्या आल्यावर लगेचच आपल्या दुचाकीची चावी हरिभाऊंना दिली. दोघांनी मग तिथून भूतबंगल्याकडे जाणाऱ्या मार्गाकडे कूच केली. वेशीपासून शहराकडे जाणाऱ्या मार्गाकडे दुचाकी चालवत सत्यवीर हरिभाऊंना घेऊन निघाला. काही वेळाने ते दोघेही शहराला जोडणाऱ्या रस्त्याजवळ आले.

भूतबंगला

काही वेळातच त्यांची दुचाकी वळणे घेत बंगल्यापाशी येऊन पोहोचली. आजूबाजूला जास्त घरे नव्हती. पण शेते आणि झाडे मात्र भरपूर होती. पुढे काही अंतरावर बंगला होता.

चारही बाजूंना पसरलेली शेते, अधूनमधून डोलणारी झाडं आणि संध्याकाळच्या वाऱ्याने निर्माण होणारा सळसळता आवाज यामुळे वातावरण आणखी उदास वाटत होतं. संध्याकाळ झालेली होती. सत्यवीरने समोर पाहिलं बंगला खरोखरच भव्य दिसतं होता.पण त्याच्या भव्यतेत एक विचित्र भय दडलेलं होतं. मावळत्या सूर्याच्या केशरी प्रकाशात त्याची काळपट झालेली रचना एखाद्या विशाल मृत प्राण्यासारखी भासत होती.

काही खिडक्यांना चौकटी होत्या पण काचा नव्हत्या. काही ठिकाणी तर चौकटीसुद्धा गायब होत्या. त्या काळ्या रिकाम्या फटी जणू आतून कोणीतरी त्यांच्याकडे पाहत असल्याचा भास निर्माण करत होत्या. बंगल्याभोवतीचं अर्धवट कुंपण अनेक ठिकाणी मोडलं होतं. गवत आणि काटेरी वेली त्यावर चढल्या होत्या. समोरची मोकळी जागा ओसाड पडली होती.

सगळ्यात विचित्र गोष्ट म्हणजे तिथली शांतता.

ती नैसर्गिक शांतता नव्हती.

रस्त्यावरच्या वाहनांचा वावर सुद्धा इथे कमीच होता. म्हणूनच हि शांतात अजूनच भयाण वाटत होती. दिवसासुद्धा इथे असं वातावरण असेल तर रात्रीबद्दल काय सांगावे. बंगल्याच्या मागच्या बाजूला उसाची शेते होती. तर बाजूला खुरटी झाडे आणि झुडुपे. दूरवर कुठेतरी एखादा पक्षी ओरडत

होता, वारा वाहत होता, उसाच्या पिकांतून सळसळ ऐकू येत होती... पण बंगल्याच्या अगदी जवळ आल्यावर ते सगळे आवाज जणू कुणीतरी गिळून टाकत होते..

बांधकाम पूर्ण झालं नसल्याने कामे अर्धवट राहिली होती. आता इथे भूतांचा वावर असल्याने कामाला कोणीही येत नव्हतं. दुचाकीवरून उतरून सत्यवीर कुंपणाच्या आतमध्ये शिरला. हरिभाऊ त्याच्यासोबत चाचरतच कुंपणातून आतमध्ये गेले.

मातीचे ढिगारे, लोखंडी सळया, अर्धवट विटांच्या राशी आणि कुजायला लागलेली लाकडी फळकुटं परिसरात विखुरलेली होती. डावीकडे एक पत्र्याचं शेड उभं होतं. वाऱ्याची झुळूक येताच त्याचा एक सैल पत्रा हलकेच हलत होता..

टण... टण...टण...

तो आवाज इतका मंद होता की तो वाऱ्यामुळे होतोय की कोणीतरी आतून ठोठावतंय, हेच समजत नव्हतं.

संधिप्रकाश झपाट्याने गडद होत चालला होता.

इथे बंगल्यात विजेची सोय साहजिकच नसणार होती आणि बंगल्यासमोर रस्त्यावर सुद्धा दिवे वगेरे काही न्हवते. त्यामुळे आत्ता रात्र पडायच्या आत बंगल्याची पाहणी करावी असा विचार सत्यवीरने केला आणि तो बंगल्याच्या आतमध्ये जाऊ लागला.

“हरिभाऊ तुम्ही इथेच थांबा मी जरा आतमध्ये जाऊन पाहणी करून येतो.” एवढ बोलून सत्यवीर आतमध्ये जाऊ लागला.

“पोरा जरा जपून रे... मी सुद्धा असाच आतमध्ये गेलो होतो शेतीची अवजारे शोधत. मला कसा अनुभव आला हे तुला माहितीच आहे.

जास्तवेळ आतमध्ये थांबू नकोस म्हणजे रात्र व्हायच्या आत निघुयात इथून" हरिभाऊ काळजीयुक्त स्वरात म्हणाले.

"हो मी काळजी घेईन हरिभाऊ" असं म्हणून सत्यवीर बंगल्यात शिरला.

बाहेर अजूनही उकाडा होता. पण आत मात्र हवा थंडगार होती.

अनैसर्गिकरीत्या थंड..

मुख्य ठिकाणी दरवाजा नव्हताच फक्त चौकट होती. त्यामधून सत्यवीर आतमध्ये आला. हॉलमध्ये सगळीकडे वाळू पसरलेली होती. भिंतींना अर्धवट प्लास्टर करण्यात आलेलं होत. काम पूर्ण करायच्या आधीच कामगारांनी येथून पोबारा केलेला दिसत होता. सत्यवीर हळुवारपणे हॉलमधून पुढे आला. येथून दोन पॅसेज दिसत होते एक डावीकडे आणि दुसरा उजवीकडे जात होता. प्रत्येक पॅसेज मधून पुढे गेल्यावर खोल्या असाव्यात असं वाटून सत्यवीर आधी डावीकडच्या पॅसेज मधून पुढे चालू लागला. थंडगार वाऱ्याचे झोत सत्यवीरच्या शरीराला स्पर्शून जात होते. चालताना पाय वाळूत धसत होता. डावीकडच्या भागात दोन खोल्या एकमेकांना लागून होत्या. त्या दोन्ही खोल्यांना दरवाजे बसवलेले होते आणि ते पुढे सरकवलेले होते. एका खोलीचा दरवाजा सत्यवीरने हाताने हळूच ढकलला.

कर्ररर... आवाज करत दरवाजा उघडला आणि सत्यवीरने आतमध्ये प्रवेश केला.

खोलीत टाचणी पडली तरी आवाज होईल एवढी शांतात होती. समोरच्या भिंतीवर खिडकीसाठी बनवलेली उघडी चौकट होती. त्यातून सत्यवीरने बाहेर पाहिलं तर बाहेर बऱ्यापैकी अंधार पडायला

सुरुवात झालेली होती. खोलीमध्ये जमिनीवर मातीत जागोजागी खड्डे पडलेले होते. भिंतींवर चरे पडलेले दिसत होते जणूकाही जाणीवपूर्वक कोणीतरी ते ओढलेले असावेत.

पण त्या सगळ्यात एक गोष्ट वेगळी होती. धुळीच्या जाड थरावर काही अस्पष्ट पाऊलखुणा दिसत होत्या. अनवाणी पायांच्या..

सत्यवीर त्या खोलीतून बाहेर पडून बाजूच्या खोलीत गेला. या खोलीचा दरवाजा मात्र जरा उघडाच होता. सत्यवीरने आतमध्ये प्रवेश करताच कोपऱ्यात त्याला काही बोचकी ठेवलेली दिसली. हळूच जवळ जाऊन त्याने पायानेच डिवचून पाहिलं असता त्यात मऊमऊ काहीतरी लागतं होतं. सत्यवीरने बोचक्यांच्या उघड्या फटीतून हात घालून आत पाहिलं तर आत फक्त कापडी चिंध्या हाताला लागल्या. बाजूला कोपऱ्यात एक खुर्ची उताणी पडलेली दिसली. सत्यवीर त्या खोलीच्या बाहेर आला आणि पुढे जाऊ लागला. पुढे थोडी रिकामी जागा होती डाव्या आणि उजव्या पॅसेजकडचा मार्ग येथे येऊन मिळत होता. त्या रिकाम्या जागेला ओलांडून पुढे अजून काही खोल्या होत्या. सत्यवीरने पुढे जात पाहिलं तर रिकाम्या जागेवर जमिनीवर मोठ्ठा खड्डा पडलेला होता. त्यात सिमेंटची पोती आणि सिमेंटने बरबटलेल्या काही लांब पल्ल्याच्या प्लास्टिकच्या ताडपत्री होत्या. त्या ओलांडून सत्यवीर पुढे गेला. समोर एक विना दरवाजाची खोली होती आणि आकाराने जरा मोठी खोली वाटत होती. सत्यवीरने आतमध्ये जाऊन पाहिलं तर एक चांगलं मोठ्ठ लोखंडी जाडजूड कपाट होतं त्याचं हॅन्डल वाकलेलं असून ते कपाटाला लटकलेले होते. त्याच्या बाजूलाच छोट्या आकाराची पण मजबुत अशी अजून काही कपाटे होती त्यांचे बाह्य आवरण चपटलेले दिसत होते. कोपऱ्यात एक टेबल उभा केलेला होता. सत्यवीरने जवळ जाऊन निरीक्षण केले तर टेबलाच्या खाली

त्याला काहीतरी लांबट बोटभर नळीसारखे आकाराचे पडलेले दिसले. जवळ जाऊन सत्यवीरने ते हातात घेतले तर त्याला दिसलं कि ती हाडे होती.

ओह्ह.. सत्यवीरने उद्गार काढला. उंदीर किंवा अन्य कोणत्यातरी प्राण्याची हाडे असल्यासारखी वाटत असल्याने सत्यवीरने ते हाड बाजूला फेकले. त्या खोलीतून सत्यवीर आता बंगल्याच्या कोपऱ्यात आला होता जिथे ऐसपैस जागा होती आणि काही लाडकी सोफे तिथे ठेवलेलं दिसत होते. शेंडे साहेबांनी बंगला पूर्ण व्हायच्या आतच बरच समान आतमध्ये आणलेलं दिसत होतं. पण नंतर बंगल्यातील भुतांच्या अफवांमुळे ते तसचं इथे सडत पडलेलं होतं. लाकडी सोफ्याच्या जवळ एक मोठी खिडकीची चौकट होती आणि त्यातून थंडगार वाऱ्याची झुळूक आतमध्ये येत होती. सत्यवीरने खिडकीतून बाहेर पाहिलं समोर लांबच लांब उसाची शेते होती. त्याकडे पाहत सत्यवीर शांतपणे विचार करत उभा होता. त्यातली काही शेते हि स्वतः शेंडेची होती. तर बाकीची आजूबाजूला राहणाऱ्या शेतकऱ्यांची होती. बाहेर बऱ्यापैकी अंधार पडलेला होता. सत्यवीर तिथून आता उजवीकडच्या पॅसेज मधून पुढे आला. तिथे काही खोल्या होत्या पण आतमध्ये फक्त वाळूचे ढिगारे आणि विटा पडलेल्या होत्या. त्या खोल्या ओलांडून सत्यवीर पुढच्या भागात म्हणजेच हॉलच्या मागे आला जिथून एक जिना वरच्या मजल्यावर जात होता. हाताने धरायला रेलिंग नसलेला फक्त सिमेंट आणि खडी यांनी बांधलेला तो जिना हळूच चढत सत्यवीर वर आला. बाजूला एक मोठ्ठी हॉलसारखीच खोली होती. या हॉलवजा खोलीच्या तिन्ही भिंतींना उघड्या खिडकीच्या मोठ्या चौकटी होत्या आणि त्यामधून वाऱ्याचा घु घु.. असा आवाज आतमध्ये येत होता. या खोलीमधून

बंगल्याच्या समोरचा, बाजूचा आणि मागचा भाग व्यवस्थित बघता येत होता.

याचं ठिकाणी अनेकांनी केस मोकळे सोडलेली बाई उभी असलेली पाहिलेली असावी असं सत्यवीरला वाटलं कारण यातली एक खिडकी रस्त्याकडे तोंड करूनच होती. या खोलीत बरेच कापडाचे बोळे पडलेले दिसत होते. भिंतीवर ठिकठिकाणी हातोडा मारल्यासारखे व्रण होते. बाकी तिथे अजून लक्षात येण्याजोगं काहीच नसल्याने सत्यवीर माघारी वळला.

रेलिंग नसलेल्या त्या सिमेंटच्या जिन्याजवळ सत्यवीर आला आणि खाली उतरायला सुरुवात करणार एवढ्यात त्याला कसलातरी खरखरल्याचा आवाज आला. जणूकाही वाळूमधून कोणीतरी काहीतरी वस्तू हळुवारपणे खरडत पुढे आणतंय. सत्यवीरने कान टवकारले. कोण असावं बर असं त्याला वाटलं? अगदी सावकाशपणे तो आवाज येत होता. बंगल्यातील शांततेमुळे तो आवाज टिपता येत होता. पण तो आवाज कसला आहे याचा पत्ता लागेल. काय असावं? भूत कि अन्य कोणता प्राणी? तो आवाज खालून हॉलच्या जवळून येत होता. सत्यवीर श्वास रोखून आपल्या सगळ्या हालचाली थांबवून कानोसा घेऊ लागला. आता खरडण्यासोबत कर्रकर्र असा आवाज येऊ लागला.

आवाज एकदाच झाला. मग पुन्हा सगळीकडे शांतता पसरली. पण आता सत्यवीरला खात्री होती. या ओसाड बंगल्यात तो एकटा नव्हता.

नक्कीच खाली कोणीतरी होते. सत्यवीरच्या श्वासाची गती वाढलेली होती. खाली कोण होतं याचा थांग लागेना. बंगल्यात मेलेल्या अवनीच भूत तर नसेल ना? सत्यवीरच्या मनात अचानक विचार आला. छे.. काय विचार करत आहोत आपण असं म्हणून तो विचार त्याने झटकला. मग कोण असावं एखादा हिंस्र प्राणी तर न्हवे. बिबट्या किंवा कोल्हा.

ओह्ह शिट्ट एखादं जंगली जनावर असेल तर उगाचच आपल्यावर हल्ला करेल. असं वाटून तयारी म्हणून पॅन्टच्या खालच्या चोरकप्प्यात हात घालून आपला चाकू काढण्याचा सत्यवीरने प्रयत्न केला.

पण हाय रे दैवा.. त्याचा चाकू हरिभाऊंच्या घरातच विसरला होता. चोरकप्पा रिकामाच होता.

सकाळी निघताना फक्त शेंडेच्या घराकडे जाऊन परत येऊ असं म्हणून निष्काळजीपणे त्याने तो चाकू घरातच सोडला होता आणि आत्ता त्याला त्या चाकुची नितांत गरज होती. करकरीचा आणि खरडण्याचा आवाज हळूहळू जवळ येऊ लागला. सत्यवीर जिन्याच्या पायरीजवळ थांबलेला होता. सत्यवीरने स्थिर डोक्याने विचार केला. दोनच शक्यता असल्या पाहिजेत कि एकतर जंगली जनावर असेल किंवा कोणीतरी भटका माणूस किंवा चोर इथे रिकामा बंगला पाहून आश्रयासाठी आलेला असावा. कोणताही माणूस असेल तर एवढ घाबरण्याच कारण नाही. समोर येताच तोंडावर एक ठोसा देऊन गार करू त्याला. पण जंगली जनावर असेल तर? चाकू तर आपल्याकडे नाहीये किंवा इतर कोणतही शस्त्र. मग आता काय? त्या प्राण्याने हल्ला केला तर काय करावे?

सत्यवीरने क्षणभर विचार केला. जे होईल ते होईल. खाली कोणी भटक्या असेल तर ठोसा आणि जर का जनावर असेल तर या जिन्याने हळूच आवाज न करता खाली उतरून हॉलमधून बाहेर जोरात पळत सुटायचं. जनावराला समोरून कोण आलंय हे कळणार नाही आणि ते बेसावध असल्याने गांगरून जाईल. ते बेसावध असल्याचा फायदा घेऊन जोरात पळत दरवाजातून धूम ठोकायची. एकदा बंगल्याच्या बाहेर गेलं कि पुढचं पुढ बघू. हा विचार पक्का करून सत्यवीर जिन्याची एक एक पायरी हळुवारपणे उतरू लागला. गरज पडली ठोसा नाहीतर पलायन एवढ्या

दोनच गोष्टी डोक्यात असल्याने त्याने दोन्ही मुठी मुष्टीयोध्याप्रमाणे घट्ट पकडून समोर धरलेल्या होत्या. खरखरीचा आवाज आता जवळ येऊ लागला होता. सत्यवीर आता जिन्याच्या शेवटच्या पायरीवर आला भिंतीच्या पलीकडे काही अंतरावरच कोणीतरी असणार होतं.

सत्यवीर शेवटची पायरी उतरला हीच ती वेळ होती. थोडसं खाली वाकून वेगाने बाहेरच्या दिशेने त्याने पळायला सुरुवात केली. पळायचा आवाज ऐकून बाहेरची खरखर थांबली. बाहेर जे काही होतं ते गांगरल असेल, योजना यशस्वी होणार म्हणून हॉलच्या जवळ येताच सत्यवीरने पळायचा वेग वाढवला.

हॉलमध्ये शिरताच एक लाकडी बांबू अचानक सत्यवीरच्या समोर आला प्रसंगावधान राखून सत्यवीरने पळता पळताच त्या बांबूलाच ठोसा दिला तसा तो बांबू बाजूला पडला आणि घाबरून जोरात कोणाच्यातरी ओरडण्याचा आवाज सत्यवीर आला. त्या बाजूला बघण्याच्या नादात लक्ष विचलित झाल्याने सत्यवीरचा तोल गेला आणि खाली वाळूवरून घसरत तो हॉलच्या दरवाजाकडे गेला. घसरत जाताना स्वतःला सावरत त्याने मागे वळून पाहिलं तर त्या दरवाजाच्या बाजूला जिथून तो धावत आला होता तिथे कोणीतरी उताणं पडलेलं होतं. बंगल्यात अंधार पडल्याने स्पष्ट काही दिसत नव्हतं. पण जे कोणी होतं ते हिंस्र श्वापद नसून माणूस होता. कदाचित सत्यवीरने मगाशी बांबूला दिलेल्या ठोश्यामुळे तो बांबू त्या माणसाला लागला होता आणि अचानक सत्यवीरला पळत आलेलं पाहून तो घाबरून किंचाळला होता. सत्यवीरने उठून स्वतःचे कपडे झटकले आणि त्या पडलेल्या माणसाच्या जवळ गेला. वेदनेने कण्हण्याचा आवाज येत होता. अंधारात जास्त काही दिसत नव्हतं पण जरा जवळ जाऊन

पाहिलं तर सत्यवीरला दिसलं ती उताणी पडलेली व्यक्ती म्हणजे हरिभाऊ होते...

"हरिभाऊ अहो तुम्ही... इथे आतमध्ये काय करताय...

तुम्ही तर बाहेर गेटजवळ होतात ना..? प्रचंड आश्चर्याने सत्यवीरने त्यांना विचारलं. पण काहीच प्रत्युत्तर आलं नाही. फक्त कण्हण्याचा आणि जोरजोरात श्वास घेण्याचा आवाज येत होता.

अरे देवा.. मगाशी बांबूला दिलेला ठोसा यांच्या डोक्याला तर लागला नाही ना? सत्यवीरच्या मनात विचार आला.

सत्यवीरने हरिभाऊंना आधाराने उठवलं. काहीही न बोलता हरिभाऊंनी आपलं शरीर सत्यवीरच्या अंगावर टाकून दिलं. त्यांचा हात खांद्यावर घेऊन सत्यवीरने बंगल्याच्या बाहेर आणलं. गेटजवळ येऊन दुचाकीच्या सीटवर त्यांना टेकून बसवलं. त्यांना कुठे लागलं कि नाही ते पाहिलं. डोक्याला छोटस टेंगुळ आलेलं होतं बाकी कुठे काही इजा नव्हती.

"अहो हरिभाऊ.. तुम्ही आतमध्ये कशाला आलात मला वाटलं कि कोणी चोर किंवा जंगली जनावर आलं कि काय म्हणून म्हणूनच मी पळत बाहेर आलो. नशीब तुम्ही बाजूला उभे होतात नाहीतर माझा ठोसा बांबूच्या ऐवजी तुमच्या तोंडावर पडला असता." कमरेवर हात ठेवून भुवया ताणत हरिभाऊंकडे पाहत सत्यवीर बोलला.

हरिभाऊंना श्वास लागायला थोडा वेळ लागला. सत्यवीर तसाच उभा होता. काही मिनिटांनी हरिभाऊ जरा स्थिर झाले. सत्यवीर यांच्याकडे पाहत ते कधी बोलतायत याची वाट पाहत थांबला होता.

"अरे बाहेर थांबलो होतो पण आतमध्ये तुला खूप वेळ लागत होता. अंधार पण पडायला लागलेला होता. बाहेर भीषण शांतात होती. मला तुझी

काळजी वाटली आणि थोडी भीतीसुद्धा कि आतमध्ये तूला एवढा वेळ का लागतोय. इतका वेळ झाला म्हणून मग मी धाडसाने आतमध्ये जायला निघालो. आतमध्ये आल्यावर वाळूवर माझ्या कातडी चपलांचा कर्रकर्र आवाज येत होता. म्हणून मग मी हळू हळू पावले टाकत चालत आतमध्ये येत होतो. तेवढ्यात मला वरच्या जिन्यावर कसलीतरी चाहूल लागली. मी घाबरून धूम ठोकणार होतो पण तू आतमध्ये होतास तुला सोडून कसं जाणार म्हणून बाजूला पडलेला मोठा बांबू हातात घेऊन तो जमिनीवर टेकत हळूहळू पुढे येऊ लागलो. तेवढ्यात कोणीतरी पळत येत असल्याचा आवाज आला मी बाजूला होत संरक्षणासाठी बांबू वर धरला. अचानक कोणीतरी पळत येऊन बांबूला ठोसा दिला आणि तो बांबू उसळून माझ्याच डोक्याला लागला. काय होतंय हे न समजून मी एक घाबरून ओरडलो आणि खाली उताणा पडलो. परत तू जवळ येऊन पाहिल्यावर समजलं कि तो पळत येणार तूच आहेस म्हणून" एका दमात हरिभाऊ सांगून मोकळे झाले.

त्यांचं हे बोलणं ऐकून खरंतर सत्यवीरला हसू आवरल नाही. बाहेर उभे असलेले हरिभाऊ आपल्या काळजीने आतमध्ये पाहायला आले होते आणि आपण त्यांना चोर आणि हिंस्र जनावर समजून बसलो. बंगल्यातील निरीक्षणाचे काम पूर्ण झाल्याने हरिभाऊंना गाडीवर मागे बसवून सत्यवीरने दुचाकी चालू केली आणि तिथून जायला निघाला. रस्त्याच्या वळणावरून दुचाकी नेताना सत्यवीरने सहज मागे वळून बंगल्याच्या दिशेने पाहिलं तर बंगला पूर्ण अंधारात बुडून गेला होता. लांबून तर तो अजूनच जास्त भयानक दिसत होता अगदी भूतबंगला असल्याप्रमाणेच.

मिस शीला

सकाळी सत्यवीर जागा झाला तेव्हा सूर्य बराच वर आला होता. बाजेवरच आळस देत तो काही क्षण तसाच पडून राहिला. हरिभाऊंच्या घरासमोरच्या छोट्याशा चुलीवर पाण्याचा हंडा तापत होता. हरिभाऊ खांद्यावरचा पंचा गरम हंड्याला लावत, तो चांगला तापला की अलगद कपाळावरच्या टेंगळावर शेक देत होते.

त्यांचं ते कसंबसं तोंड करून शेक देणं पाहताच सत्यवीरच्या डोळ्यांसमोर कालचा प्रसंग तरळून गेला.

त्याने ओठ घट्ट मिटले. हसू आवरण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

पण शेवटी..."हाहाहा..."

त्याच्या तोंडून हसण्याचा आवाज बाहेर पडलाच.

“हस बाबा हस आमच्या वेंधळेपणावर..” गंभीर आवाजात मागे वळून न पाहता आपल्या कपाळाला पंचाने शेक देत हरिभाऊ म्हणाले. सत्यवीर बाजेवरून उठत हरिभाऊंच्या शेजारी जाऊन बसला.

“माफ करा हरिभाऊ...पण कालचा प्रसंग आठवून हसल्यावाचून राहवलं नाही” सत्यवीर हसतच म्हणाला.

“मला वाटलं माझ्यामागे भुत धावतंय”हरिभाऊ चिडून म्हणाले.

"तुझ्यासारखं भुतांना नमस्कार करून उभं राहायचं धाडस नाही आमच्यात” अशी प्रतिक्रिया देऊन हरिभाऊंनी आपल्या कपाळावरील टेंगळाला शेक देणे चालूच ठेवले.

“मला तर तिथे एकाही भुताचा किंवा कोणत्या भूतसदृश विचित्र गोष्टींचा वास आला नाही.” चुलीपुढे हात शेकत सत्यवीर चवड्यावर बसला होता.

“पण वातावरण किती भयानक आणि स्मशानशांततेसारखे होतं.” बंगल्याची आठवण काढताच हरिभाऊंना हुडहुडी भरली होती.

“आजूबाजूला माणसांचा जास्त वावर नसल्यामुळे तसं वाटणं साहजिक आहे. पण मला तर तिथे वेगळेच काहीतरी जाणवले. असं वाटत होतं कि तिथे कोणीतरी चोरून लपून राहतंय” सत्यवीर म्हणाला.

हरिभाऊंच्या हातातला गरम पंचा हवेतच थांबला.

“म्हणजे... भूत?”

“नाही.”

“मग?”

“माणूस.”

“कसं काय?” हरिभाऊंनी विचारलं.

“जवळपास प्रत्येक खोलीत भिंतींवर चरे पडलेले होते ते मुद्दाम कोणीतरी पाडलेले वाटतात. जमिनीवर खोदलेले खड्डे माणसांनी खोद्ल्यासारखे वाटत होते बांधकाम करताना असे खड्डे कोणी घरात पाडत नाही. सगळ्यात महत्वाचं म्हणजे बंगल्याच्या सगळ्यात आतल्या मोठ्या खोलीत जिथे लोखंडी कपाटे ठेववलेली आहेत तिथे एका टेबलाखाली हाडे पडलेली होती. एकदम छोटी छोटी हाडे होती. कदाचित कोंबडीच्या पायांची असावीत. चिकन खालून उर्वरित हाडे तिथे कोणीतरी टाकलेली असावीत. कापडाची बोचकी आढळली ज्यामध्ये कापडांचे तुकडे होते. ती कापडं अंगा

खांद्याला गुंडाळून खिडकीत उभं राहिल्यास रात्रीत लांबून चित्रविचित्र आकार दिसत असावेत." सत्यवीरने हरिभाऊंना माहिती पुरवली.

"म्हणजे आतमध्ये कोणीतरी गुपचूप राहतंय आणि भुताचे आवाज काढतंय जेणेकरून लोकांमध्ये भीती पसरावी" हरिभाऊ डोळे बारीक करत बोलले.

"निश्चितपणे.. वरची पाहणी करून जिन्यावरून खाली येताना नेमके तुम्ही बाहेरून खाली हॉलमधे येत होतात. तुमच्या कातडी चपलेचा वाळूवर येणार कर्रकर्र आवाज ऐकल्यावर मला वाटलं कि इथे जे कोणी गुपचूप राहतंय ती व्यक्तीचं आली असणार म्हणून सावध होऊन मी पुढची पावले उचलली" सत्यवीर जागेवरून उठत म्हणाला.

"बापरे..मग जर असं असेल तर आपल्याला लगेच शेंडे साहेबांना सांगावं लागेल. ते उगाचच भुताचा धसका घेऊन घाबरू लागले" हरिभाऊ सुद्धा जागेवरून उठत उभा राहिले.

"हो ते तर करूच. पण हे असं गुपचुप पणे तिथे कोण राहतंय याचा छडा लावायला हवा. त्यासाठी रात्री गुपचूप बंगल्याच्या आवारात जाऊन दबा धरून पाहायला हवं कि आतमध्ये कोण राहतंय" गंभीर आवाजात सत्यवीर म्हणाला.

यावर हरिभाऊ काहीच बोलले नाही पण एक गोष्ट तर समजली होती कि कोणीतरी लोकांच्या नकळत तिथे वावरतंय. पण ते कोण असावं याचा शोध घेणे क्रमप्राप्त होतं. सत्यवीरने झटपट अंघोळ वगेरे उरकली आणि शेंडेंच्या गावातल्या घराकडे जायला निघाला. हरिभाऊंना उगाचच काल दमछाक झाल्याने त्यांना आराम करायला घरातच थांबा असं त्याने सांगितलं आणि एकटाच तो गावातून निघाला. कच्चा रस्ता तुडवून गावातून

इकडे तिकडे निरीक्षण करत तो शेंडेंच्या घरापाशी पोहला. गेटबाहेर एक मोठी चारचाकी उभी होती. गाडीकडे पाहतच गेट उघडून तो आतमध्ये आला. नोकरचाकर झाडांना पाणी घालण्याचं आणि वाळलेल्या पानांचा पालापाचोळा गोळा करण्याचं काम करत होते. सत्यवीरला पाहून त्यांनी ओळखलं कि हा काल हरिभाऊंसोबत आलेला त्यांचा पाहुणा आहे म्हणून कोणीही त्याला हटकल नाही. मुख्य प्रवेशद्वारातून आतमध्ये येऊन तो तडक शेंडेंच्या ऑफिसच्या कामाच्या खोलीकडे निघाला. ऑफिसच्या खोलीचा दरवाजा उघडाच होता. आतमधून जरा मोठ्याने बोलण्याचा आवाज येत होता.

"अहो मी आधीच सांगितलंय ना तुम्हाला. मला नाही विकायची माझी मालमत्ता. सध्या माझा तसा कोणताही विचार नाहीये" शेंडेंचा आवाज आला.

"हे बघा मिस्टर शेंडे, आजच्या घडीला जो भाव मिळतोय उद्या त्यापेक्षा जास्त भाव उद्या मिळणार नाहीये. तेव्हा माझं ऐका आणि हट्ट सोडा" एक मधाळ आवाज आतून आला.

सत्यवीर दरवाजाच्याजवळ येऊन उभा राहिला. आतून शेंडेच लक्ष बाहेर उभ्या असलेल्या सत्यवीरकडे गेलं.

"अरे सत्यवीर, या या आत या ..." शेंडेनी हसतमुखाने सत्यवीरला आतमध्ये बोलावलं.

सत्यवीर आतमध्ये येऊन बाजूच्या सोफ्यावर बसला. शेंडे साहेबांसमोर एक मध्यम वयाची बाई बसली होती. तिची केशरचना खूपच आधुनिक प्रकारची होती तसेच कपडे सुद्धा आधुनिक होते. तिने सोफ्यावर

बसलेल्या सत्यवीरकडे एक कटाक्ष टाकला. ती एक आत्मविश्वासू बाई असल्याचं सत्यवीरला जाणवलं. तो काहीही न बोलता शांतपणे बसला.

"ठीक आहे मिस शीला तुम्ही आता येऊ शकता. माझ्याकडे आता पाहुणे आलेले आहेत" शेंडे त्या बाईला म्हणाले.

तसं ती बाई खुर्चीवरून उठली आणि सत्यवीरकडे परत एक कटाक्ष टाकून चालत दरवाजाजवळ गेली आणि शेंडेंकडे पाहून म्हणाली "बघा नीट विचार करा परत"

"या तुम्ही मिस शीला" हाताने इशारा करत जरासं भाषेवर जोर देत शेंडे म्हणाले. त्यावर ती बाई काहीही न बोलता बाहेर निघून गेली.

"बोला सत्यवीर काय म्हणताय" टेबलावरील फाईल बाजूला ठेवत शेंडे सत्यवीरला म्हणले.

"तुम्हाला एक चांगली बातमी द्यायला आलोय मी" सत्यवीरने शेडेंना सांगितलं.

यावर शेंडेचा चेहरा जरा फुलला. "काय सांगताय काय. कोणती बातमी? बंगल्याच्या प्रकरणाचा छडा लावलात कि काय " दोन्ही हात टेबलवर ठेवत शेंडे म्हणाले.

"अगदीच तसं नाही पण तुमच्या बंगल्यावर तपासासाठी गेलो होतो. तिथे मला भूत नावाचा प्रकार मला तरी जाणवला नाही" असं म्हणत सत्यवीरने कालच्या बंगल्यावरील निरीक्षणाची संपूर्ण माहिती शेंडे साहेंबांना दिली. मिळालेली हाडे, कापडाची बोचकी. हरिभाऊंच्या आणि त्याच्या गैरसमजातून जो प्रकार घडला तो देखील सांगितला.

"अरे वाहः हे तर मस्तच झालं. म्हणजे भूतबित असलं काही नाहीये तर तिथे" आनंदाने चेकाळत शेंडे बोलले.

"निश्चीत नाहीये. भुतांच्या बाबतीत बिनघोर राहा. पण भुतांच्या नावाखाली दुसरं कोण तिथं गुपचूप राहून उच्छाद घालतंय हे मात्र शोधावं लागणार आहे. तसचं जे कोणी भूतबंगल्यात राहत आहे त्यानेच तुमच्या घरात गुपचुपपणे शिरून वस्तूंची फेकाफेक आणि रक्ताने मजकूर लिहिला असण्याची शक्यात आहे."

असं सांगत शेंडेच्या घरातील केलेली निरीक्षणे आणि घरात आडमार्गाने बाहेरून कुठून येता येऊ शकत ते सत्यवीरने शेंडेंना सांगितली.

"अहो ते तुम्ही शोधून काढलंच हो. पण भुतांच्या तावडीतून मी सुटलो याचा आनंद जास्त झाला बघा. छान बातमी आणलीत तुम्ही" शेंडे आनंदात होते.

"तुमचा कोणावर संशय आहे का? म्हणजे कोणी हितशत्रू किंवा इतर कोणी" सत्यवीरने विचारलं.

"संशय तसा कोणावर घेणार ना. हे असले प्रकार कोण करेल माहित नाही आणि मुळातच माझा स्वभाव कामाशी काम ठेवणारा असल्याने शत्रू कोणी असतील असं वाटत नाही" शेंडे बोलले.

ते दोघे बोलत असतानाच एक चष्मा घातलेला एक तरुण त्या खोलीमधे आला. त्याच्या हातात फाईलचा गठ्ठा होता.

"ती नालायक बाई परत आली होती ना? तिला एकदा सांगितलेलं कळतच नाही वाटत. बाहेर गेटवर भेटली. म्हणत होती कि साहेबांना समजावून सांग. तर मी म्हटल कि साहेबांना तो बंगला विकायचा नसताना

कशाला त्यांना भरीस पाडताय आणि हेलपाटे घालताय" तावातावाने तो तरुण बोलत होता.

त्या तरुणाच्या या वाक्याने शेंडे आणि सत्यवीरने मान त्याच्याकडे वळवली. एक चष्मा घातलेला मिशीवाला तरुण रागारागात तिथे आला होता.

"अरे हो हो अनमोल.. शांत हो. खाली बस बर आधी. त्या बाईचं सोडून देत. त्याचं कामाचं आहे ते" शेंडे त्याला शांत करत म्हणाले.

शेंडेनी त्याला शांत बसायला सांगितल्यावर तो खुर्चीत बसला. सोफ्यावर बसलेल्या सत्यवीरकडे भुवया ताणत तो पाहत होता.

अनमोलची ती नजर पाहून सत्यवीरकडे हात करत शेंडे बोलले "हे आहेत.." असं बोलून शेंडे जरा थांबले. त्यांना सत्यवीरची ओळख करून द्यायची होती. पण ती काय करून द्यावी असा विचार करत ते थोडं थांबले. कारण आपण गुप्तहेर म्हणून इथे तपास करायला आलोय हे सांगायला सत्यवीरने मनाई केली होती.

"हे आपले..हरिभाऊ आहेत ना..त्यांच्याकडे आले आहेत. हरिभाऊ शहरात असताना त्यांचे एक ख्रिचन स्नेही होते. त्यांचाच हा मुलगा सत्यवीर याचं नाव. शेंडेनी सत्यवीर व्यवस्थित ओळख करून दिली.

"आणि सत्यवीर, याचं नाव अनमोल. आमच्या पतपेढीवर क्लार्क म्हणून आहे. भरपूर मेहनती आहे.

तसं त्या तरुणाने अनमोलने हात पुढे केला. सत्यवीरने देखील हसत त्याचाशी हस्तांदोलन केलं.

“साहेब त्या बाईला वेळीच आवर घालायला हवा नाहीतर तिच्या सारखे अजून काही प्रॉपर्टी एजन्ट इथे घिरट्या घालू लागतील” अनमोल शेंडेकडे वळत म्हणाला.

“अरे अनमोल कोणीही येणार नही. हि मिस शीला फक्त महत्वाकांक्षी आहे म्हणून सारखी येतेय. बाकी इतरांना माहितीये आपण बंगला विकणार नाहीये म्हणून इथे कोणीही येणार नाही’ शेंडे आरामात खुर्चीत रेलत म्हणाले.

अनमोलच्या बोलण्यावरून सत्यवीरला एक समजलं होतं कि तो इथे येण्यापूर्वी जी बाई बसली होती ती एक प्रॉपर्टी एजन्ट असून तिचं नाव मिस शीला आहे. तिची अजून माहिती काढण्याकरिता सत्यवीर पुढे विषय वाढवत म्हणाला. “नक्की कोण होत्या या बाई. इतर कोणीही रस घेत नसताना त्याच फक्त एवढ्या का मागे लागल्यात बंगला विकत घेण्याच्या”

“अहो काय सांगू तुम्हाला सत्यवीर ती एक निर्ढावलेली एजंट आहे. जुन्या किंवा वादातल्या मालमत्ता विकत घेऊन परत त्या मोठ्या भावात लोकांना विकायच्या हाच व्यवसाय आहे तिचा” अनमोलने माहिती पुरवली.

“हो.. तिचे वडील आधी हा व्यवसाय करायचे. त्यांच्या माघारी आता हि बाई त्यांचा व्यवसाय सांभाळते.” शेंडेनी पुढची माहिती दिली.

“पण त्या बंगल्यात तर भुते आहेत ना. अशा भुतांनी पछाडलेल्या बंगल्याल्या विकत घेऊन नंतर कोणाला विकणार त्या” सत्यवीरने मुद्दाम अनमोलसमोर आपली शंका उपस्थित केली.

“भुतांच्या नावाखाली इतर कोणीहि ती मालमत्ता घेणार नाही म्हणून स्वस्तात प्रॉपर्टी विकत घेऊन नंतर ती पाडून त्यावर एखादी व्यावसायिक

इमारत किंवा हॉटेल्स बांधून नफा मिळवायचा हा प्लान असतो या लोकांचा" अनमोलने चष्मा सावरत म्हणाला.

"अच्छा असं आहे तर" एवढ बोलून सत्यवीर शांत बसला.

"चला मी निघतो आता. फाइल्स द्यायला आलो होतो फक्त" असं म्हणून अनमोल जागेवरून उठत म्हणाला.

"मी सुद्धा निघतो. साहेबांना भेटायला आलो होतो सहजच" हसत हसत सत्यवीर म्हणाला आणि अनमोल सोबत बोलून या मिस शिलाची अजून माहिती घ्यावी म्हणून तिथून निघाला. शेंडेंचा निरोप घेऊन दोघेही सोबतच घराबाहेर बाहेर पडले आणि गेटमधून बाहेर पडून सोबत जाऊ लागले.

"सत्यवीर तुम्ही कामधंदा काय करता" अनमोलने विचारलं.

"मी काही विशेष नाही. असचं हाताला येईल ते काम करत असतो. तुम्ही कधीपासून आहात शेंडे साहेबांकडे" सत्यवीर म्हणाला.

"मी काही महिने झाले त्यांच्याकडे काम करतोय. कोणाचा आगापिछा नसताना इथे काम शोधत आलो होतो. लोकांनी शेंडे साहेबांचं नाव सुचवलं. मग त्यांच्याकडे काम मागायला गेल्यावर त्या सद्गृहस्थाने काम दिलं. माझ्यावर खरोखरच उपकारच केले बघा त्यांनी" अनमोल भावूक होऊन म्हणाला.

"हो हो खरंय.. शेंडे साहेब मनाने तसे भावनाशील आहेतच. पण भूतांचा खूपच धसका घेतलाय त्यांनी. लोकं इथे गावात चर्चा करताना ऐकलं मी" सत्यवीरने मुद्दाम विषय छेडला.

“हो हेही खरंय, पण त्यांच्या याच भावूक स्वभावाचा लोकं गैरफायदा घेतात. जसं कि मेहतांनी घेतला” अनमोलने जरा घुश्यातच सांगितलं.

“मेहता म्हणजे कोण?” बंगल्याच्या आधीच्या मालकाबद्दल अनमोलकडून अधिक माहिती मिळवण्याच्या उद्देशाने सत्यवीरने अजाणतेपणाचा आव आणत विचारलं.

“आधी ती जागा मेहता नावाच्या एका माणसाची होती. शेंडेसाहेबाचं आणि त्याचं चांगलंच जमायचं. नंतर त्यांच्या मुलीचा दुर्दैवी मृत्यू त्या घरात झाला. मेहता कुटुंबियांना ते घर सोडून जावं लागलं. पण जाताना इथे कशाला मालमत्ता ठेवायची म्हणून भावनिक होऊन मेह्तांनीच शेंडेना गळ घातली आणि त्यांना जागा विकत घ्यायला लावली. शेंडेनी सुद्धा ती बंगला असलेली जागा विकत घेतली आणि अडकले” अनमोलने खाली मान घालत सांगितलं.

“ओहो किती नुकसान झालं त्यांचं आणि आता तर ती मालमत्ता घ्यायला एजन्ट लोकांच पेवच फुटलं असेल नाही ” सत्यवीरने त्याच्या पाठोपाठ सुस्कारा सोडला.

“आधी झालं तसं. पण शेंडेनी कोणाला भिक घातली नाही. एवढी महागातली मालमत्ता स्वस्तात कोण देईल हो. पण हि मिस शीला हि काही पिच्छा सोडेना साहेबांचा” रागातच अनमोल म्हणाला.

“या मिस शीला यांनी या मालमत्तेत जरा जास्तच लक्ष घातलं आहे” सत्यवीरने विचारलं.

“हाडाची प्रॉपर्टी एजन्ट आहे ती बया. अशा बऱ्याच वादातल्या मालमत्ता तिने स्वस्तात घेऊन लोकांना विकल्यात”

“हि भूतबंगला असलेली प्रॉपर्टी मिळाली तर तिच्या फायद्याचा सौदा ठरणार आहे तर” सत्यवीर म्हणाला.

अनमोलने यावर फक्त मान डोलावली.

“खूपच वाईट हो.. बिचाऱ्या साहेबांना किती मनस्ताप होत असेल” सत्यवीरने माहिती काढण्याच्या उद्देशाने विचारलं.

"हो खरंय.. आधीच बंगल्याचं प्रकरण आणि त्यात कामाचा व्याप याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर व्हायला नको म्हणजे झालं" अनमोल उसासा टाकत म्हणाला.

"तुम्ही गेलाय का कधी बंगल्यावर.. काय प्रकार होतात हो नक्की तिथे?" सत्यवीरने विचारलं.

“मी अजून गेलो नाही तिथे त्यामुळे मला सांगता येणार नाही पण लोकं बऱ्याच गोष्टी सांगत असतात. त्यांना दुसरी कामेच काय आहेत” अनमोलने सांगितल.

चालत चालत दोघेही पुढे नानांच्या घरापुढून जात असतानाच घराच्या दरवाजातूनच नानांनी आवाज दिला.

“अरे अनमोल... काय रे, पाहुण्याला घेऊन गावाची मोजदाद चालू आहे का?”

दोघेही थांबले.

“काही नाही असचं फिरतोय” कपाळावर आठ्या देत अनमोल म्हणाला. ‘आता हा उपटसुंभ उगाचच वेळ खाईल’ असं पुटपुटत अनमोल पुढे चालू लागला.

“बरं झालं. मला वाटलं लग्नाची बोलणी सुरू झाली की काय!”

सत्यवीरच्या चेहऱ्यावर हसू उमटलं. अनमोल मात्र निर्विकार.

"थांब कि जरा चहा घेऊन जा" नानांनी नेहमीप्रमाणे आपली टकळी चालू केली.

"नाही मला काम आहे" असं अनमोल म्हणाला. नानांशी बोलत बसणं म्हणजे वेळेचा अपव्यय असं अनोमोलच मत होतं.

सत्यवीर मात्र नानांशी थोडं बोलायचं म्हणून थांबला. पण अनमोल मात्र कामाचा बहाणा करून तिथून निसटून गेला.

नानाच्या घराजवळ जात सत्यवीर बोलला- "काय म्हणता नाना"?.

"आमचं काय.. आरामच. पण तुम्ही शेंडेसाहेबांकडे गेला होतात म्हणे? काय म्हणतात ते?"

"तिथे एक बाई आली होती. तिच्याशी बोलत होते." सत्यवीरने आगाऊपणाने माहिती दिली.

"बाई?" हा शब्द ऐकताच नानांचे कान टवकारले. "कशी होती? तरुण की..."

सत्यवीर लगेच हसत म्हणाला "अहो, तुम्ही समजताय तशी नाही. बंगल्याच्या कामासाठी आली होती."

"अरेरे... उगाच माझी उत्सुकता वाढवलीस.. मग ती कोण होती?"

"बंगल्याच्या संदर्भात बोलायला ती आली असल्याचं वाटतं होतं." सत्यवीर म्हणाला.

"मग ती मिस शीला असेल. मालमत्ता खरेदी विक्रीची कामे करते. कोणी घेत नसलेल्या किंवा वादातल्या मालमत्ता घेणे हा तिचा हातखंडा आहे" नाना बोलले.

“शेंडेंच्या भूतबंगल्यात भारीच रस दिसतोय तिला” सत्यवीर म्हणाला

“असणारच.. तो बंगला कोणी घेणार नाही म्हणून स्वस्तात मिळणार ना तिला” नाना पोट खाजवत म्हणाले.

“पण बंगल्यात तर भुते आहेत ना” सत्यवीर उगाचच घाबरत बोलला.

“भुते आहेत असं लोकं म्हणतायत. आत जाऊन कोणी पाहिलंय तेव्हा“ नाना म्हणाले.

“तुम्हाला काय वाटतं तिथे खरंच भुते असतील” सत्यवीरने साळसूदपणे विचारलं.

“मला नाही वाटतं. लोक उगाच रात्रीत बंगल्याच्या आसपास असणाऱ्या झाडाच्या काळ्या सावल्यांना भुते म्हणत असावीत.” नाना बोलले.

“मग तुम्ही बंगल्यात जाऊन भुते आहेत वा नाहीत याचा शोध घेऊन लोकांना का नाही सांगत” सत्यवीर म्हणाला.

“छे छे .. मी कशाला जाऊ तिथे, मला काय दुसरी कामे नाहीत” अंग झटकत नाना बोलले.

“मग बंगल्यात मेहतांची मुलगी अवनी हिच भूत दिसतं असं लोकं का म्हणतायत” सत्यवीर प्रश्नावर प्रश्न विचारत होता.

“लोकं मुद्दाम या कानाच त्या कानाला लागून अफवा पसरवतात. ती शीलाच मालमत्ता स्वस्तात मिळवण्याच्या हेतूने मुद्दाम लोकांमध्ये अशा अफवा पसरत असावी” नाना भुवई उडवत म्हणाले.

नानांच्या या तर्कावर मात्र सत्यवीर विचारात पडला. मालमत्ता काबीज करणाच्या अट्टाहासापोटी मिस शीला या गोष्टी करू शकते. त्यात

तिचा भरपूर फायदा आहे. कि दुसरीच कोणती तरी व्यक्ती यामागे असू शकेल. पण शेंडे मात्र बंगला स्वस्तात न विकण्यावर ठाम आहेत. जो कोणी भुताच्या नावाखाली बंगल्यात रात्री अपरात्री वावरतोय त्याला शेंडेंनी वा इतर कोणीही या बंगल्यात राहायला येऊ नये असं वाटतंय. पण असं करण्यामागे त्याचा हेतू काय असावा? मिस शीलाचा यामध्ये हात असू शकेल का? सत्यवीर मनातल्या मनात विचार करू लागला. नक्की बंगल्यात किती जण वावरतात याचं देखील गणित कळत नाहीये. कधी लोकांना बंगल्यात विचित्र आवाजात ऐकायला येतात तर कोणाला बाई दिसते. हे नक्की प्रकार तरी काय आहे. कारण ज्या कोणी व्यक्ती यामागे आहेत त्यांचा हेतू निश्चितपणे निर्भेळ नाहीये. इथे काहीतरी वेगळीच डाळ तिथे शिजतेय असं राहून राहून सत्यवीरला वाटू लागलं होतं.

अद्दल

गावातीलच एका छोट्याश्या हॉटेलमध्ये सत्यवीर नाश्ता करत बसला होता. हॉटेलमध्ये इतर कोणीही गिऱ्हाईक नव्हते. शेंडेंच्या बंगल्यातील होणाऱ्या भुताटकीच्या घटनांमागे नक्की कोण असावे याचा विचार करत तो बसला होता. गावात नीट व्यवस्थित चौकशी करावी असा त्याचा विचार होता. भूतबंगल्यावर जाऊन पाळत ठेवणे देखील गरजेचे होते. हरिभाऊ आपली घरातली कामे उरकून इथेच येणार होते. नंतर पुढचं काय ते ठरवावं असं विचार करत सत्यवीर बसलेला असतानाच त्याला बाजूच्या रस्त्यावरून एक गाडी हॉटेलसमोरुन पुढे गेलेली दिसली.

त्याची नजर त्या गाडीवर गेली असता गाडीमध्ये शेंडेंचा मुलगा भैरव आणि त्यांचा मेहुणा रावसाहेब बसलेले दिसले. मागच्या सीटवर पाठीमागे गावातीलच दोन तरुण पोरं उगाचच दात काढत बसलेली होती. गाडीला छत नव्हतं. ती एक ग्रामीण भागातील जीप होती.

सत्यवीरने भैरव आणि रावसाहेबांना ओळखलं. ते नक्की कुठे जातायत हे पाहावं म्हणून सत्यवीर आपलं खाण संपवून उठला आणि हॉटेलमालकाकडे गेला.

"दादा.. मगाशी एक जीप या मार्गावरून पुढे गेली ती नक्की कुठे गेली असेल" सत्यवीरने हॉटेलमालकाला विचारलं.

"ती जीप व्हय. शेंडे साहेबांच्या पोराची जीप व्हती ती. गेले असतील उंडारायला तळ्याकड" हॉटेलमालकाने माहिती पुरवली.

"अच्छा म्हणजे पुढे तळे आहे तिथे जातात तर ते " सत्यवीर म्हणाला.

“हा तित तळ हाये. तित जात्यात.. भलतीच अवखळ कार्टी हायती बघा. डोक्याला नुसता उच्छाद आनत्यात.” हॉटेल मालक वैतागून म्हणाला. हॉटेल मालकासोबत बोलून सत्यवीरने ती जीप कुठे गेली याची माहिती मिळवली आणि ते नक्की काय करतायत हे पाहायला त्यांच्यामागे निघाला.

तळ्याचा परिसर तिथून जास्त काही लांब नव्हता. गावातील बाया बापड्या तिथे धुणं धुवायला येत असायच्या. सत्यवीर काही मिनिटातच त्या ठिकाणी पोहोचला. समोर त्याला दिसलं कि तळ्याच्या ठिकाणी जीप उभी करून भैरव आणि रावसाहेब तळ्याच्या काठावर धुणं धुणाऱ्या बायांकडे पाहत काहीतरी शेरेबाजी करत उभे होते. सोबतची दोन पोरे उगाचच खी खी करत हसत त्यांना साथ दत होती.

जीपमधून भैरव, रावसाहेब आणि त्यांच्यासोबतची दोन तरुण पोरे उतरली. भैरवने हात कमरेवर ठेवत तळ्याकडे पाहिले.

"अरे मामा, आज तर तळ्यापेक्षा इथली गर्दीच जास्त सुंदर दिसतेय!" तो मोठ्याने म्हणाला. सोबतचे दोघे तरुण खी-खी करत हसू लागले.

रावसाहेबही मोठ्याने म्हणाले "इतका वेळ धुणं धुतायचं की.. आमच्याकडेही एकदा बघायचं?"

स्त्रियांच्या चेहऱ्यावर अस्वस्थता स्पष्ट दिसू लागली. काहींनी डोकी खाली घातली. तर काहींनी मनातल्या मनात शिव्याही दिल्या. गावातील गरीब बाया बिचाऱ्या गपगुमान धुणं धूत होत्या.

तेवढ्यात मागून शांत पण ठाम आवाज आला.

"दुसऱ्यांचा अपमान करून स्वतःला मोठं समजणं ही फार स्वस्त मर्दानगी आहे."

सगळ्यांनी मागे वळून पाहिलं. सत्यवीर तिथे उभा होता.

सत्यवीर तिथे पोहोचला आणि त्या जीपच्या जवळ गेला. त्याला भैरव आणि रावसाहेबांच हे वागणं अजिबात आवडलेलं नव्हतं. भैरव मस्तवालपणे उभा होता. शेजारीच रावसाहेब उभा होता. सत्यवीर जवळ येताच त्या दोघांची नजर त्यावर गेली.

“आ..इकड कुट फिरताय म्हणावं आता पाव्हण” बेरक्या नजरेने रावसाहेब सत्यवीरला पाहत म्हणाला.

"काही नाही तुम्हा दोघांचे नक्की काय चाललेलं आहे तेच पाहायला आलोय" सत्यवीरने रावसाहेबाला डोळ्यात डोळे घालून उत्तर दिलं.

सत्यवीरच्या या उलट बोलण्याने भैरव चांगलाच चिडला. कोण कोठला नवखा माणूस आपल्या गावात येऊन आपल्याला वाटेल तसं बोलतो म्हटल्यावर त्याची चांगलीच सटकली.

“ए...आर बसतो का गप.. उलटं बोलतोस का आम्हाला” भैरव कडाडला.

“असू द्या भाचं.. आपल्या हरिभाऊकड आलंय हे बेणं. नवीन मानसाला आपली अजुक वळक न्हाही” रावसाहेब छद्मी हास्य करत म्हणाला.

“अरे हो ओळखीवरून आठवलं. तुम्ही शेंडे साहेबांचे सुपुत्र आहात ना? कामधंदा करता कि नाही काही? कि आत्ता जे करताय हेच काम आहे तुमचं. हे शेजारी उभे असलेले तुमचे मामा ना? तुम्हाला काही चांगला उपदेश देत असावेत असं वाटत नाही” सत्यवीरने अतिशय तिखट आवाजात भैरवला सुनावलं होतं.

त्याच्या या बोलण्याने धुणं धुणाऱ्या बायकासुद्धा हा कोण नवीन माणूस शेंडेंच्या मुलाला बोलतोय म्हणून धुणं धुवायचं काम सोडून पाहून लागल्या. सत्यवीर हे बोलण भैरवच्या जिव्हारी लागलं होतं.

"कोण रे तू? आम्हाला शिकवायला आलास?"

सत्यवीर शांतपणे म्हणाला "मी कोण आहे. यापेक्षा तुम्ही काय करत आहात ते महत्त्वाचं आहे. या बायका इथे कामासाठी आल्या आहेत. त्यांना त्रास देणं खचितच योग्य नाहीये.

रावसाहेब हसत म्हणाले "आमी फकस्त इनोद करत हुतो वो. एवढं काय बिघडलं त्यामदी?

विनोद?" सत्यवीरचा आवाज कठोर झाला. "एखाद्याला भीती वाटेल, अपमान वाटेल अशा शब्दांना विनोद म्हणत नाहीत."

भैरव चिडला "फारच शहाणपणा सुचतोय! बघा रे जरा याच्याकडे"

बाजूची दोन पोरं सत्यवीरकडे त्याला इथून हाकलून देण्यासाठी जवळ आली

त्यातील एक सत्यवीरच्या खांद्याला जोरात धक्का देऊ लागला. सत्यवीर हललाही नाही.

"हात मागे घे," तो शांतपणे म्हणाला.

त्याने पुन्हा सत्यवीरच्या कॉलरला हात लावायला हात पुढे केला.

पण सत्यवीरने चपळाईने त्याचा हात पकडला आणि त्याची बोटे पुढे वाकवून अगदी सहज त्याला बाजूला केल.

"आऽऽ"! ते हडकुळं पोरगं बोंबलत हाताला पकडून बाजूला जाऊन पडलं.

त्याला तसं पडलेलं पाहून दुसरं पोरगं सत्यवीरच्या अंगावर आलं. जसं त्या दुसऱ्या पोराने हात सत्यवीरजवळ आणला तसं त्याच्या मनगटाला पकडून सत्यवीरने असं काही वाकवल कि त्या पोराच्या मस्तकातच कळ गेली आणि जोरात ओरडून ते पोरगं हि बाजूला झालं. केवळ स्वतःचा बचाव करत सत्यवीरने त्या तरुणाचा हात अडवून त्याला बाजूला फिरवलं.

अगदी उभ्याउभ्या जागेवरून न हलताच सत्यवीरने त्या दोन्ही लुकड्या सुकड्या पोरांना सहज बाजूला केलं होतं. त्याला तसं करताना पाहून भैरव आणि रावसाहेब तर चकितच झाले होते. त्यांना वाटलं होतं हरिभाऊंच्या घरात कोणीतरी लहान सहान कामे करणारा माणूस आला असावा त्याला सहज उडवून लावूयात पण त्यांना सत्यवीरची खरी ओळख माहित नव्हती . भैरव आता रागातच सत्यवीरकडे पाहत होता. सत्यवीर मात्र अगदीच शांतपणे त्यांच्याकडे पाहत त्या दोघांच्या अगदी नजीक गेला.

“मला इतकंच म्हणायचं होतं भैरव कि, आपल्या वडिलांची गावात प्रतिष्ठा आहे ती अशी वाह्यात वागून धुळीला मिळवू नये. काहीतरी उद्योग करावा, नसेल तर वडिलांना कामात हातभार लावावा. तेही नसेल तर बंगल्यावर जाऊन तिथे खरंच भुते आहेत कि नाहीत याचा छडा लावावास” भैरवच्या नजरेला नजर देत सत्यवीर स्पष्ट शब्दात म्हणाला आणि आपल्या अंगावरचं जॅकेट काढून त्याने दुसऱ्या हातात धरलं. जसं सत्यवीरने जॅकेट काढलं तसं फक्त टी-शर्ट आणि जीन्समधे उभं राहिलेल्या सत्यवीरकडे पाहत भैरव चपापलाच. रावसाहेबांनी तर आ च वासला.

सत्यवीरची शरीरयष्टी भलतीच पिळदार होती. त्यातूनच त्याचे पोट पूर्ण सपाट आणि त्यांचे दोनही दंड भरलेले आणि जाडजूड भासत होते.

अंगातील जॅकेटमुळे सत्यवीरची शरीरयष्टी सहसा दिसून येत नसे. त्यांना मुद्दाम धाक दाखवण्याच्या उद्देशाने सत्यवीर तसं वागत होता. आपला एक हात सत्यवीरने रावसाहेबांच्या खांद्यावर ठेवला आणि मुद्दाम त्यांच्या खांद्यावर जोर दिला. तसं रावसाहेबांना खांद्यात जोरात कळ आली आणि ते जरासे कण्हू लागले. तळ्यावरील धुणं धुवायला आलेल्या बायका सुद्धा तोंडावर पदर घेऊन खुसपुसून हसू लागल्या.

भैरवच्या नजरेत नजर रोखत चेहऱ्यावर करारीपणा आणत सत्यवीर म्हणाला. "तुम्हाला दोघांना कुस्ती खेळण्याची आवड आहे हे मला माहित नव्हतं. काय आहे ना आमच्या शहरात कुस्त्यांचे आखाडे नसतात. इथे कुठे आखाडा असेल तर सांगा मला. सोबतच सराव करू आखाड्यात.. काय म्हणता?" शेवटच वाक्य एकदम हळुवारपणे म्हणत बोलत असताना सत्यवीरने रावसाहेबांच्या खांद्यावर ठेवलेल्या हाताने जोरात दाब दिला तसं रावसाहेब कळवळला.

त्यांच्या चेहऱ्यावर वेदना स्पष्ट दिसून आली. आधीच अधू झालेल्या हाताला पकडून थांबलेली पोरं पाहून भैरव गांगरला होता. त्यातच रावसाहेबांच वेदनेने भरलेल तोंड पाहून भैरवने आवंढाच गिळला काय बोलावे हे त्याला सुचेना. काहीही न बोलता आपलं भय लपवत तो जीपच्या ड्रायव्हर सीटवर जाऊन बसला आणि म्हणाला.

"चल मामा असल्या लोकांच्या तोंडी आपल्याला लागायचं नाहीये"

रावसाहेब कण्हत कण्हत आपला दंड पकडत बाजूला जाऊन बसला. ती दोन पोरसुद्धा गुपचूप जीपच्या मागे जाऊन बसली. क्षणार्धातच जीप सत्यवीर पुढून निघून गेली. सत्यवीर मात्र गालातल्या गालात हसत होता.

तळ्यावरील बायका कौतुकाने सत्यवीरकडे पाहत होत्या. आज भैरव आणि रावसाहेबांना गावात अद्दल घडवणारा कोणीतरी भेटला होता.

तळ्यावरून सत्यवीर परत निघाला. मगाशी थांबलेल्या हॉटेलमध्ये तो परत आला होता. तिथे हरिभाऊ त्या हॉटेलमालकासोबत गप्पा मारत उभे होते. सत्यवीरने हरिभाऊंना तळ्यावरील घडलेला प्रसंग सांगितला तसं हरिभाऊ चकित होऊन ऐकतच राहिले. पण एका अर्थी बरंच झालं त्या दोघांचं जरा अतीच झालेलं होतं त्यांना अशा प्रकारें अद्दल घडवणारा कोणीतरी हवाच होता. गप्पाटप्पा झाल्यावर सत्यवीरने आज रात्रीच्या वेळी बंगल्यावर पाळत ठेवायला जायचा प्लान हरिभाऊंना सांगितला. चाचरतच हरिभाऊंनी त्या गोष्टीला मान्यता दिली.

त्यानुसार संध्याकाळ झाल्यावर दोघेही हॉटेलमालकाच्या गाडीवरून बंगल्याच्या दिशेने रवाना झाले. काही वेळातच बंगल्याच्या परिसरात ते दोघे येऊन पोहोचले. बंगल्याच्या आसपास नेहमीसारखीच स्मशानशांतता होती कसलाही आवाज न्हवता. मंद वारा वाहत होता. आपली गाडी बाजूच्या झाडीत कोणाला दिसू नये अशी लावली. सत्यवीर आणि हरिभाऊ बंगल्याच्या बाजूला जिथे पत्र्याचं शेड उभं होतं तिथे येऊन पोहोचले. तिथून पुढे उसाची शेते चालू होत होती. शेडच्या मागून बंगला व्यवस्थित दिसत होता, तिथे एका दगडावर सत्यवीर बसला.

“आपण इथे बसलो आहोत खरे पण नक्की कोण येत असेल इथे रात्रीच्या वेळी काय माहित “ बाजूच्याच एका दगडावर बसत हरिभाऊ बंडीतून पानाचे पुडकं काढत म्हणाले.

“जे कोणी असेल ते लवकरच समोर येईल“ सत्यवीर शेडच्या आडूनच बंगल्याकडे पाहत बोलला.

“पण ते जे कोणी असतील हे आपल्याला कसं समजणार आणि समजल्यानंतर नक्की आपण करणार काय आहोत.” हरिभाऊ बोलले.

“बंगल्यात ते कोणत्या तरी मार्गाने येत असावेत आणि परत त्याचं मार्गाने जात असावेत जात असताना एका बेसावध क्षणी त्याचावर झडप घालून त्याच्या मुसक्या आवळायच्या.. या शेडमध्ये दोरखंड असेलच ना” सत्यवीर म्हणाला.

“हो आहे.. बांधकामाच्या साहित्यासाठी लागतो तो दोरखंड आणि अजून सामानदेखील आहे” हरिभाऊ तोंडात पान टाकत म्हणाले.

सत्यवीरने आपल्या पँटच्या चोरकप्प्यात हात घालून चाकू नीट व्यवस्थित जागेवर आहे कि नाही ते पाहिलं. हरिभाऊंनी ते पाहिलं आणि म्हणाले “तू या चाकूचा वापर करावा अशी वेळ येऊ नये “

“वेळ आली तर करावाच लागेल हरिभाऊ. या ठिकाणी चाकूच पुरेसा आहे. नाहीतर गरज पडली तर मी छोटंसं पिस्तुल देखील जवळ बाळगून असतो.” सत्यवीरने माहिती पुरवली.

ते दोघे बोलत असतानाच बंगल्याच्या समोर रस्त्यावर एक मोटारगाडी येऊन थांबली. त्यातून एक बाई उतरून गाडीजवळूनच बंगल्याकडे पाहू लागली. गाडीच्या आवाजाने सत्यवीर आणि हरिभाऊ याचं लक्ष बंगल्यासमोरच्या रस्त्याकडे गेलं.

“हि तर ती मिस शीला आहे. हि तिथे उभं राहून काय करतेय” हरिभाऊ जरा डोकं वर काढत म्हणाले.

“पाहूयात नक्की ती काय करतेय इथे” भुवया ताणत सत्यवीर रस्त्यावरच्या त्या गाडीकडे पाहत म्हणाला.

काहीवेळ बंगल्याकडे एकटक पाहत निरीक्षण करून मिस शीला आपल्या गाडीत परत बसली आणि रस्त्यावरून निघून गेली.

“हि बाई परत आली तशीच निघून गेली” हरिभाऊ डोळे बारीक करत बोलले.

“नक्कीच ती काहीतरी पाहत उभी होती हरिभाऊ.. बंगल्याकडे मात्र विचित्र नजरेने पाहत होती ती” शेडच्या पत्र्याच्या मागे लपत सत्यवीर म्हणाला.

भुतांचा छडा

संध्याकाळ सरून आता चांगलाच अंधार पडलेला होता. रस्त्यावर शुकशुकाट पसरला होता. सत्यवीर आणि हरिभाऊ शांतपणे पत्र्याच्या शेडमागे बसलेले होते. कोणत्याच बाजूने ते तिथे बसलेल आहेत हे लक्षात येत नव्हतं. बंगल्याच्या मुख्य दरवाजापासून ते मागच्या भागापर्यंतचा सगळा भाग या जागेवरून नजरेच्या टप्प्यात येत होता. मध्ये बराच गेला हरिभाऊंना आता डुलकी येऊ लागली होती. सत्यवीर मात्र टक्क नजर लावून बंगल्याच्या सगळ्या बाजूला पाहत बसला होता, रात्रीच्या अंधारात स्पष्ट दिसतं नव्हतं. म्हणून तीक्ष्ण नजरेने तो सगळीकडे पाहत होता.

अजून किती वेळ असं बसायचं म्हणून हरिभाऊ विचारणारच होते पण तितक्यात बंगल्याच्या मागच्या बाजूला शेताच्या बाजूने काही काळ्या आकृत्या पुढे येताना दिसल्या. सत्यवीर सावध झाला आणि त्याने हरिभाऊंना हलवून सावध केलं. पुढे जाऊन शेडच्या मागे चिकटून सत्यवीर हळूच त्या बाजूला पाहू लागला. अगदी सावकाशपणे चालत त्या आकृत्या बंगल्याच्या मागच्या भागातील खिडकीतून बंगल्यात गेल्या.

“कोणीतरी गेलंय बंगल्यात सत्यवीर. आता काय करायचं आपण” भेदरलेल्या अवस्थेत हरिभाऊ म्हणाले.

“थोडावेळ वाट पाहूयात काय होतंय ते” सत्यवीर आपली नजर न हटवता तिथे पाहत म्हणाला.

की वेळाने बंगल्यातून मोठ्याने कुssss असा आवाज ऐकू आला. आवाज एवढा भयानक होता कि हरिभाऊ घाबरून सत्यवीरच्या मागेच

येऊन उभे राहिले. थोडावेळाने चित्रविचित्र आवाजात किंकाळी मारल्याचा आवाज आला.

सत्यवीर आणि हरिभाऊ शांतपणे आवाज ऐकत उभे होते. फारच विचित्र आवाजात त्या किंकाळ्या ऐकू येत होत्या. कोणीतरी व्यवस्थितपणे अशा आवाजात ओरडत होते कि ते ऐकून कोणालाही वाटेल कि इथे भुते वावरत आहेत. काही वेळ आवाज काढल्यानंतर शांतता पसरली. सत्यवीरची विचारचक्रे फिरू लागली. बंगल्यात ठिकठिकाणी उघड्या खिडक्यांच्या जागा आहे तिथूनच कोणीतरी आतमध्ये शिरलं आहे. जे कोणी बंगल्यात आहे ते जिथून आलंय तिथूनच मघारी परतेल असं समजून चाललं तर ते जातानाच त्याच्यावर झडप घालणं योग्य होईल. सत्यवीर विचारात मग्न असतानाच काही किंकाळ्या आणि ओरडण्याच्या आवाजाने बंगला दणाणून गेला. रात्रीच्या त्या भयाण शांततेत या आवाजाने अजूनच भीती वाटत होती. हरिभाऊ सत्यवीरच्या मागेच उभे होते. काही वेळ शांततेत गेला आणि आवाज येणे बंद झाले.

“हरिभाऊ आता तयार राहा जे कोणी बंगल्यात मागच्या बाजूने गेलंय ते माघारी जाताना सुद्धा त्याचं बाजूने जाणार कारण तो मार्ग त्याला सुरक्षित वाटत असणार” कुजबुजत्या आवाजात सत्यवीर हरिभाऊंना म्हणाला.

यावर हरिभाऊंनी फक्त मान डोलावली. किंकाळ्याचे आवाज बंद आले तसे सत्यवीर आणि हरिभाऊ तयारीत उभे राहिले कारण आता बंगल्याच्या मागून ती व्यक्ती कधीही बाहेर येऊ शकत होती. सत्यवीरने पत्राच्या शेडमधून लांब दोरखंड घेऊन तो हरिभाऊंच्या हातात दिला आणि सावकाशपणे चालत ते दोघे बंगल्याच्या बाजूच्या भागात गेले. तिथून बंगल्याच्या मागचा भाग स्पष्ट दिसत होता. भिंतीला चिटकून सत्यवीर

आणि हरिभाऊ उभे होते. काही वेळाने बंगल्याच्या मागच्या भागात जिथे खिडकीसाठी जागा बनवली होती तिथून परत काळ्या आकृत्या हळूच बाहेर पडल्या आणि शेताच्या दिशेने जात आतमधे गडप झाल्या.

"चला हरिभाऊ सावज निघालंय" एवढं बोलून सत्यवीरने पॅन्टच्या चोरकप्प्यातून आपला चाकू बाहेर काढला आणि चपळाईने शेताच्या आतमध्ये घुसला. शेतात इतका अंधार होता कि डोळ्यांत बोट घातलं तरी दिसू नये. तरीसुद्धा अंदाज घेत घेत सत्यवीर पुढे सरकत होता. समोर असणाऱ्या त्या काळ्या आकृत्यांना आपली चाहूल लागू नये याची दक्षता घेत सत्यवीर त्यांचा पाठलाग करू लागला. मागोमाग दोरखंड हातात घेऊन सावकाशपणे हरिभाऊ त्याच्या मागोमाग येत होते. खरंतर ते मनातून घाबरलेले होते. त्या काळ्या आकृत्या आता जलदगतीने पुढे चाललेल्या होत्या.

शेतांची रांग सोडून आता एक बांध ओलांडून ते दोघे दुसऱ्या शेतात घुसले होते. सत्यवीर त्या आकृत्यापासून अंतर राखून पुढे चालू लागला पण थोड्या वेळाने त्या आकृत्या नजरेच्या टप्प्यातून दिसेनाशा झाल्या. सत्यवीर आता जरा घाईने पुढे जाऊ लागला हरिभाऊ आणि त्याच्या मधले अंतर कमी होऊ लागले. उसाच्या पाचटातून मार्ग काढत सत्यवीर पुढे चालला होता. तेवढ्यात सत्यवीरला बाजूच्या उसाच्या शेतातील गर्दीत खुसपूस ऐकू आली. कोणीतरी तिथे होतं आणि हळूहळू पुढे सरकत होतं. सत्यवीर श्वास रोखून तिकडे कान देऊन ऐकू लागला. बाजूच्या उसाच्या रांगांमधून कोणीतरी पुढे येत होतं. हळूहळू त्याच्या चालण्याचा वेग वाढला. सत्यवीर हातातला चाकू घेऊन तयार होताच. पुढे उडी घेत कोणीतरी सत्यवीरवर काठीचा वार केला. सत्यवीर आधीच सावध होता. आपल्या चाकूने बरोबर काठीचा लक्षभेद करत त्याने त्या काठीचे दोन तुकडे केले होते. अंगात बंडी

आणि पायजमा घातलेलं कोणीतरी सत्यवीरच्या बाजूला उभं होतं. हातातल्या तुटलेल्या काठीकडे आश्चर्याने पाहत ती व्यक्तीने पुढे जाऊन सत्यवीरवर हल्ला करणार इतक्यात मागून हरिभाऊंचा आवाज आला.

“केशव थांब. ते माझ्यासोबत आहेत. मी हरिभाऊ आहे “ अंधारात ओळख पटण्यासाठी हरिभाऊ बोलले

त्या आवाजासरशी सत्यवीर आणि ती व्यक्ती हातातली हत्यार हवेतच रोखून मागे पाहू लागली. हरिभाऊ धपापत्या उराने त्या दोघांजवळ येऊन पोहोचले.

“सत्यवीर हा केशव आहे. बाजूलाच याचं शेत आहे. रात्री शेताला पाणी द्यायला तो इथे येत असतो आणि केशव हा माझ्या घरात पाहुणा म्हणून आलेला माझ्या मित्राचा मुलगा सत्यवीर आहे” हरिभाऊंनी एका दमात सांगून टाकलं.

“ओह्ह हरिभाऊ तुम्ही.. ओळखलंच नाही मी...मला वाटलं शेतात रानटी जनावर फिरत आहेत कि काय म्हणून मी बघायला आलो होतो. परत यांना पाहून वाटलं कि कोणी चोर उस चोरायच्या उद्देशाने शेतात घुसला कि काय कारण तुम्ही यायच्या आधीपण काहीतरी खुसपुसत इथून पुढे गेलं होतं” केशवने सत्यवीरकडे पाहत सांगितलं.

सत्यवीर आणि केशव आता व्यवस्थित उभे राहिले होते. केशव अंगापिंडाने चांगलाच मजबूत असा तरुण होता.

हरिभाऊंनी आपण इथे का आलो आहोत याचं कारण सांगितलं.

“आपल्याला त्या व्यक्तीला पकडायला हवं आहे केशव” हरिभाऊ म्हणाले.

“आपल्याला गप्पा मारायला वेळ नाही हरिभाऊ. त्या काळ्या आकृत्या समोर जिथे गेल्या आहेत तिथे आपल्याला वेळ न दवडता लवकर जायला हवं” सत्यवीर चाकुवरची पकड मजबूत करत म्हणाला.

“काळजी करू नका इथला सगळा परिसर माझ्या पायाखालचा आहे. रात्रीच्या अंधारात सुद्धा मला इथल्या सगळ्या पाउलवाट चोख माहिती आहेत. त्यांना जास्त दूर जाता येणार नाही कारण शेतात पाणी सोडलं आहे गाळात पाय रुतून त्यांची गती मंदावेल”

असं म्हणून केशवसुद्धा त्या दोघांसमवेत त्या आकृत्यांच्या मागावर निघाला. जाताना त्याने सत्यवीर आणि हरिभाऊंना याच मार्गाने पुढे जात एका बांधावरून पुढे सरकायला सांगितलं आणि स्वतः दुसऱ्या बाजूने जात पुढे गेलेल्या त्या अनोळखी आकृत्यांच्या मागावर गेला. दोन्ही बाजूंनी पुढे जात त्या अनोळखी आकृत्यांना कोंडीत पकडायचा डाव त्यांनी आखलेला होता. सत्यवीर आता वेगात पुढे जात होता. केशवच्या मते पुढच्या शेतांना पाणी दिल्याने आतमध्ये बराच गाळ साठला असून तिथून जे कोणी गेलंय वेगात पुढे कोणालाच जाता येणार नव्हतं. तरीसुद्धा हि आलेली संधी सोडायची नाही म्हणून सत्यवीर शेताच्या बाजूबाजूने अंदाज घेत पुढे निघाला होता.

"केशव, उजव्या बाजूने जा! त्यांचा रस्ता अडव!" सत्यवीरने हळू आवाजात आदेश दिला.

"हो साहेब!" म्हणत केशव भराभर धावू लागला.

समोर उसाचे उंच शेत होते. उसाची पाने वाऱ्याने सळसळत होती. त्या सळसळीतच शेतातील गाळामधे धावण्याचा आवाज मिसळला होता.

अचानक डावीकडच्या बांधावरून एक सावली उडी मारून दुसऱ्या शेतात शिरली.

"तिकडे! तो डावीकडे गेला!" केशव ओरडला

केशव बांधावरून झपाझप धावत गेला. ओल्या मातीमुळे सत्यवीरचा पाय क्षणभर घसरला. पण तो लगेच सावरला.

"ते फार पुढे गेलेले नाहीत" तो मनातच म्हणाला.

अचानक पुढे जोरात कण्हण्याचा आवाज आला. आवाज ऐकून सत्यवीर आणि हरिभाऊ वेगात त्या बाजूने पाळायला लागले. पळता पळता हरिभाऊंचा पाय शेतातील पाणी दिलेल्या भागात अडकू लागल्याने त्यांचा वेग मंद होऊ लागला. सत्यवीर मात्र सरावाने पुढे जात आवाज आलेल्या दिशेने निघाला. थोड्याच वेळात तो एका उसाच्या रांगेतून पुढे आला तिथे त्याला केशव हातात तुटलेलं दांडकं घेऊन दिसला त्याच्यासमोर अंगावर काळा कपडा पांघरलेला एक व्यक्ती उभा असलेला दिसला. ज्याच्या हातात भला मोठा चाकू होता आणि अजून एक व्यक्ती त्याने सुद्धा काळा कपडा अंगावर पांघरलेला होता जो जमिनीवर लोळत कण्हत होता.

हातात चाकू घेतलेला तो माणूस केशववर चाल करून जाणार होताच तेवढ्यात सत्यवीरने मागून येऊन अशी काही ढुशी त्या माणसाला दिली कि तो त्याच्या तोंडावर जाऊन पडला. मग क्षणाचाही विलंब न करता सत्यवीरने त्याच्या हातातील चाकू काढून बाजूला फेकला आणि हाताने एक जोरदार फटका त्या पडलेल्या माणसाच्या कानावर दिला तसा तो माणूस देखील कानाला हात लावून कण्हत पडला. काही वेळात हरिभाऊ दोरखंड घेऊन पळत पळत आले.

“इथे जवळपास कुठे विसाव्यासाठी जागा आहे का?” सत्यवीरने केशवला विचारलं.

“हो जवळच माझं एक छोटं खोपट आहे, रात्री पाणी द्यायला शेतात आलं कि आम्ही तिथे आराम करतो” केशवने माहिती दिली.

“अच्छा मग आता यांना तिथेच नेऊन बांधून ठेवूयात आणि यांची चांगली चौकशी करूयात” असं म्हणत सत्यवीरने हरिभाऊंकडून दोरखंड घेतला आणि कण्हणाऱ्या त्या दोन्ही इसमांचे हात बांधून त्याची टोक पुढे केशवच्या आणि मागे स्वतःच्या हातात घेऊन केशवच्या खोपटाकडे निघाला.

खोपट जवळच असल्याने ते लवकरच तिथे पोचले. छोट्याश्या खोपटांत आतमध्ये एक लाकडी बेड आणि शेतीची अवजारे होती. केशवने आतमध्ये जाऊन दिवा लावला. सत्यवीरने त्या दोन्ही इसमांचे हात आणि पाय बाजूच्या खांबाला दोरखंडाने बांधून टाकले. हरिभाऊ दारातच उभे होते.

“बोला आता, कोण आहात तुम्ही दोघं आणि बंगल्यात काय करत होतात” बाजूच्या बेडवर बसत सत्यवीरने प्रश्न विचारायला सुरुवात केली.

ते दोघेजण दिसायला चांगलेच बदमाष वाटत होते. दोघे अजूनही कण्हत होते. केशवच्या दांडक्याचा प्रहार एकाच्या कपाळावर बसल्याने तिथली जागा सुजून चांगलीच लालसर झालेली दिसत होती. त्यातला एकजण वजनाने चांगलाच जाडजूड असून दुसरा मध्यम शरीरयष्टीचा होता. दोघांच्या अंगात जुनाट मळकट कपडे होते जेणेकरून अंधारात ते उठून दिसू नयेत त्यातच अंगावर काळे झगे असल्यासारखे कापड घातलेलं होते.

“अ..आ..आम्ही चोर आहोत.. बंगल्यात क.. काही मिळते का हे बघायला आम्ही चोरून आत शिरलो होतो. माझं नाव रंगा आणि हा माझा साथीदार बाळू” रंगा कण्हत म्हणाला.

“चोर?” केशवने भुवया उंचावल्या "चोरापेक्षा नाटक कंपनीचे कलाकार जास्त दिसताय”.

“बंगल्यात गेल्यावर मोठमोठ्याने आवाज का काढत होतात.. किंचाळत का होतात” हाताची घडी घालत गंभीरपणे सत्यवीरने प्रश्न केला.

केशव आणि सत्यवीरला पाहून ते दोघे चांगलेच घाबरले होते.

“ते.. ते..असंच कोणी इथे येऊ नये म्हणून आम्हाला पकडू नये म्हणून..आम्हाला सोडून द्या आम्ही परत इथे येणार नाही कधी” रंगा चाचरत्त म्हणाला. तो धादांत खोटे बोलत होता हे सत्यवीरला ठावूक होतं आणि बऱ्या बोलाने तो सांगणार न्हवता

सत्यवीर म्हणाला “केशव मला वाटतं तुझा मगाच्या दांडक्याचा प्रसाद यांना अजून हवाय त्याशिवाय हे खरं बोलणार नाहीत”

सत्यवीरच्या या वाक्यासरशी केशवने बाजूला पडलेले दांडके उचलले आणि काही कळायच्या आत दोघांच्या नडग्यांवर जोरात हाणले. तसे रंगा आणि बाळू मोठ्याने ओरडले.

"आता सांगताय कि अजून मारू..." सत्यवीरने जरबेने विचारलं.

“सांगतो सांगतो...” कण्हत रंगा पटकन बोलला “आम्हाला रात्री तिथे मोठमोठ्याने आवाज काढण्यासाठी आणि लोकांना घाबरवण्यासाठी पैसे दिले होते”

“कोणी दिले होते..” सत्यवीरने विचारलं.

“आम्हाला नाही माहित त्याचा चेहरा नीट पहिला नाही” बाळू तडफडत म्हणाला. त्याचे दोन्ही हात बांधल्याने त्याला दुखऱ्या भागावरून हातदेखील फिरवता येत नव्हता.

“म्हणजे...नीट काय ते स्पष्ट सांगा” सत्यवीर म्हणाला.

कण्हत कुथत ते दोघेही गडबडा लोळत होते आणि तशाच अवस्थेत ते बोलू लागले.

“काही महिन्यांपूर्वी एका व्यक्तीने आमच्याशी संपर्क साधून आम्हाला पैसे दिले होते आणि रात्री अपरात्री बंगल्यात जाऊन चित्रविचित्र आवाज काढायला सांगितले होते. त्या व्यक्तीचा चेहरा त्याने लपवला असल्याने आम्हाला कळले नाही कि तो कोण आहे”

“ओह्ह असं आहे तर... म्हणजे रात्री अपरात्री तुम्ही तिथे जाऊन ओरडत होतात का?

“अ..हो रात्री तिथे थांबायचो. कधी कधी उशीर झाला कि जाताना जेवणाचं पार्सल नेऊन जेवण सुद्धा तिथेच करायचो” जाड शरीराचा रंगा म्हणाला.

“चिकन खाऊन हाडांचे तुकडे तुम्हीच टाकले आहेत तर तिथे... बऱ मग तुमच्या सोबत दुसरी कोणी बाई पण सामील आहे काय यामध्ये जी साडी घालून खिडकीत उभी राहून लोकांना घाबरवते” सत्यवीर म्हणाला.

“न.. ना.. नाही नाही बाई कोणी नाही आम्ही दोघेच आहोत” दोघेही एकदम म्हणाले.

थोडासा विचार करून सत्यवीरने परत प्रश्न केला “बंगल्यात आतमध्ये खड्डे कशाला पाडलेत तुम्ही?”

“ना.. नाही आम्हाला माहित नाही.. आम्हाला नाही माहित तिथे खड्डे का पडलेत. आम्ही तिथे रात्री जायचो त्यामुळे एवढ काही कळत नसायचं. तसंपण आम्ही इतर कुठल्याच गोष्टीकडे लक्ष न देता पैसे मिळतात म्हणून गपचूप सांगितलेलं काम करून निघून यायचो” रंगा केविलवाणा भाव करत म्हणाला.

“मी सुद्धा रात्री पाणी द्यायला यायचो तेव्हा उसाच्या शेतात फिरायचो. उसाच्या पाचटातून खुसपुसत जातानाचे आवाज अनेकदा मी ऐकले पण मला वाटलं कोणतातरी जंगली जनावर किंवा सरपटणारा प्राणी असेल म्हणून दुर्लक्ष केलं होतं. आजपण तसाच आवाज ऐकून मी जवळ जाऊन पाहावं म्हणून आलो होतो. तेव्हा तुम्ही दिसलात” केशवने सांगितलं

एकंदरीतच हे चोर कोणाच्यातरी सांगण्यावरून बंगल्यात रात्री घुसून किंकाळ्या मारत असावेत जेणेकरून हा बंगला भूतबंगला वाटावा. पण हे करायला त्यांना कोणी का सांगितले बरे असावे असं सत्यवीरला वाटून गेलं.

सत्यवीर खोपटच्या बाहेर आला. बाहेर सगळीकडे अंधार पसरलेला होता. समोर पसरलेल्या शेतांकडे पाहत विचार करू लागला. सत्यवीरच्या मागोमाग हरिभाऊ खोपटातून बाहेर आले.

“आता यांचं काय करायचं सत्यवीर” प्रश्नार्थक मुद्रा करून हरिभाऊ म्हणाले.

“उद्या सकाळ झाली कि यांना पोलिसांच्या ताब्यात देऊन टाकूयात.” सत्यवीर शांतपणे म्हणाला.

“हो ते करूच.. पण यांना हे कृत्य करायला कोणी सांगितलेलं असेल. संध्याकाळी आपण पाळत ठेवताना मिस शीला तिथे आली होती. तिनेच

तर नाही ना कोणाकडून तरी यांना पैसे देऊन हे काम करायला सांगितलं" हरिभाऊ म्हणाले.

"मिस शीलाची पण चौकशी करूच सत्य काय ते लवकरच समजेल. पण भूतबंगल्यात कोणती भुते आहेत हे आपल्याला समजलं आहे त्यामुळे आता तिथे जायला घाबरण्याची गरज नाहीये" सत्यवीर म्हणाला.

हे दोघे बोलत असतानाच खोपटातून केशव बाहेर आला आणि सत्यवीर जवळ उभं राहून त्याला जवळून निरखून पाहू लागला. तो असं का पाहत होता हे दोघांना पण कळेना.

"तुम्ही शहरात काम करणारे गुप्तहेर सत्यवीरच आहात ना" केशव स्मितहास्य करत म्हणाला.

त्याच्या या प्रश्नासरशी सत्यवीर आणि हरिभाऊ एकमेकांकडे आश्चर्याने पाहतच राहिले.

सापळा

सकाळ झाल्या झाल्या हरिभाऊंनी पोलिसांना कळवलं कि दोन चोर रात्री बंगल्यात गुपचूप शिरून आरडाओरडा करून लोकांना घाबरवण्याचे चाळे करताना पकडले गेलेत. त्यानुसार सकाळीच पोलिसांनी आपल्या गाडीतून रंगा आणि बाळू या दोन्ही चोरांना पकडून नेले. तरीही ते दोघे पकडले गेले आहेत याची गुप्तता बाळगण्याबद्दल सत्यवीरने पोलिसांना सूचित केले होते.

रात्री झोप न झाल्याने सत्यवीर केशवच्या खोपटातच झोपी गेला. हरिभाऊ मात्र घराकडे निघून गेले होते. दुपारी केशव सत्यवीरसाठी जेवण घेऊन खोपटात आला तेव्हा सत्यवीर नुकताच उठला होता.

“गुप्तहेर साहेब तुमच्यासाठी जेवण आणले आहे” केशव हसत म्हणाला.

“गुप्तहेर म्हणू नकोस. नुसतंच सत्यवीर म्हण मित्रा” अंग झटकत तोंड धुण्यासाठी उठत सत्यवीर म्हणाला.

सत्यवीर हा एक गुप्तहेर आहे हे केशवने कालच ओळखलं होतं. केशव हा शहरात चांगला शिकलेला युवक होता. तिथे असताना महाविद्यालयातील लायब्ररीमधे वर्तमानपत्रात गुंतागुंतीची प्रकरणे सोडवणाऱ्या सत्यवीरचा फोटो त्याने एक दोनदा पाहिल्याचं त्याला आठवत होतं. पण सत्यवीरला प्रत्यक्ष कधी भेटण्याचा योग आला न्हवता. काल रात्री शेतात हरिभाऊंनी सत्यवीरची ओळख मित्राचा मुलगा अशी करून दिलेली

असतानाच त्याला शंका आली होती पण अंधारात्त त्याला नीट समजलं नव्हतं. रंगा आणि बाळूला खोपटात नेऊन चौकशी करताना केशवला सत्यवीरचा चेहरा व्यवस्थित दिसला आणि त्याने बरोबर ओळखलं कि हा गुप्तहेर सत्यवीरच आहे. सत्यवीरला आणि हरिभाऊंना या गोष्टीचं आश्चर्य वाटलं होतं. नंतर केशवला शेंडेंना भेटून सत्यवीरने या प्रकरणाचा कसा तपास चालू केला याची माहिती कळली होती.

"बऱ ठीक आहे. पण मला सांगा आता रंगा आणि बाळू तर पकडले गेले आहेत पण त्यांना हे कृत्य करायला कोणी सांगितले हे कसे समजणार" केशवने बेडवर बसत विचारले.

"आपल्याला ते सुद्धा समजेल पण फक्त रंगा आणि बाळू हे दोघेच नाही तर त्या बंगल्यात रात्री केस मोकळे सोडून एक बाई सुद्धा वावरायची" सत्यवीर म्हणाला.

"अरे हो.. काही लोकांना एक दोनदा त्या बाईचं दर्शन झाल्याचं गावातील लोकं सांगत होते" केशव विचार करत म्हणाला.

"पण मला समजलंय कि ती बाई आपल्याला कुठे मिळू शकेल" सत्यवीर पाण्याने तोंड धूत म्हणाला.

"काय सांगता.. कुठे आहे मग ती" केशवने अजीजीने विचारलं.

"समजेल लवकरच.. आधी मस्त जेवण करून घेतो.. बर मला सांग शेतात रात्रीचे पाणी देत असताना तुला कधी भुताटकीचे अनुभव नाही का आले? म्हणजे तुझं शेत हे बंगल्याच्या मागच्या शेंडेंच्या शेतांच्या मागेच आहे" सत्यवीर मांडी घालत जमिनीवर बसत म्हणाला.

"कधीतरी ऐकू यायचे पण मी जास्त लक्ष दिलं नाही तसंही बंगला माझा शेतापासून लांब असल्याने तिथे जाऊन बघण्याचा योग कधी आला

नाही कि इच्छा सुद्धा झाली नाही तसंही घरच्यांनी आधीच सांगून ठेवलं होतं कि तिथे जायचं नाही म्हणून" केशव म्हणाला.

"तुझा भूताखेतांवर विश्वास आहे का?" सत्यवीर म्हणाला.

"नाही..मी असल्या गोष्टींवर विश्वास ठेवत नाही. हा पण रात्री शेतात जंगली जनावर उच्छाद घालत असायचे. बऱ्याचदा सकाळी वीज नसायची त्यामुळे रात्री पाणी देण्यासाठी शेतावर जावं लागायचं ते देऊन झालं कि मी काही वेळ शेताची निगराणी करायचो" केशवने माहिती दिली.

"कमाल करतोस तू.. बंगल्यातून चित्रविचित्र किंकाळ्याचे आवाज येत असताना तू एकदा जरी बंगल्यात जाऊन पाहून आला असतास तर एव्हाना रंगा आणि बाळू पोलीस कोठडीत असते" सत्यवीर घास चावत म्हणाला.

"हो तसं झालं सुद्धा असत. पण माझ्या लक्षात आलं नाही ते आणि शेतात कामं असल्याने असा विचार कधी आलाच नाही. तसंही या भागात रस्त्यावर विजेची सोय नाहीये म्हणून रात्रीचं काहीही दिसत नाही म्हणून कोणी फिरकत देखील नाही" केशव म्हणाला.

केशवने आणलेले जेवण सत्यवीरने संपवले आणि हात धुवून जवळच्या रुमालाने पुसत तो बेडवर बसला.

"काय वाटत तुम्हाला कोण असेल ज्याने रंगा, बाळूला आणि त्या बाईला असं बंगल्यावर तरी जाऊन भुताटकीचा प्रकार करायला सांगितला असेल" केशवच्या चेहऱ्यावर कुतूहल होतं.

"ती व्यक्ती जी कोणी असेल तिला शेंडे साहेबांच्या बंगल्यात खूप रस आहे एवढ मात्र नक्की. आता ती व्यक्ती लवकरच आपल्याला सापडायला हरकत नाही" सत्यवीर दात टोकरत म्हणाला.

“खरंच तुम्ही खूप छान काम करता. शहरात शिकताना मी तुमच्या गुन्हेगारीच्या सोडवलेल्या प्रकरणांचे किस्से ऐकलेले होते. ते ऐकून खूप भारी वाटायचं. गुप्तहेर होण्याएवढी अक्कल नाहीये मला पण पोलीस दलात सामील व्हायची इच्छा व्हायची.” केशव स्मितहास्य करत म्हणाला.

“तशी तुझी इच्छा असल्यास तू जरूर प्रयत्न करावास. तुला नक्की त्यामध्ये यश येईल असं मला वाटत” सत्यवीर केशवला प्रोत्साहन देत त्याच्या पाठीवर थाप मारत म्हणाला.

बंगल्यात रात्रीच्या वेळी चित्र विचित्र आवाज काढणाऱ्या दोन अट्टल चोरांना सत्यवीर आणि केशवने मुसक्या बांधून पोलिसांच्या ताब्यात दिलं होतं पण इतक्यात हि गोष्ट कोणाच्या कानावर जाऊ देऊ नका अशी सूचना सत्यवीरने हरिभाऊ, केशव आणि पोलिसांना सुद्धा दिली होती कारण रंगा आणि बाळू यांना हे काम करायला लावणारा माणूस या बातमीने सावध होऊ शकतो असं सत्यवीरचं मत होतं.

काही वेळ तिथे केशवसोबत गप्पा मारून सत्यवीर तडक पोलीस स्टेशनला जायला निघाला होता. केशवने सुद्धा सोबत येण्याबाबत आग्रह केला होता. सत्यवीर इथे आहे तोपर्यंत सत्यवीरची सोबत करायची केशवची इच्छा होती. यावर सत्यवीरने देखील नकार दिला नाही आणि मग ते दोघे लागलीच पोलीसस्टेशनवर आले.

पोलीस स्टेशनवर इन्स्पेक्टर इनामदार आपल्या टेबलवर समोरची फाईल बघत बसले होते. सकाळीच त्यांनी रंगा आणि बाळूची फाईल काढून त्यामध्ये त्या दोघांनी अजून काही केलेलं नाहीत ना याचा शोध घेत होते पण रंगा आणि बाळू हे फक्त भुरटे चोरच होते. चोऱ्यामाऱ्या, घरफोडी

आणि लुटालूट सारखे गुन्हे त्यांनी केलेले होते. त्यासाठी जेलची हवा देखील त्यांनी खाल्लेली होती.

फाईल बघत असतानाच त्यांच्या केबिनमध्ये एका हवालदाराने सत्यवीर आल्याची माहिती पुरवली. इनामदारांनी लगेचच सत्यवीरला आतमधे सोडण्यास सांगितलं. इनामदारांनी या आधी कधीही सत्यवीरसोबत काम केलेलं नव्हतं पण सत्यवीरच्या तपास केलेल्या बऱ्याच प्रकरणांची त्यांना पोलीसखात्यात असल्याने माहिती होती. शेंडेच्या भूतबंगला प्रकरणात सत्यवीरने कशाप्रकारे ओळख लपवून तपास केला याची माहिती त्यांना समजली होती.

"नमस्कार इन्स्पेक्टर साहेब, काय म्हणतायत रंगा आणि बाळू?" केबिनमध्ये प्रवेश करत सत्यवीर म्हणाला.

मागोमाग केशव सुद्धा आलेला होता. इनामदारांनी सत्यवीरला आणि केशवला बसण्यास सांगितलं.

"आमच्या दोन हवालदारांनी रंगा आणि बाळूची चांगलीच खातिरदारी केलीय. गावाच्या बाहेर एका पडक्या जागेवर त्यांना कोणीतरी भेटायला बोलावलं होतं आणि पैसे देऊन त्यांना हे काम करायला सांगितलं होतं. पैसे देणाऱ्या व्यक्तीचा चेहरा दोघांनीही पहिला नाही एवढचं ते सांगतायत. बंगला सोडून इतर कुठेही गुन्हेगारीची कामे ते करत नव्हते असं देखील त्यांचं म्हणणं आहे" इनामदार म्हणाले.

"अजून काही लपवत नाहीयेत ना ते इन्स्पेक्टर साहेब" सत्यवीरने विचारलं.

“शक्यच नाही.. अहो आमचे हवालदार भल्याभल्या गुन्हेगारांना पोपटासारखं बोलायला भाग पाडतात आणि त्यांच्यापुढे हे भुरटे चोर काहीच नाहीत” इनामदार म्हणाले.

“ह्म्म्म... म्हणजे कोणीतरी असं होतं. ज्याला आपली ओळख लपवायची होती. मुख्य म्हणजे शेंडेंच्या गावातील घरात रंगा आणि बाळू गेले नाहीत तर. बर मला सांगा मिस शिलांची चौकशी केलीत का तुम्ही?” सत्यवीरने विचारल.

“त्यांना ठाण्यावर बोलावलंय. येतीलच इतक्यात. पण रंगा आणि बाळूला ज्याप्रकारे तुम्ही सापळा लाऊन पकडलंत खरंच मनापासून कौतुक करावसं वाटतं तुमचं” इंस्न्पेक्टर इनामदार म्हणाले.

“खरंतर मी काहीच केलं नाही. या केशवने रंगा आणि बाळूला काठीचा चांगला प्रसाद देऊन आसमान दाखवलं होतं. त्याला या कामाचं सरकारकडून बक्षीस नक्कीच मिळायला हवं” केशवकडे पाहत सत्यवीर कौतुकाने म्हणाला.

“हो हो.. का नाही..अशा तरुण आणि तडफदार युवकांचीच समाजाला गरज आहे. यांचा सरकारतर्फे उचित सन्मान केला जाईल” स्मितहास्य करत इनामदार बोलले.

“बर.. बंगल्यावर जाऊन रात्री लोकांना घाबरवण्यात फक्त रंगा आणि बाळूचाच हात नव्हता. तिथे एक बाई पण याचं कामासाठी यायची. केस मोकळे सोडून अंगावर कापड पांघरून बंगल्याच्या खिडकीत उभं राहून लोकांना घाबरवायची. रंगा आणि बाळूला याबाबत कल्पना नसणार कारण तिला कोणीतरी दुसऱ्याच व्यक्तीने हि कामगिरी सोपविली होती” सत्यवीर म्हणाला.

“म्हणजे तुमचं म्हणण असं आहे कि रंगा आणि बाळूला कोणीतरी दुसऱ्याच व्यक्तीने तिथे बंगल्यावर पाठवलं होतं आणि त्या बाईला कोणीतरी तिसऱ्या व्यक्तीने.” आश्चर्याने इनामदार म्हणाले.

“हो असंच म्हणावं लागेल.. तुमचं तपासाचं पथक तुम्हाला एके ठिकाणी पाठवावं लागेल तिथे तुम्हाला ती बाई सापडेल” सत्यवीर म्हणाला.

“काय सांगता कुठे..” इनामदार आश्चर्याने म्हणाले.

“शेजारच्या गावात एक तमाशाचा फड आला आहे. त्या फडात काम करणाऱ्या कोणत्यातरी बाईने बंगल्यावर रात्री येऊन भुतासारख फिरून लोकांना घाबरवलं आहे” सत्यवीर म्हणाला.

“हे कशावरून म्हणता तुम्ही” इनामदार म्हणाले.

“मी बंगल्यात तपासणीसाठी गेलेलो असताना मला एका खोलीत कापडाच बोचकं आढळलं त्यात बरीच मोठी कापडं होती. सोनेरी कडा असलेले, रेशमी वस्त्र तंबू ठोकण्यासाठी लागतात त्या कापडात ती गुंडाळलेली होती आणि त्यांना एक मंद सुवासाचा स्प्रे मारल्यासारखा गंध येत होता. अशा प्रकारची कापडे हि फक्त सर्कसमधे काम करणारी माणसे किंवा तमाशातील लोकं यांना लागतात. मला गावात चौकशी करत असतानाच तमाशाच्या फडाबद्दल समजलं होतं. म्हणून मला राहून राहून असं वाटत होतं कि कोणीतरी तमाशाच्या फडात काम करणारी व्यक्ती या बंगल्यात ये जा करते.” सत्यवीर म्हणाला.

सत्यवीर बोलत असतानाच बाहेरून एक हवालदार केबिनमध्ये आला आणि त्याने मिस शिला पोलीस स्टेशनमधे आल्याची बातमी इनामदार यांना दिली.

स्टेशनमध्ये चौकशीच्या करण्याच्या खोलीत मिस शीला बसलेली होती. पोलिसांनी बोलावलं हे समजल्यावर ती मनातून चांगलीच हादरलेली होती पण चेहऱ्यावर तसं दाखवत नव्हती . चौकशी खोलीत इनामदार, एक महिला पोलीस आणि सत्यवीर आत आले. सत्यवीरला पाहतच मिस शिलांना आठवलं कि या माणसाला आपण कुठेतरी पाहिलं आहे. काही क्षणातच मिस शिलांना आठवलं कि शेंडेसाहेबांच्या घरात सत्यवीरला आपण पाहिलं होतं. बापरे म्हणजे हा माणूस पोलीस होता तर. म्हणजे शेंडेनी आपली तक्रार पोलीस स्टेशनमध्ये केली आहे का? असं वाटून मिस शिलांना चांगलाच घाम फुटला. इनामदार साहेबांनी मिस शिलांची जुजबी चौकशी केली. मिस शीलाने मला इथे का बोलावण्यात आलं आहे असं विचारल्यानंतर सत्यवीरने चौकशीची धुरा हातात घेतली.

"मिस शीला शेंडेंच्या बंगल्यात तुम्हाला जास्तच रस आहे.. असं का? सत्यवीरने मिस शिलांच्या चेहऱ्यावरचे हावभाव टिपत विचारलं.

"मी..मी एक प्रॉपर्टी एजन्ट आहे. मी स्वस्तात मिळणाऱ्या प्रॉपर्टी विकत घेत असते. त्यात शेंडेंच्या बंगल्यात भूतांचा वावर असल्याचं समजलं आणि मग मी त्या बंगल्यात रस घेऊ लागले." चेहऱ्यावर भीती न दाखवता शीला म्हणाली.

"भूताखेतांचा वावर असलेल्या प्रॉपर्टी विकत घेता म्हणजे धाडसी आहात तुम्ही आणि अशी प्रॉपर्टी तुमच्याकडून विकत कोण घेतो? सत्यवीरने प्रश्न केला.

"शहरात अनेक लोक असतात त्यांना अशा भाकडकथांमध्ये रस नसतो. ती लोकं अशा मालमत्ता विकत घेऊन त्यांचा व्यवसाय त्या ठिकाणी उभारतात." शीलाने उत्तर दिलं.

"तुमचा विश्वास आहे का भूतांवर?" सत्यवीर नजर रोखत म्हणाला.

या प्रश्नावर शीला काहीच बोलली नाही. तिला आता जरा भीती वाटू लागली होती. सत्यवीर पुढे म्हणाला.

"पोलिसांना अशी माहिती मिळाली आहे कि भुतांच्या नावाखाली त्या बंगल्यावर रात्री एक महिला केस मोकळे सोडून अंगावर कापड गुंडाळून फिरत असते आणि तसं करायला तिला कोणत्या तरी व्यक्तीने सांगितलं आहे. तुमचासुद्धा त्या बंगल्यात रस आहे म्हटल्यावर तुम्हाला बोलावून जरा चौकशी करावीशी वाटली" सत्यवीर गंभीर आवाजात म्हणाला.

"पण इथे माझा काय संबंध आहे.. तुम्हाला माझ्यावर संशय आहे का? कोणत्या पुराव्यावरून तुम्ही असं बोलताय" उसनं अवसान आणून शीला बोलत होती पण सत्यवीरला कळून चुकलं होती कि मिस शीला पुरती घाबरली आहे. तिला अजून घाबरवून तिच्याकडून सत्य वदवून घेण्यासाठी सत्यवीर पुढे म्हणाला

"ती बाई बंगल्यावर केस मोकळे सोडून फिरत असताना पकडली गेलीय आणि तिने पोलिसांना सांगितलंय कि कोणी तिला असं करायला कोणी सांगितलं होत. तुम्हाला या प्रकरणाबाबत काही माहिती असल्यास आत्ताच इथे सांग. आम्ही तुम्हाला मदत करू कारण उद्या जर काही वेगळी माहिती हातात आली तर बंगल्यावर भुतांच्या नावाखाली लोकांना त्रास दिल्याबद्दल त्या बाईला आणि तिला तसं करायला सांगणाऱ्या व्यक्तीला दीर्घकाळ तुरुंगाची हवा खाऊ लागू शकते. वर बदनामी होईल ती वेगळीच" सत्यवीरने स्पष्ट शब्दात सांगितलं.

सत्यवीरच्या वाक्याने मिस शीला चांगलीच घाबरली आणि ओळखलं कि आता आपली काही धडगत नाही. तमाशातल्या त्या बाईने आपलं नाव

नक्कीच सांगितलं असणार. तिने तत्काळ कबुली दिली कि शेंडेच्या बंगल्यात चित्रविचित्र आवाज काढण्याचे आणि ओरडण्याचे आवाज रात्री अपरात्री यायचे अशी अफवा पसरली होती. तेव्हा या अफवेचा फायदा घेऊन तिने एका बाईला पैसे देऊन रात्रीचं बंगल्यावर रात्री केस मोकळे सोडून खिडकीच्या भागात उभं राहायला सांगितलं होतं. जेणे करून रस्त्यावरच्या येणाऱ्या जाणाऱ्यांना ती बाई दिसावी आणि बंगल्यात भूत आहे हि अफवा अजूनच मजबूत व्हावी. स्वस्तात प्रॉपर्टी मिळवण्याच्या उद्देशाने तिने तसं केलं होतं. मला शिक्षा देऊ नका मी बाकी काही केलं नाहीये अशी गयावया तिने केली.

"बंगल्यात रात्रीच्या वेळी अजून दोन लोकंसुद्धा येत असायचे रात्रीच्या अंधारात किंकाळ्या मारत फिरायचे. त्यांना सुद्धा तुम्हीच असं करायला सांगितलं होतं का?" इनामदार कडक आवाजात म्हणाले.

"न नाही नाही... मला इतर कोणाबद्दल काही माहिती नाहीये, शेंडेच्या बंगल्यात आधीच तसे आवाज यायचे याचा फक्त मी फायदा उचलला एवढचं आहे. उलट मी ज्या बाईला पैसे देऊन रात्रीचं तिथे उभं राहायला सांगायचे तिलासुद्धा असं जाणवलं होतं कि बंगल्यात तिच्याशिवाय दुसरं कोणीतरी येतंय. रात्री तिथे फिरताना जागोजागी खड्डे पडलेले दिसायचे. तिने मला तसं सांगितलं देखील आणि खरंच इथे भूतांचा वावर आहे असं वाटून घाबरून तिने नंतर हे काम करायला नकार दिला"

"म्हणूनच काल संध्याकाळी तिथे जाऊन बंगल्याबाहेर उभं राहून प्रत्यक्ष जाऊन भुते आहेत कि नाही हे पाहून आलात का". काल रात्री बंगल्यावर पाळत ठेवताना सत्यवीरला मिस शीला बंगल्याकडे पाहत उभी असलेली दिसली त्यावरून सत्यवीरने तर्क लावत विचारलं

काल रात्री आपण बंगल्याच्या आसपास असल्याचं सत्यवीरला माहित असल्याचं पाहून त्या अजूनच घाबरल्या.

"अ..हो.." कसंबसं बोलत शीला गप्प बसली.

आपण काल संध्याकाळी तिथे गेल्याचं पोलिसांना माहित असल्यानं आता काही लपवण्यात अर्थ नाही असं वाटून शीलाने सगळं खरं सांगितलं कि बंगल्यात भूतें असल्याच्या अफवेचा फायदा घेऊन तमाशात हलकी सलकी काम करणाऱ्या एका बाईला पकडून पैशाचं आमिष दाखवून बंगल्यात फिरायला सांगितलं. म्हणून मग सत्यवीर आणि इनामदारांनी मिस शिलाला अजून काही विचारलं नाही.

चौकशीच्या खोलीमधून आता सत्यवीर आणि इन्स्पेक्टर इनामदार बाहेर आले.

"तुमचा तर्क बरोबर ठरला सत्यवीर. तमाशात काम करणाऱ्या बाईनेच रात्री खिडकीत उभं राहून लोकांना घाबरवलं आहे तेही मिस शीला यांच्या सांगण्यावरून. पण एक लक्षात येत नाहीये ज्या कोणी व्यक्तीने रंगा आणि बाळू यांना बंगल्यावर रात्री अपरात्री किंकाळ्या मारायला पाठवले असावे तो कोण असावा. त्या बंगल्यात अजून कोणाचा रस असावा. कि अजून कोणीतरी प्रॉपर्टी एजन्ट यामधे सामील आहे?" इनामदार न समजून बोलले.

"नाही.. ती व्यक्ती कोणी प्रॉपर्टी एजन्ट नाहीये. बंगला विकत घेण्यात त्या व्यक्तीचा रस नाहीये. उलट कोणीही हा बंगला विकत घेऊ नये किंवा तिथे राहायला येऊ नये म्हणून त्या व्यक्तीने हा प्लॅन रचला आहे. रंगा आणि बाळूसारख्या बदमाष लोकांशी बोलून त्यांना पैसे देऊन हे काम करण्याइतपत ती व्यक्ती मुरलेली आहे. रंगा आणि बाळू यांनी त्या

व्यक्तीच्या सांगण्यानुसार बंगल्यात राहून भूतांची कामगिरी चोख बजावली" सत्यवीरने माहिती पुरवली.

"बर मग आता ती व्यक्ती कोण आहे. ती कशी सापडणार आपल्याला" इनामदार विचार करत म्हणाले.

"ती व्यक्ती स्वत:हून चालत आपल्या जाळ्यात येणार आहे इनामदार साहेब. आपल्याला फक्त जाळ फेकून शांत बसायचं आहे" सत्यवीर हलकंस हसत म्हणाला.

इनामदारांनी लगेचच एक पोलीस पथक पाठवून तमाशाच्या फडात काम करणाऱ्या त्या बाईला पकडून आणायला सांगितलं. सत्यवीर तोपर्यंत पोलीस स्टेशनमधेच थांबून राहिला आणि त्याने केशवला गावात जायला सांगितलं. गावात जाऊन सगळीकडे भूतबंगल्यावर धुमाकूळ घालत असलेली भुते पकडली गेलीत अर्थात चोर पकडले गेलेत अशी बातमी सगळीकडे पसरवायला सांगितली. याकामात हरिभाऊंची मदत घेण्यास देखील सांगितले.

तोपर्यंत पोलीसस्टेशनमध्ये बसून सत्यवीर शहराच्या आसपासच्या भागातील सगळ्या गुन्हेगारी प्रकरणांचे रेकॉर्ड चाळत बसला. त्यात त्याचा निम्मा दिवस गेला. इनामदारांच्या पथकाने तमाशातील बाईला पकडून आणले होते. सत्यवीरने तिची चांगलीच चौकशी केली. आधीच घाबरलेल्या तिने आपली चूक मान्य केली. सत्यवीरने तिला अन्य कोणाला बंगल्यात रात्री अपरात्री फिरताना पहिले का हे विचारलं. त्यावर तिने सांगितलं कि ती फक्त संध्याकाळी तासभर तिथे थांबायची ते सुद्धा लोकं रस्त्यावर दिसल्यावर त्यांना घाबरवण्यासाठीच. नंतर जास्त अंधार पडल्यावर ती तिथून मागच्या बाजूने निघून जायची. पण तेवढा वेळ बंगल्यात असताना

तिला जाणवायचं कि ती सोडून अजून कोणीतरी इथे येत असावं. कारण भिंतींवर चरे पडलेले दिसायचे. काही खोल्यांमध्ये आणि मधल्या जाण्यायेण्याच्या भागात खड्डे पडलेले दिसायचे.

सत्यवीरने तिचं सगळं म्हणण ऐकून घेतलं आणि तिला जास्त काही प्रश्न न विचारता परत आपल्या गुन्हेगारी रेकॉर्डच्या फाईल्स चाळत बसला.

संध्याकाळी केशव आणि हरिभाऊ पोलीस स्टेशनवर आले. तेव्हा सत्यवीर एका टेबलाच्या जवळ बसून कोऱ्या कागदावर काहीतरी लिहित बसलेला दिसला.

"सत्यवीर तुम्ही सांगितल्याप्रमाणे सगळ्या आसपासच्या गावात सांगितलं. आपल्या गावात सुद्धा हि बातमी पसरली आहे कि बंगल्यावर भुतांच्या नावाने गोंधळ घालणाऱ्या चोरांना पोलिसांनी पकडले आहे" केशव उत्साहात म्हणाला.

"हो.. शेंडे साहेब तर अगदीच खुश झालेत. म्हणाले कि सत्यवीरमुळे आपल्या मागची पीडा गेली" हरिभाऊ बोलले. त्याचं बोलणं चालू असतानाच इन्स्पेक्टर इनामदार तिथे आले आणि टेबलजवळ बसलेल्या सत्यवीरला म्हणाले.

"बऱ सत्यवीर आता पुढे काय"

"बंगल्यातील चोरांना पकडल्याच्या बातम्या गावात वाऱ्यासारख्या पसरल्या असतील. त्यामुळे ज्याने कोणी रंगा आणि बाळूला हे काम दिलं असेल तो माणूस नक्कीच आज रात्री बंगल्यात येणार आहे" सत्यवीर खुर्चीवरून उठत म्हणाला.

"काय..बंगल्यात तो माणूस येणार आहे. पण तो का आणि कशाकरिता येईल" इनामदार गोंधळून म्हणाले.

“कारण ज्या कामासाठी त्याने रंगा आणि बाळूला ठेवले होते ते करायला आता तिथे कोणीही नाहीये आणि बंगला सुद्धा भयमुक्त झालाय. त्यामुळे उद्यापासून गावातील लोकसुद्धा त्या बंगल्याच्या आसपास यायला घाबरणार नाहीत. कदाचित शेंडे सुद्धा आपलं बंगल्याचं उर्वरित काम तिथे सुरु करतील. म्हणून ज्या कोणाचा त्या बंगल्यात रस आहे किंवा ज्याला असं वाटतं होतं कि कोणीही बंगल्याच्या आसपास फिरकू नये ती व्यक्ती गडबडीने बंगल्यात येईल.” सत्यवीर म्हणाला.

“पण मला अजूनही समजत नाहीये कि बंगल्यात त्या व्यक्तीचा एवढा रस का आहे. काय हवय नक्की त्या व्यक्तीला” इनामदार म्हणाले.

“ते आपल्याला आज रात्रीचं कळणार आहे. कारण आज रात्री आपण सगळे त्या व्यक्तीची वाट पाहत बंगल्यात दबा धरून बसणार आहोत आणि ती व्यक्ती आली कि लगेच तिला तिथे जेरबंद करूयात. मग ती व्यक्तीचं काय ते उत्तर देईल आपल्या प्रश्नांची” हसत सत्यवीर म्हणाला.

“पण नक्की ती व्यक्ती येईल का” हरिभाऊ साशंकतेने बोलले

“नक्की येणार.. कारण आज नाही तर पुन्हा कधीच अशी संधी त्या व्यक्तीला मिळणार नाहीये. म्हणूनच आज आपण सगळे बंगल्याच्या आसपास दबा धरून बसणार आहोत. आज आपल्या हातातून ती व्यक्ती निसटणार नाहीच” सत्यवीर म्हणाला.

सत्यवीरच्या उद्गारासरशी इन्स्पेक्टर इनामदार, केशव आणि हरिभाऊ उत्साहाने तिथून बाहेर पडले.

खलनायक

रात्र चांगलीच पडलेली होती. बंगल्याच्या आसपास नेहमी असते तशीच भयाण शांतात होती. बंगल्यातील आरडाओरडा आणि भयानक किंकाळ्याचे आवाज आता बंद पडलेले असले तरी एक प्रकारची विचित्र शांतता अजूनही तिथे होती. बंगल्याच्या आतल्या भागात एका मोठ्या हॉलवजा खोलीमध्ये एका खुर्चीच्या मागे सत्यवीर लपून बसलेला होता. शेजारच्याच खोलीत इन्स्पेक्टर इनामदार देखील लपलेले होते. अंधाऱ्या रात्री कोणी गुपचूप बंगल्यात प्रवेश केलाच तर त्याला बेसावध गाठून पकडण्याचा इरादा केला गेला होता. बंगल्याच्या मागील उसाच्या शेतात केशवदेखील उसाच्या गर्दीत लपून बंगल्याच्या खिडक्यांवर नजर ठेवून होता. कोणी बंगल्यात शिरताना दिसलंच तर इशारा देण्याचं काम सत्यवीरने त्याच्यावर सोपवलेलं होतं. बंगल्याच्या शेजारी बांधकामाचे साहित्य आणि इतर बस्तू ठेवायला जे शेड उभं केलेलं होतं त्यामागे हरिभाऊ सुद्धा दबा धरून बसलेले होते. सावज हातातून निसटून बाहेर गेलंच तर केशव आणि हरिभाऊ यांना बाहेर सावजाला पकडायला सोप्पं जावं म्हणून सत्यवीरनेच त्यांना तिथं लपायला सांगितलं होतं.

सत्यवीरच्या योजनेनुसार आज रात्रीच भूतबंगल्यात रंगा आणि बाळूला भूतांची थेरं करायला सांगणारा अनामिक खलनायक बंगल्यात येणार होता त्यासाठीच सगळेजण आपापल्या जागेवर दबा धरून शांतपणे त्या खलनायकाची वाट पाहत बसले होते. रात्रीच्या काळोखात बंगल्याच्या आसपासचा परिसर पूर्णपणे बुडून गेला होता. बंगल्यातील एका छोट्या

खोलीत मातीच्या ढिगाऱ्यामागे लपलेल्या इन्स्पेक्टर इनामदारांना मनातून वाटत होतं कि सत्यवीरच्या म्हणण्यानुसार खरंच तो खलनायक इथे येईल का? कि तो रंगा आणि बाळूच्या पकडले गेल्याच्या बातमीमुळे पसार झाला असेल आणि येणारच असेल तर तो नक्की इथे कशासाठी येणार आहे हे सुद्धा सत्यवीरने सांगितलं नव्हतं. काहीही असो प्रयत्न करायला हवा. अखेर सत्यवीरने काहीतरी विचार करूनच हि योजना आखली असेल. कितीवेळ झालं ते सगळे तिथे शांतपणे दबा धरून बसलेले होते. एक एक क्षण त्यांना तासाप्रमाणे वाटत होता. अजूनही कोणाच्या येण्याची चाहूल लागलेली नव्हती . रात्र चढत चाललेली होती. सत्यवीर डोळे मिटून शांतपणे बसून होता.

एवढ्यात बंगल्याच्या बाहेरून टिटवीच्या ओरडण्याचा आवाज आला. तो आवाज केशवनेच काढलेला होता. म्हणजेच केशवने दिलेला इशाराच होता याचा अर्थ सावज आलेलं होतं. काही वेळाने काहीतरी घासल्यासारखा आवाज सत्यवीरला आला. केशवचा इशारा समजून सत्यवीर सावध होऊन बसला. बंगल्याच्या खिडकीमधून कोणीतरी हळूच बंगल्यात प्रवेश करू पाहत होतं. त्याच्या शरीराभोवती गुंडाळलेल्या कापडांमुळे भिंतीला घासल्यासारखा आवाज येत होता. सत्यवीर कान टवकारून ऐकण्याचा प्रयत्न करू लागला. इनामदार साहेबांना देखील तो आवाज ऐकू आल्यामुळे ते देखील श्वास रोखून बसले. बंगल्याच्या मधल्या भागातून आतमध्ये येऊन त्या व्यक्तीने सत्यवीर ज्या खोली लपलेला होता त्या खोलीकडे मोर्चा वळवला. त्या व्यक्तीच्या हातात फावडे होते आणि ती व्यक्ती हळुवारपणे पुढे सरकत होती सत्यवीरला जाणवलं कि ती व्यक्ती आपण जिथे लपलोय त्याचं खोलीत येतेय त्यामुळे तो देखील खुर्चीमागे

अंग चोरून बसला. त्या व्यक्तीने खोलीत प्रवेश केला आणि खोलीच्या कोपऱ्यात जाऊन तिथे हातातल्या फावड्याने तिथे खोदू लागला.

खाड खाडss फावड्याचा आवाज खोलीभर घुमला.

खुर्चीमागून सत्यवीरने त्या फावडा मारणाऱ्या व्यक्तीकडे पहिले. ती व्यक्ती पाठमोरी उभी असल्याने तिला मागचे काहीच दिसणे शक्य नव्हते तसेही बंगल्यात अंधारच होता. दबक्या पावलाने पुढे जात सत्यवीरने अचानकच मागून त्या व्यक्तीवर उडी घेतली तसं त्या व्यक्तीला मागे वळायचा अवसरही न देता सत्यवीरने त्या व्यक्तीच्या मुसक्या आवळल्या. इन्स्पेक्टर इनामदार सुद्धा आता त्या खोलीत आले. मगाशी केशवने केलेल्या इशाऱ्यासरशीच ते सावध होऊन बसले होते आणि ती व्यक्ती सत्यवीर ज्या खोलीत लपलेला होता तिथे गेल्यावर हळूच मागून आत आले होते. ती व्यक्ती सत्यवीरच्या तावडीतून सुटण्यासाठी धडपड करत होती पण सत्यवीरच्या ताकदीपुढे त्या व्यक्तीचा पाड लागला नाही.

इनामदारांच्या पाठोपाठ तिथे केशव सुद्धा विद्युत गतीने खिडकीमार्गे आतमधे आला होता. इनामदारांनी आपल्याजवळील बेड्या काढून त्या व्यक्तीच्या हातामागे अडकवल्या आणि त्याला सरळ उभं केलं. सत्यवीर त्या व्यक्तीच्या समोर उभं राहून तिजकडे पाहत उभा राहिला. ती व्यक्ती घाबरत धडपडतच उभी राहिली अंगावर सभोवती एक काळ वस्त्र त्या व्यक्तीने गुंडाळल होतं. तिच्या चेहऱ्यावर अर्धवट कापड लावल्याने ती व्यक्ती कोण आहे हे कळून येत नव्हतं. पाठोपाठ हरिभाऊदेखील आतल्या खोलीत येऊन दाखल झाले. इनामदार साहेब त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील कापड दूर केलं आणि जवळच्या छोट्या विजेरीने त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर प्रकाशाचा झोत मारला. तसं त्या व्यक्तीने चेहरा लपवण्याचा आटोकाट

प्रयत्न केला पण केशवने त्या व्यक्तीला मागून घट्ट धरून ठेवलं. केशवच्या पकडीपुढे त्या व्यक्तीला हलतही येईना.

जसा विजेरीने टाकलेल्या प्रकाशाच्या झोतात त्या व्यक्तीचा चेहरा दिसला तसे हरिभाऊ उद्गारले

"अनमोल तू..."

विस्फारलेल्या नेत्रांनी केशव आणि इनामदार सुद्धा अनमोलकडे पाहत उभे होते. शेंडेसाहेबांकडे त्यांच्या पतपेढीवर क्लार्क म्हणून काम करणारा अनमोल एवढ्या रात्री फावड घेऊन बंगल्यात काय करतोय हे हरिभाऊंना कळेना. म्हणजेच रंगा आणि बाळू यांना पैसे देऊन बंगल्यात भुताची भीती दाखवायला लावणारा अनमोल होता कि काय?

"अनमोल..तू इथे काय करतोय.." हरिभाऊ अजूनही विश्वास न बसल्यासारखे अनमोलकडे पाहत बोलले.

पण अनमोल काहीही न बोलता फक्त धीरगंभीर चेहऱ्याने सगळ्यांकडे पाहत होता. हरिभाऊ सोडून त्याला अंधारात कोणाचा आवाज ओळखता आला नाही आणि कोणी नीट दिसलं सुद्धा नाही.

"काय मग अनमोल उर्फ सनी धोत्रे.... फावडा घेऊन इथे काय शोधत होतात. सांगायचे कष्ट घ्याल का?" स्मितहास्य करत सत्यवीर अनमोलकडे पाहत बोलला.

आपल्या खऱ्या नावाचा केलेला उल्लेख ऐकून अनमोल चांगलाच दचकला. तसचं हरिभाऊ आणि इनामदार सुद्धा बुचकळ्यात पडले. अनमोलचा सत्यवीरने केलेला सनी धोत्रे असा उल्लेख ऐकून कोणालाच काहीही कळेना. तथापि रात्र बरीच झाल्याने सत्यवीरने अनमोलला घेऊन पोलीस स्टेशनवर घेऊन जाण्यास इनामदारांना सांगितलं. त्याची पुढची

चौकशी तिथेच करावी असं ठरलं. सत्यवीरने हरिभाऊंना शेंडे साहेबांना घेऊन तडक पोलीस स्टेशनवरच यायला सांगितलं आणि स्वतः केशवसोबत इनामदारांना घेऊन पुढे निघाला.

पोलीस स्टेशनवर आल्यावर इनामदारांनी सत्यवीरने अनमोलचा उल्लेख सनी धोत्रे असा का केला म्हणून विचारलं. त्यावर हसून सत्यवीरने शेंडे साहेब आले कि सगळ्या समक्षच अनमोल उर्फ सनी धोत्रे आपल्याला काय ते सांगेल असं सांगितलं. काहीवेळातच शेंडेसाहेब हरिभाऊंसोबत स्टेशनवर दाखल झाले त्यांची मुद्रा पूर्णपणे बुचकळ्यात पडलेली होती. पोलीस स्टेशनवर यायची त्यांची तिळमात्र इच्छा नसताना सत्यवीरच्या सांगण्यानुसार ते इथे आले होते.

“या या.. शेंडेसाहेब बसा...” जवळच्याच खुर्चीकडे निर्देश करत सत्यवीर म्हणाला.

“सत्यवीर हे इथे पोलीस स्टेशनवर का बसलोत आपण अर्थात हरिभाऊ बोलेले रात्री बंगल्यावर काय काय घडलं” शेंडे अस्वस्थ होत म्हणाले.

शेंडेनी सत्यवीरला अगोदरच पोलिसांचा हस्तक्षेप नको म्हणून सांगितलेलं असताना देखील सत्यवीरने पोलिसांना या प्रकरणात का ओढलं हे त्यांना समजेना.

“तुमची अस्वस्थता कळतेय मला शेंडे साहेब पण इथे आपल्याला सापडलेला मनुष्य भयंकर बदमाष आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे याची तुम्हाला कल्पना नसेल म्हणून पोलिसांना मध्ये घेणें भाग वाटले आणि तसंही त्यांच्या मदतीशिवाय मला अनमोल हा खरा कोण आहे हे समजलं देखील नसतं” सत्यवीर म्हणाला.

सत्यवीरकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहण्याशिवाय त्यांना दुसरं काहीही सुचेना. हरिभाऊसुद्धा शेंडेच्या मागे तशाच अवस्थेत उभे होते.

सत्यवीर पुढे म्हणाला" शेंडे साहेब हा अनमोल तुमच्याकडे किती दिवसापासून कामावर आहे"

"झाले असतील सात आठ महिने" शेंडे बोलले.

"तुमच्याशी त्याची भेट कशी झाली" सत्यवीरने प्रश्न केला.

"एकदा माझ्याकडे तो काम मागण्यासाठी आला होता. मला मोठा मेहनती वाटला तो म्हणून ठेवून घेतला कामावर" शेंडेनी उत्तर दिलं.

"कोणतीही शहनिशा करता?" सत्यवीर म्हणाला.

"अं.. हो तशी काही गरज वाटली नाही मला" चाचरत शेंडे म्हणाले.

"शेंडे साहेब मला सांगायला अत्यंत खेद होतोय कि अनमोल या नावाने सनी धोत्रे या नावाचा इसम तुमच्याकडे गेले सात आठ महिने नाव बदलून नोकरीला होता. तसचं त्याने रंगा आणि बाळू या दोन चोरांना पैसे देऊन तुमच्या बंगल्यावर रात्री अपरात्री आरडा ओरडा करून तिथे भूत असल्याचा बनाव करायला सांगितलं होतं. जेणेकरून तुम्ही घाबरून जावे आणि बंगला भुताटकीचा आहे असा समज सगळ्यांचा व्हावा" सत्यवीर हाताची बोटे एकमेकांत गुंफून शेंडेकडे पाहत म्हणाला.

सत्यवीरच्या या वाक्यावर शेंडेना काय बोलावे ते कळेना. इतके दिवस आपल्याकडे काम करणारा मेहनती माणूस हा अट्टल चोर होता हे ऐकून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

"सत्यवीर पण तो असं का करत होता" शेंडे घाबरत म्हणाले.

“शेंडे साहेब त्याला तुमच्या बंगल्यात खास रस आहे तो तुमचा बंगला विकत घेण्यासाठी न्हवे तर त्याचं काहीतरी गुपित त्या बंगल्यात दडलं आहे. लोकांनी या बंगल्याच्या जवळ येऊ नये म्हणून त्याने बंगल्यात रंगा आणि बाळूनामक भुते सोडली आणि तो बंगला भुताटकीचा साबित करून तो त्या बंगल्यात काहीतरी शोधायला येत असे. एवढचं न्हवे तर तुम्हाला सुद्धा त्या बंगल्याच्या जवळ न येऊ देणारा, तुमच्या राहत्या घरात भिंतीवर रक्ताने मजकूर लिहिणारा आणि वस्तूंची फेकाफेक करणारा हाच आहे अशी मला खात्री आहे” सत्यवीर म्हणाला.

“पण बंगल्यात नक्की तो काय शोधत होता” हरिभाऊ कपाळावर आठ्या आणत म्हणाले.

“मला काहीसा अंदाज आहे. पण आधी त्यालाच याची उत्तरं विचारुयात“ असं म्हणत सत्यवीर खुर्चीवरून उठला.

अनमोल उर्फ सनी धोत्रेला एका चौकशीच्या खोलीत आणले गेले. इनामदार आणि सत्यवीर त्याची चौकशी करण्यासाठी खोलीत गेले. शेंडेसाहेब, हरिभाऊ आणि केशव बाहेरूनच त्यांचं संभाषण ऐकू लागले.

“बोल मग अनमोल उर्फ सनी तू त्या बंगल्यात काय शोधत होतास” समोरच्या खुर्चीवर बसत सत्यवीर म्हणाला.

सत्यवीरच्या या वाक्यावर अनमोलने एकवार सत्यवीरला व्यवस्थित न्याहाळल आणि हसत तो पुढे म्हणाला

“गुप्तहेर सत्यवीर.. मला आधी समजलंच नाही कि तू गुप्तहेर सत्यवीर आहेस आणि या गावात भूतबंगल्याच्या तपासासाठी आला आहेस. कारण तुझं नाव मी बरंच ऐकून होतो मात्र तुझा चेहरा कधी पहिला नव्हता. शेंडे साहेबांच्या घरात आपली भेट झाल्यावर मला वाटलं कि तू

हरिभाऊंच्या सोबत कामाला आलायस. पण मानलं तुला. इतके दिवस मी नाव बदलून इथे राहत होतो हे कोणालाच समजलं नाही तू मात्र मला ओळखलंस" तीक्ष्ण नजर रोखत अनमोल म्हणाला.

"बंगल्यात काय शोधत होतास" सत्यवीरने परत आपला प्रश्न अनमोलला विचारला.

"काही नाही.... असंच सहज गेलो होतो" छद्मी मुद्रा करत अनमोल म्हणाला.

अनमोल उर्फ सनी धोत्रे हा एक अट्टल गुन्हेगार असल्याने आपल्याला तो काही सहजासहजी सांगणार नाही हे सत्यवीरला कळून चुकलं त्यामुळे त्याने वेगळ्या प्रकारची खेळी करायचं ठरवलं.

"हे बघ अनमोल तू जे काही शोधत होतास ते मी स्वतः खोदून काढेन आणि मला ते मिळेल सुद्धा. पण तू जर बऱ्या बोलाने सत्य सांगितलं नाहीस तर लोकांमध्ये दहशत निर्माण करणे, शेंडेच्या घरात चोऱ्या करण्याचा प्रयत्न करणे आणि खुनाचा प्रयत्न असे अनेक गुन्हे लावून ते साबित करून तुला कमीतकमी जन्मठेप होईल इतकी शिक्षा कशी होत नाही याकडे मी स्वतः जातीने लक्ष देईन तसचं तुझा आधीच्या गुन्हेगारीच्या कारनाम्यांमुळे न्यायाधीश महोदयांनासुद्धा याची खात्री पटेल. इनामदार याची फाईल जरा आणता का इकडे" सत्यवीर कडक आवाजात म्हणाला.

सत्यवीरच्या या वक्तव्यावर अनमोल जरासा घाबरला. सत्यवीरला गुन्हेगारी कलमांची इत्यंभूत माहिती असून तो आपल्याला कोणत्याही गुन्ह्यात लीलया अडकवू शकतो आणि ते सुद्धा जन्मठेपेपर्यंत असं वाटून घाबरून अनमोलने सगळं सांगण्याचं कबुल केलं. त्याला आयुष्यभर

तुरुंगात राहायचे नव्हते . तरीही सत्यवीरने त्याकडे दुर्लक्ष केलं. इतक्यात इनामदार साहेब अनमोल उर्फ सनी धोत्रेची फाईल घेऊन आले.

"तर हा तुझा सगळा गुन्हेगारीचा रेकॉर्ड आहे.

नाव- सनी धोत्रे, वय-३३, गुन्हेगारीचं स्वरूप– घरफोडी, लुटमारी, दरोडे आणि सध्या गावात राहून अजून काही गुन्हे केलेसच त्यात तू शेंडे साहेबांच्या खुनाचा प्रयत्न सुद्धा केलास हे इथे नमूद करायला हवं. मागे केलेल्या एका मोठ्या दरोड्याखाली तुला अटक झालेली असता तुरुंगातून तू पळून बाहेर आलायस. आणि हो.. हा फोटो पहा इनामदार साहेब या फोटो मधल्या इसमाच्या मिशा आणि तुरळक दाढी जर काढली तर ह्या फोटो मधला इसम आपल्या समोर बसलेला सनी धोत्रे आहे हे सिद्ध व्हायला किती वेळ लागेल." सत्यवीर इनामदारांकडे डोळे मिचकावत पटापट बोलला.

इनामदारांनी फोटो निरखून पहिला आणि म्हणाले

"हो सत्यवीर, या फोटोला जशा मिशा आहेत तशा जर या अनमोलला लावल्या तर सनी धोत्रे हाच आहे अशी खात्री पटतेय. मी तर म्हणतो याला पुन्हा मिशा आल्यावरच न्यायालयात हजर करू. तोपर्यंत याची इथेच माझ्या लॉकअपमधे खातिरदारी करतो आणि हो शेंडे साहेबांकडून मी जबाब घेतो त्यांच्या खुनाचा प्रयत्न पण केला ना याने"

इनामदार आणि सत्यवीर याचं संभाषण ऐकून अनमोल उर्फ सनी धोत्रेची तर चांगलीच पाचावर धारण बसली.

"थांबा थांबा..मी कोणाच्याही खुनाचा प्रयत्न केला नाहीये. उगाचच मला मी न केलेल्या गुन्ह्यात अडकवू नका..मी सांगतो सगळं सांगतो" अनमोल काकुळतीला येत म्हणाला.

आपली मात्र चांगलीच लागू पडली हे पाहून सत्यवीर मनोमन हसू लागला. पण तरीही चेहरा शक्य तितका गंभीर करत तो म्हणाला “बर बाबा पटकन काय ते खरं खरं सांग”

“हो.. हो सांगतो.. असं म्हणून अनमोलने सांगायला सुरुवात केली –

“सुमारे वर्षभरापूर्वी मी शहरात एका मोठ्या असामीच्या घरात करोडो रुपयांवर डल्ला मारलेला होता. इतकी मोठी लुट मी आजपर्यंत केलेली नव्हती. हि सगळी लुट घेऊन ती खर्च करत आरामात आयुष्य काढायचं असा माझा विचार होता. त्या असामीच्या घरातून मी सोने चांदी तसेच रोख रक्कम घेऊन पळून गेलो होतो पण ते करत असताना पोलिसांना या गोष्टीचा सुगावा लागला होता. माझ्या मागे पोलीस लागले होते. मी जीवाच्या आकांताने शहराच्या मार्गाने या गावाकडे येणाऱ्या मार्गावर पळत होतो. पोलिसांचा ससेमिरा मागे लागलेला होता आणि हातात करोडोंचा ऐवज अशा परिस्थितीत मी शेंडेच्या आत्ताच्या बंगला असलेल्या जागेवर आलो पण तेव्हा तिथे कोणताही बंगला न्हवता. फक्त मोकळी जागा होती आणि दगडी कंपाऊंड होतं. बाजूला एक मोडक शेड होतं. आजूबाजूला शेते होती. पोलिसांना चकवण्यासाठी मी एक युक्ती केली हातातला ऐवज मी बाजूच्या शेडमधील पडलेल्या अवजारांच्या सहाय्याने एके ठिकाणी मोकळ्या जागेत पुरून ठेवला आणि खुणेसाठी एक मोठ्ठा दगड तिथे ठेवला. पोलिसांना सापडला गेलोच तर मुद्देमालासह सापडला जाऊ नये अशी माझी योजना होती. नंतर कधीतरी इथे गुपचूप येऊन इथला माल खणून काढावा असं मी ठरवलं आणि बाजूच्या शेतांमध्ये लपून बसलो पण खराब नशिबाने मी पोलिसांच्या हाती लागलो. त्या असामीच्या घरात दरोडा टाकल्याच्या कारणावरून मला तुरुंगात जावं लागलं. पण तिथे गेल्यावर सुद्धा मला मला चोरलेला ऐवज सुरक्षित असेल कि नाही याची चिंता लागून

राहिली कारण त्या ऐवजाच्या बळावर मी माझं उर्वरित आयुष्य आरामात घालणार होतो. मी तुरुंगात राहूनच इथून बाहेर कसं पळून जावं याचा विचार करू लागलो. तुरुंगात राहून बरेच महिने गेले एकदा संधी साधून मी तुरुंगातून पळालो आणि रात्री या गावात जिथे मी चोरलेला ऐवज लपवलेला होता तिथे येऊन पोचलो. समोर बघतो तर एक भव्य बंगला दिसला. तसेच बांधकामचे अवशेष दिसतं होते. कोणीतरी हि जागा विकत घेऊन इथे बंगला बांधत होतं. मी पळून जाताना खुणेसाठी दगड कुठे ठेवला होता तोही लक्षात येईना. त्यामुळे मला कळेना कि मी तो ऐवज नक्की कोणत्या जागी पुरून ठेवला आहे. तो कोणाच्या हाती तर लागला नसेल ना? हा विचार येताच माझ्या मनात भीतीचा संचार झाला. ज्याला कोणालाही इथे ऐवज मिळाला असेल त्याच्या घशात हात घालून मी तो बाहेर काढायचं ठरवलं होतं.

मी गावातच राहून कामगाराच्या वेशात फिरून तो बंगला कोणाचा आहे. तिथे अन्य काही सापडलं का याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तो बंगला शेंडे साहेबांचा असून तो त्यांनी नुकताच मेहता नावाच्या माणसाकडून विकत घेतल्याची गोष्ट कळली. मेहता यांनी कशा प्रकारे तो बंगला शेंडेना विकला याची माहिती देखील काढली पण बंगल्याच्या आवारात पुरलेला ऐवज शेंडेच्या हाती लागला नसेल ना असं वाटून मी शेंडेकडे नोकरी मागण्यासाठी गेलो. सोंगे घेण्यात उस्ताद असल्याने आणि थोडंफार शिक्षण झाल्याने माझी वर्णी त्यांच्या पतपेढीवर लागली. मी कष्टाळू आणि इमानदारपणे त्यांच्याकडे काम केले. हेतू एकच कि बंगल्याच्या आसपास मी पुरलेला करोडोंचा ऐवज त्यांच्या हाती लागला आहे कि तो अजूनही तिथेच आहे हे शोधणे. शेंडेच्या घरात राहून मला त्यांना तो ऐवज अजून मिळाला नसल्याचं लक्षात आलं आणि एक निराळाच

आनंद मला झाला. बंगला बांधण्याच काम पूर्ण व्हायच्या आत मला तिथला ऐवज शोधून काढून इथून पळ काढायचा होता. पण सततच्या बांधकामामुळे बंगल्याच्या आवारात कामगारांची गर्दी असायची अशात मला तो पुरलेला ऐवज शोधणे शक्य नव्हते. मग मी एक वेगळीच योजना आखली.

मेहतांची मुलगी अवनी हि त्या बंगल्यात जळून मेल्याचं माझ्या कानावर आलेलं होतं याचा फायदा घायचं मी ठरवलं. रंगा आणि बाळू या दोन चोरांना मी गुपचूपपणे जाऊन भेटलो आणि त्यांना पैशाचं लालूच दाखवून रात्री अपरात्री तिथे जाऊन जोरजोरात किंकाळ्या मारण्याचं काम सोपवलं. जेणेकरून तो बंगला भुताने झपाटला आहे असं लोकांना वाटावं. बंगल्यात भुते आहेत अशी अफवा पसरवायला मीच सुरुवात केली. त्यात शेंडेना देखील भुते खरी आहे हे भासवण्याकरिता त्यांच्या घरात रात्री गुपचूपपणे शिरून भिंतीवर जनावरांच्या रक्ताने "मी आले आहे" असा मजकुर लिहिला. नंतर दुसऱ्या एका खोलीतील किल्ल्या मिळवून तिथे सामानांची नासधूस केली आणि चोरीचा बनाव केला. एकदा भुताच्या भीतीने लोक बंगल्याकडे फिरकेनासे झाले कि मग मध्यरात्री तिथे जाऊन आपण पुरलेला ऐवज शोधायचं मी ठरवलं. आधी बरेच दिवस मला ती जागा सापडेना कारण मला आत्ता नेमकं आठवत नव्हतं कि रात्रीच्या अंधारात मी तो ऐवज कुठे पुरला होता. मग मी बंगल्याच्या आतमधे सुद्धा खोदकामाला सुरुवात केली. रंगा आणि बाळूच्या मदतीने आधीच वरवरची जमीन भुसभुशीत करून घेतली होती. भुतांच्या अफवेचा जोर चांगलाच पसरलेला होता. बंगला बळकावण्याच्या उद्देशाने बरेच दलाल प्रयत्न करू लागले. त्यात मिस शीला हिने तर एका बाईला तिथे भूत बनून रात्रीचं उभं राहायला सांगितलं हे मला समजलं हे तर माझ्या पथ्यावरच पडलं आणि

लोक आता इथे बंगल्याच्या आसपास देखील यायला कचरू लागले. पण तरीही दलालांच्या दबावाला बळी न पडता शेंडेनी तो बंगला कोणाला विकू नये आणि माझ्या शोधकार्यात अडथळा येऊ नये म्हणून मी शेंडेना विनवलं कि एवढी महाग मालमत्ता कवडीमोल भावात विकू नका. आपली काळजी वाटुन अनमोलने आपल्याला हा सल्ला दिला असं वाटून शेंडेनी सुद्धा बंगला कोणाला विकायचा नाही हे ठरवलं आणि मग माझं काम बिनधोक झालं. शेंडेनी बंगला कोणी विकू नये तसेच बंगल्याच्या आसपास देखील कोणी फिरकू नये असं मला वाटत होतं. बंगल्यात सगळ्या ठिकाणी जागा खणल्यावर मला अपयश आलं.

आता फक्त आतली हॉलवजा मोठी खोली खोदायची राहिली होती ऐवज नक्की त्याचं ठिकाणी पुरला असणार असं वाटून मी तिथे खोदायला चालू केलं होतं. नंतर रंगा आणि बाळू पकडले गेल्याचं समजलं मग मात्र मी कामाला वेग घेतला आणि आतल्या मोठ्या खोलीतच खाली तो ऐवज आहे हे पक्क माहित झाल्याने त्यानुसार काल मी तो ऐवज घेण्यासाठीच तिथे गेल्यावर पकडला गेलो.

हि सगळी कहाणी सांगून अनमोल गप्प बसला.

त्याच्या या बोलण्यावर काहीही न बोलता सत्यवीरने इन्स्पेक्टर इनामदारांना इशारा केला. इनामदारांनी लगेचच मागच्या खोलीतून रंगा आणि बाळूला सत्यवीरपुढे आणले. अनमोलची चौकशी करायच्या आधीच सत्यवीरने रंगा आणि बाळूला बाजूच्या खोलीत अनमोलचा आवाज ऐकू येईल अशा खोलीत उभं राहायला सांगितलं होतं.

“या सनी धोत्रेची कहाणी जी आत्ता तुम्ही मागे उभी राहून ऐकली. त्यावरून त्याचा आवाज कसा आहे हे तुम्हाला समजलंच असेल. तर

तुम्हाला बंगल्यात आरडाओरडा करण्यासाठी पैसे देणारा मनुष्यसुद्धा हाच होता का?" सत्यवीरने रंगा आणि बाळूला प्रश्न विचारला.

"होय साहेब.. हाच आवाज होता त्या माणसाचा ज्याने आम्हाला पैसे दिले होते" रंगाने पुष्टी दिली.

चौकशी उरकून सत्यवीर आणि इनामदार चौकशी खोलीतून बाहेर आले.

"शेंडे साहेब तुमचं टेंशन आता गेलं असेलं. बंगल्यात कोणती भुते होती हे तुम्हाला समजलंच असेल" बाजूच्या खुर्चीवर बसत सत्यवीर हसत म्हणाला.

"खरंच सत्यवीर. चुकीच्या माणसावर विश्वास ठेवून मी कामावर ठेवलं होतं. पण तुम्ही होतात म्हणून माझ्या मागची सारी ब्याद निघून गेली यासाठी मी तुमचा शतशः ऋणी राहीन" शेंडे साहेब हात जोडतच म्हणाले.

"खरंच सत्यवीर मला तुझा नेहमीप्रमाणे आजही अभिमान वाटतो. तुला इथे बोलावण्याचा निर्णय अगदीच सार्थ झाला" हरिभाऊ अभिमानाने सत्यवीरकडे पाहत म्हणाले.

"पण सत्यवीर अनमोल उर्फ सनीने लपवलेला तो ऐवज चोरीचा असून आपल्याला तो संबंधित मालकाला सुपूर्त करावा लागेल" इनामदार काळजीयुक्त स्वरात म्हणाले.

"काळजी करू नका मी ज्या खोलीत लपून अनमोल वर झडप घातली होती. त्या मोठ्या खोलीच्या एका कोपऱ्यातच जिथे अनमोल खणत होता तिथे आणखी खाली खणले असता तो ऐवज तुम्हाला सापडेल. तो तुम्ही संबंधित व्यक्तीला सुपूर्त करा" सत्यवीर खुर्चीवर रेलत म्हणाला.

‘सत्यवीर त्या बंगल्यात भुते नाहीत हि गोष्ट तुला आधीपासूनच माहित होती ना?” इंस्पेक्टर इनामदारांनी विचारलं.

“हो.. म्हणजे जेव्हा मी प्रथम शेंडेसाहेबांच्या बंगल्यावर हरिभाऊंच्या सोबत पाहणीसाठी गेलो असता तिथे भिंतीवर लिहिलेला मजकुर आणि सामानाची फेकाफेक हा प्रकार कोणत्या तरी माणसाचाच आहे हे मला पक्क माहित होतं. थोडीफार पाहणी केल्यावर शेंडेंच्या घराच्या मागच्या बाजूनेच कोणीतरी आतमधे येऊन तो प्रकार केला असणार असा तर्क मी लावला. तसं मी हरिभाऊंना देखील सांगितलं होतं आणि आत्ताच सनी धोत्रेने सुद्धा ते मान्य केलं आहे. तसचं बंगल्यात पाहणीसाठी गेल्यावरसुद्धा तिथे पडलेले ढिगारे आणि जागोजागी पडलेले खड्डे इथे कोणीतरी काहीतरी अमूल्य गोष्ट शोधत असल्याचीच साक्ष देत होते” सत्यवीर म्हणाला.

“आज रात्रीच तो अनमोल उर्फ सनी धोत्रे बंगल्यावर येणार याची तुला खात्री कशी काय बऱ होती शिवाय त्याचं नाव सनी धोत्रे आहे हे तू कसं काय ओळखलंस?” इनामदारांनी पुन्हा प्रश्न केला.

“रंगा आणि बाळूला पकडल्यावर माझी खात्रीच झाली कि त्यांना कोणीतरी गुन्हेगारी जगताशी संबंध ठेवणाऱ्या माणसानेच पैसे देऊन भूताटकीचे कृत्य करायला लावलं आहे. मिस शीला हिने फक्त बंगला स्वस्तात मिळावा या उद्देशानेच तमाशात काम करणाऱ्या बाईला तिथे बंगल्यात रात्री उभं राहायला लावलं होतं. तुम्ही जेव्हा तमाशाच्या फडातील बाईला शोधायला गेला होतात तेव्हा मी मागच्या वर्षभरातील सगळ्या गुन्हेगारी घटनांचे आणि त्यातील सामील आरोपींचे रेकॉर्ड व फोटो पाहत इथे पोलीसस्टेशनवर बसलो होतो. त्यात मला वर्षभरापूर्वी एका दरोड्यातील आरोपात असणारा एक गुन्हेगार दिसला ज्याचं नाव सनी धोत्रे

होतं. सोबत जोडलेल्या फोटोमध्ये पाहिल्यावर तो माणूस आपण नक्की कुठेतरी पहिला असल्याची जाणीव झाली नंतर आठवलं कि शेंडेंच्या पतपेढीवर काम करणाऱ्या अनमोलशी या फोटोचं साम्य जुळतंय. अनमोलला आत्ता दाढी मिश्या असत्या तर तो असाच दिसला असता असं मला वाटलं. म्हणजेच रंगा आणि बाळूला पैसे देणारा आणि रात्री अपरात्री बंगल्यात येऊन खोदकाम करणारा अनमोलच असला पाहजे हे मला वाटू लागलं. रंगा आणि बाळू पकडले गेले आहेत म्हटल्यावर सनी धोत्रे शक्य तितक्या लगबगीने बंगल्यात येऊन त्याला हवी असलेली वस्तू शोधायला येणार हे उघडंच होतं" सत्यवीर म्हणाला.

"तुझ्या योजनेनुसार तो आला सुद्धा आणि अलगद आपल्या जाळ्यात सापडला सुद्धा" इनामदार खुषीत येऊन म्हणाले.

यावर सत्यवीर फक्त हसला.

"चला हरिभाऊ, आता मला खूप भूक लागली आहे. घरी जाऊन मस्तपैकी जेवण करून ताणून देऊयात" सत्यवीर शरीराला आळोखे पिळोखे देत खुर्चीवरून उठत म्हणाला.

"हो चला.. मला सुद्धा बंगल्याच्या बांधकामाचं काम लवकरात लवकर पूर्ण केले पाहजे आणि ते सुद्धा इतर कोणती नवीन भुते बंगल्यात उच्छाद मांडण्याच्या आत" शेंडे साहेब हसत म्हणाले.

शेंडे साहेबांच्या या वाक्यावर मात्र सत्यवीर, हरिभाऊ मोठ्याने हसले आणि त्यांच्या या हास्यात केशवसह इन्स्पेक्टर इनामदार सुद्धा सामील झाले.

समाप्त....

(कथा वाचल्याबद्दल धन्यवाद! आपल्या प्रतिक्रिया ७३५०९३३६९० या व्हॉटस्एप नंबरवर लिहून पाठवा. सोबत आपले नाव, गांव/शहर आणि व्यवसाय/नोकरी ही माहिती लिहायला विसरू नका!) – लेखक

ई साहित्यची इतर पुस्तक वाचण्यासाठी...

esahity@gmail.com
9987737237
(एक व्हट्सप मेसेज पाठवा.
भरपूर पुस्तकं मिळवा)

ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव





मंडळी!

अक्षय जाधव

यांची ही पुस्तकं वाचा.

फक्त कव्हरवर क्लिक करा.

पुस्तक उघडेल.